म. ग्रं. सं. ठाणें
विषय बा. वा.
वा. क्र. ६३०२

# माजधर्म

[ भगिनी निवेदिता याच्या Religion and Dharma
या नांवानें प्रसिद्ध झालेल्या कांहीं निबंधांचा अनुवाद ]

## साने गुरुजी

संपादक
**त्र्यं. ग. बापट, बी. ए., बी. टी.**

IRBK-0106302
IRBK-0106302

किंमत सव्वा रुपया

दा.क्र. ६३०२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

प्र. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. ६३०२ नों. दि
वि. ........ का. वा.

# समाजधर्म

[ भगिनी निवेदिता याच्या Religion and Dharma
या नांवानें प्रसिद्ध झालेल्या कांहीं निबंधांचा अनुवाद ]

साने गुरुजी

अनुक्रम ३०,५४
३४५७
नों. दि.

सपादक
त्र्यं. ग. बापट, बी. ए., बी. टी.

ए. ए. कोपर्डेकर ग्रंथ प्रकाशक

IRBK-0106302

किंमत सव्वा रुपया

# भगिनी निवेदिता

मॅन्चेस्टर या शहरामध्यें नोबल या उपनांवाचें एक आयरिश कुटुंब रहात असे. रेव्हरंड एस्. आर्. नोबल यांना शहरांतील गरिबांची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा असें वाटे. त्यांनीं हिंदु धर्माचाही अभ्यास केला होता. त्या अभ्यासामुळें त्यांना हिंदुस्थानाबद्दल प्रेम वाटूं लागलें. सौ. नोबल याही आपल्या पतीच्या जीवनाशीं एकरूप झाल्या होत्या.

१८६७ साल सुरू झालें. सौ. नोबल या लौकरच माता होणार असें दिसूं लागलें. २८ ऑक्टोबर १८६७ हा दिवस उजाडला. गर्भवतीचें पोट दुखूं लागलें. नर्सला बोलावणें पाठवलें. उपचार सुरू झाले. कळा वाढत चालल्या. नोबल अस्वस्थ झाल्या. यांतून आपली सुटका कशी होईल अशी चिंता त्यांना वाटूं लागली. नर्सनें सगळे प्रयत्न केले, पण सुटका होईना. शेवटीं सौ. नोबल यांनीं नर्सला सांगितलें कीं, " कुमारी मेरीचें चित्र दिवाणखान्यांत आहे तें घेऊन ये. " नर्सनें चित्र आणलें. त्या चित्रांत कुमारी मेरीच्या मांडीवर भगवान् येशू ख्रिस्त बालस्वरूपांत खेळत होते. त्या चित्राकडे पहात सौ. नोबल यांनीं प्रार्थना केली कीं, " माते मेरी, या प्रसूतिवेदना मला सहन होत नाहींत. यांतून माझी सुटका कर. मला होणारे मूल मी तुझ्या सेवेला अर्पण करीन. " ही आर्त प्रार्थना मेरीनें ऐकली. सौ. नोबल यांनीं एका मुलीला जन्म दिला. तिचें मार्गरेट असें नांव ठेवलें.

१८७४ साल उजाडलें. सात वर्षांची मार्गरेट शाळेंत जाऊं लागली. आपल्या पोषाकापेक्षां पुस्तकांच्या व्यवस्थितपणाकडे ती अधिक लक्ष देई. तिच्या वडिलांनीं तिला भगवान् ख्रिस्ताच्या चरित्रांतील गोष्टी सांगितल्या. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या इतिहासांतील गोष्टी सांगितल्या. मार्गरेटचें बालमन हिंदुस्थानच्या विचारांनीं भारून गेलें. याच वेळीं हिंदुस्थानांत काम करीत असलेला एक आयरिश मिशनरी रेव्हरंड नोबल यांचे घरीं आला. तो रेव्हरंड नोबल यांचा मित्र होता. रात्रीच्या वेळीं जेवण झाल्यावर शेगडीच्या उबाऱ्यांत मित्रांच्या गप्पा सुरू झाल्या. त्या मिशनरीनें हिंदुस्थानांतील दैन्य आणि दारिद्र्य यांची माहिती सांगितली.

कुमारी मार्गरेट त्या गप्पागोष्टी तीव्र जिज्ञासेनें ऐकत होती. त्या मिशनरीनें मार्गरेटकडे पाहिलें आणि तो भविष्यवाणीनें म्हणाला कीं, " ही मुलगी शिक्षण संपल्यावर मोठेपणीं भारतांत जाईल आणि तेथील समाजाची सेवा करील."

यानंतर नोबल कुटुंबानें हिंदुस्थानचा अधिक अभ्यास केला. हिंदुस्थानांतून आलेला कोणताहि मनुष्य त्यांना आपलासा वाटूं लागला. कुमारी मार्गरेट भारत पहाण्यास उत्सुक झाली. तिचें शिक्षण पूर्ण होत आलें. इतिहास, गणित, शास्त्र, चित्रकला, वक्तृत्व, तत्त्वज्ञान, इत्यादि विषयांत तिनें प्रावीण्य मिळविलें. त्या वेळचा थोर शास्त्रज्ञ हक्स्ले यानेंही मार्गरेटच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची प्रशंसा केली. पण मार्गरेटचें कार्य पहाण्यास तिचे वडील फार दिवस जगले नाहींत. ते आजारी पडले. त्यांचा मृत्युसमय जवळ आला. त्या वेळीं त्यांनीं आपल्या पत्नीला जवळ बोलावलें आणि सांगितलें कीं, " मला वाटतें कीं, कांहीं महत्कार्याकरतां मार्गरेटचा जन्म झाला आहे. तिच्या मार्गानें तिला जाऊं दे. तिला अडथळा करूं नकोस. "

शिक्षण पुरें झाल्यावर मार्गरेटच्या मनांत कोणते विचार आले ? लग्नाचे ? मुळींच नाहीं. तिला वाटलें कीं, लंडन शहरांत अनेक दरिद्री लोक आहेत. हीन दीन स्त्रिया आहेत. या स्त्रियांच्याकरितां तिनें शाळा काढली. पेस्टॉलझी या थोर शिक्षकाच्या जीवनग्रंथाचा तिनें अभ्यास केला. बालमनाचा अभ्यास केला. स्त्रियांच्या दृष्टीनें योग्य असा अभ्यासक्रम ठरविला. या मार्गानें अध्ययन आणि अध्यापन करीत असतांना या तपस्विनीच्या लक्षांत आलें कीं, To educate is to take out the divine in the child. शिक्षण म्हणजे बालकांतील दिव्यत्वाचा विकास होण्यास वाव देणें.

१८९७ साल उजाडलें. मार्गरेट तीस वर्षांची झाली. याच वेळीं स्वामी विवेकानन्द अमेरिकेंत वैदिक धर्माची प्रस्थापना करून लंडन शहरांत आले. मार्गरेटनें त्यांचीं भावमधुर व्याख्यानें ऐकलीं. तर्क आणि भक्ति यांचा झगडा सुरू झाला. काहीं दिवसांनीं तिला वाटूं लागलें कीं, स्वामी विवेकानन्द हे आपले गुरुदेव आहेत. स्वामींनीं आपला युरोपचा प्रवास

संपविला आणि ते हिंदुस्थानांत जाण्यास निघाले. त्या वेळीं ते मार्गरेटला म्हणाले, "हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या उन्नतीकरतां मला कार्य करावयाचें आहे. त्या कार्यांत मला तुमची फार मदत होईल. तुम्ही हिंदुस्थानांत येण्यास तयार आहांत का ?" मार्गरेट हा प्रश्न ऐकून विचारांत पडली. तिनें आपल्या आईला विचारलें. आईच्या डोळ्यासमोर रेव्हरंड नोबल यांची मूर्ति उभी राहिली. तिला त्यांचे शेवटचे शब्द आठवले आणि तिनें मार्गरेटला हिंदुस्थानांत जाण्यास परवानगी दिली. याच सुमारास विवेकानन्दांचें एक पत्र आलें. त्या पत्रांत ते म्हणाले, "I will stand by you as long as I live, whether you work for India or not, whether you give up Vedanth or remain in it. The tusks of the elephant come out, but they never go back. Even so are the words of a man."

१८९८ सालीं मार्गरेट हिंदुस्थानांत आली. बेलूर येथें गंगेच्या कांठीं एका लहानशा झोपडींत ती राहिली. तिनें संस्कृत भाषेचा अभ्यास केला. स्वामी विवेकानन्दांनीं भगवद्गीतेचें रहस्य तिला सांगितलें. स्वामींच्याबरोबर ती बद्धपद्मासन घालून दोन दोन तास ध्यानस्थ बसे. याच ठिकाणीं रामकृष्णांच्या चरित्राचें महत्त्व तिच्या लक्षांत आलें. स्वामी विवेकानन्दांसारखा धगधगणारा ज्ञानाग्नि तिच्यासमोर उभा होता. त्या अग्नीमध्यें तिच्या मनांतील शंकाकुशंका जळून खाक झाल्या. कु. मार्गरेट हिचें तपस्विनीमध्यें रूपांतर झालें. ध्यान, मनन, चिंतन हें रात्रंदिवस सुरू झालें. श्रवण, कीर्तन, स्मरण, चरणसेवा, अर्चन, वंदन, दास्य, सख्य या मार्गांनीं कु. मार्गरेट ही भक्तिमार्गाच्या आठ पायऱ्या ओलांडून पुढें गेली. पण आत्मनिवेदनाची अखेरी अजून साधावयाची होती.

तिनें स्वामींच्याबरोबर हिंदुस्थानांत प्रवास केला. पाटणा, बनारस, लखनौ, इत्यादि शहरें पाहिल्यावर तिनें हिमालयांतील मायावतीचा आश्रम पाहिला. यानंतर तिनें काश्मीरच्या नंदनवनांत प्रवेश केला. डोक्यावर धान्याच्या पाट्या घेऊन गात गात, नाचत नाचत घरीं जाणारे शेतकरी तिनें पाहिले. काश्मीरांत तिनें क्षीरभवानीचें दर्शन घेतलें. पुढें

एका लेखांत ती म्हणाली, " It was ,said to be the first time a Christian or a Mohamedan had ever been there." यानंतर तिनें शंकराचार्यांचें देऊळ पाहिलें. श्रीनगर येथील शालीमार बागेंतील फुलांचें निरीक्षण केलें. शेवटीं तिनें अमरनाथाची गुहा पाहिली.

कु. मार्गरेट बेलूर येथें परतली. पण अजून तिच्या मनाला पूर्ण शांतता मिळाली नव्हती. हिंदुस्थानांतील अनेक प्रान्त तिनें पाहिले. पूजेचे प्रकार अवलोकन केले. संस्कृत भाषेच्या अभ्यासांतून भारतीय संस्कृतीचें निरीक्षण केलें. वस्त्रहीन, अर्धपोटी आणि निराधार असे शेतकरी पाहिले. गोरज-मुहूर्तांच्या वेळीं गांवाकडे धूळ उधळीत जाणाऱ्या गाईंच्या खिल्लारांची शोभा अवलोकन केली. गंगामाईच्या प्रशान्त प्रवाहांत स्नान केलें. गंगा-माईचें दर्शन होतांच प्रत्येक हिंदूच्या डोळ्यांत न कळत अश्रू येतात आणि त्यांच्या लक्षांत येतें कीं, आपल्या बेचाळीस पूर्वजांच्या अस्थि या सुरसरितेच्या पुण्यमय प्रवाहांत पावन झाल्या आहेत. या गंगामाईचें स्वरूप आपल्याला समजून घ्यावयाचें असेल तर मार्गरेटचा लेख वाचला पाहिजे. मार्गरेटच्या डोळ्यांनीं गंगेकडे पाहिल्यावर एक नवीन सौन्दर्य प्रतीत होतें.

प्रवास संपला तरी मार्गरेटच्या मनांतील अस्वस्थता संपली नाहीं. आपल्या जीविताचें ध्येय काय? इंग्लंडला परत जाणें योग्य आहे काय? कोण मार्ग दाखवील? असे विचार तिच्या मनांत आले. याच वेळीं ज्ञानवैराग्यसंपन्न स्वामी विवेकानंद तेथें आले. त्यांनीं तिच्याकडे पाहिलें. तिच्या अस्वस्थतेचें कारण ओळखलें. मार्गरेट पुढें आली. तिनें वांकून स्वामींना नमस्कार केला. स्वामींनीं आपलें योगसामर्थ्य एकवटून मार्गरेटच्या मस्तकावर हात ठेवला. मार्गरेटची समाधि लागली. ती आनंदसागरांत निमग्न झाली. कांहीं वेळानें ती शुद्धीवर आली. तिचें मन शांत झालें. जीविताच्या ध्येयाचा तिच्या मनामधें उदय झाला. हिंदुस्थानांतील दरिद्री-नारायणाची सेवा हें आपलें ध्येय आहे असा तिला साक्षात्कार झाला. तिनें भक्तिभावानें स्वामी विवेकानंदांना— आपल्या परमपूज्य गुरुदेवांना— नमस्कार केला. विवेकानंद म्हणाले, " आजपासून मठांतील साधक तुला ' निवेदिता ' या नांवानें ओळखतील. "

निवेदिता म्हणजे परमेश्वराला अर्पण केलेली. नवविधा भक्तिमार्गांतील शेवटच्या मार्गाला निवेदनभक्ति असें म्हणतात. आपली पत्नी व मुलें, घरदार, जमीनजुमला, बुद्धि, मन आणि अहंकार हें सर्व देवाला दिल्यावर जो कोणी 'आपण' म्हणून उरतो तोहि देवाला वहाणें ही आत्मनिवेदनभक्ति होय असें पांगारकरांचें मत आहे. रामदास म्हणतात,

ऐका निवेदनाचें लक्षण । देवासी वहावें आपण ।
करावें तत्त्वविवरण । म्हणिजे कळे ।।

कांहीं दिवसांनीं निवेदिता आपल्या आईला भेटण्याकरितां विलायतेला गेली. आईला आनंद झाला. मार्गरेटनें आईला आपल्या निवेदिता या नांवाचा इतिहास सांगितला. निवेदिता म्हणाली, "आई, ईश्वराला अर्पण केलेली ती निवेदिता असा माझ्या नवीन नांवाचा अध्यात्मिक अर्थ आहे." आई म्हणाली, "बाळ निवेदिता, तुझ्या जन्माच्या वेळीं मला प्रसूतिवेदना सहन होईनात. मीं मेरीची प्रार्थना केली कीं, 'हे माते, माझ्या वेदना थांबीव. मी माझें बालक तुला अर्पण करीन.' यानंतर तुझा जन्म झाला. जन्माला येण्यापूर्वींच तुझा भक्तिमार्गाचा प्रवास सुरू झाला होता."

साने गुरुजींनीं निवेदितांच्या कार्याचें महत्त्व एका प्रस्तावनेंत वर्णन केलें आहे. त्या लेखांत गुरुजी सांगतात, "विवेकानंदांनीं निवेदितांच्या जीवनांत प्रकाशाचा अमर दीप लाविला. अन्नहीन, वस्त्रहीन, ज्ञानहीन, स्वातंत्र्यहीन असा हा महान् भारत त्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. हिंदुस्थानाला त्यांनीं आपलें मानलें. तुम्हांआम्हांला ही भरतभूमि आपली वाटत नसेल इतकी ती निवेदितादेवीस वाटे. आपला हा देश, आपले बंधु अशा शब्दांनीं त्या हिंदुस्थानचा व हिंदी जनतेचा उल्लेख करीत. जणुं त्या हिंदुस्थानांत जन्मावयाच्या; परंतु चुकून तिकडे गेल्या. त्यांनीं भारताची यात्रा केली. मंदिरें, लेणीं, गुंफा, मशिदी, किल्ले सहृदयतेनें; भावभक्तीनें व मार्मिकतेनें पाहिले. भगवान् बुद्ध, अशोक, अकबर, राणा प्रताप, शिवछत्रपति, चांदबिबी, अहिल्याबाई वगैरे नांवें आठवतांच त्यांची समाधि लागे. एकदां त्या बुद्धगयेला गेल्या होत्या. येथें भगवान् बुद्धास ज्ञान झालें हा विचार मनांत येऊन त्यांच्या डोळ्यांतून

अश्रुधारा वाहूं लागल्या. त्या दिल्लीला गेल्या होत्या. तेथें खुदाबक्ष ग्रंथालयांत शहाजहानचें हस्ताक्षर पाहून त्यांचें हृदय उचंबळलें. पत्नीची पवित्र स्मृति बाळगणारा, ताजमहाल बांधणारा शहाजहान त्यांच्या डोळ्यांसमोर आला. ”

“ निवेदिता हिंदुमुसलमानांच्या केवळ मारामाऱ्यांचा इतिहास पहात नव्हत्या. स्वामी विवेकानंद महंमदाच्या जन्मदिवशीं उपवास करीत ज्याप्रमाणें बुद्धजयंती, कृष्णजयंतीसही ते करीत. अशा महापुरुषाच्या चरणांशीं बसून भगिनी निवेदितांनीं राष्ट्रसेवेचे धडे घेतले. ”

आईची भेट घेऊन निवेदिता भारतांत परत आल्या. मॉडर्न रिव्ह्यू, प्रबुद्ध भारत इत्यादि मासिकांत त्यांनीं लेख लिहिण्यास आरंभ केला. ‘ कालीमाता ’ हें त्यांचें पहिलें पुस्तक. परमेश्वराचें रम्य आणि रौद्र स्वरूप या पुस्तकांत पहावयास मिळतें. हें ग्रंथलेखन चालू असतां त्यांनीं बंगालमधें अनेक ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. आपल्या त्रिखंडकीर्ति गुरूचा चढाऊ आणि लढाऊ हिंदु धर्म, जयिष्णु आणि वर्धिष्णु हिंदु धर्म आपल्या वाणीच्या वीणाझंकारानें इंग्रजी शिकलेल्या भ्रांत बांधवांना समजावून सांगितला. त्यांचीं धार्मिक व्याख्यानेंही राष्ट्रीयत्वाच्या रसानें रसरसलेलीं होतीं. भारतांतील धर्मवीरांचें आणि कर्मवीरांचें, धर्मतीर्थांचें आणि धारातीर्थांचें त्या वर्णन करूं लागल्या कीं हजारों श्रोते मंत्रमुग्ध होऊन जात. भारतीय संस्कृतीची विचारधारा भारतमातेच्या या मानसकन्येच्या रूपानें नवीन स्वरूपांत प्रकट झाली होती. याच सुमारास कलकत्त्याच्या टाउन हॉलमधें ‘ राष्ट्र आणि धर्म ’ या विषयावर त्यांचें भाषण झालें. स्वामी विवेकानंदांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. सर्वसंग्राहक हिंदु धर्माची विशाल कल्पना श्रोत्यांच्या मनश्चक्षूंपुढें उभी करून त्यांनीं या राष्ट्रांत निर्माण झालेल्या महाकाव्यांचें महत्त्व सांगितलें. भाषण टिपून घेणाऱ्या इंग्रज रिपोर्टरांना वाटलें कीं, अणुगोल हातांत घेऊन कोणीतरी क्रान्तिकारक बोलत आहे. भाषणाचा शेवट करतांना निवेदितांचें अंतःकरण भारताच्या पारतंत्र्यानें विदीर्ण झालेलें दिसलें. शोकविह्वल आणि कंपित अशा स्वरांत त्या म्हणाल्या, “ भारतीय बंधुभगिनींनो, तुमच्या श्वासांतून दरिद्रीनारायणाचा ध्यास निर्माण झाला

पाहिजे, तुमच्या कृतीमधून भारतीय असंतोषाच्या ज्वाला भडकल्या पाहिजेत आणि तुमच्या काव्यामधून स्वतंत्रतादेवीचें स्वागत करणाऱ्या नौबतींचे निनाद ऐकूं आले पाहिजेत. आपल्या संस्कृत भाषेमध्यें रामायणासारखें अद्वितीय महाकाव्य निर्माण झालें. इतर राष्ट्रांतील कोणत्याही महाकाव्यांत रामायणांतील राम सांपडणार नाहीं. पण केवळ रामायणाचें पठन करण्यांत समाधान मानून राहूं नका. स्वतंत्रतादेवीच्या चरणकमलांवर आपलें अनुपभुक्त असें जीवनपुष्प वहाण्यास तयार व्हा आणि प्राप्त परिस्थितीशीं झगडून अशा रोमहर्षक कृती करून दाखवा कीं ज्या कृती पाहून नवीन काळांतील वाल्मीकींना पुन्हां रामायण लिहिण्याची स्फूर्ति होईल. वंदे मातरम्. " हें भाषण झाल्यावर विवेकानंदांनीं थोडक्यांत समारोप केला. समारोपाच्या शेवटीं ते म्हणाले, " ही इंग्रज विदुषी भगिनी निवेदिता म्हणजे आंग्लभूमीनें भारताला दिलेली एक बहुमोल देणगी आहे. "

पण स्वामी विवेकानन्दांचा सहवास निवेदितांना फार दिवस लाभला नाहीं. १९०२ सालीं विवेकानन्द समाधिस्थ झाले. निवेदितांना वाटलें कीं, आपण एकट्या आहोंत; पण कांहीं दिवसांनीं त्यांच्या लक्षांत आलें कीं, रामकृष्ण आणि विवेकानंद आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत. रामकृष्ण-मठांतील सेवक हळूहळू विवेकानंदांचा समाजसेवेचा कार्यक्रम विसरत चालले होते. एकदां एक परदेशांतील प्रवासी कलकत्त्याला आला. निवेदितांच्या घरीं उतरला. आंघोळ झाल्यावर त्यानें कपडे घातले. नंतर तो निवेदितांना म्हणाला, " आपण आतां रामकृष्णमठांत जाऊं. विवेकानंदांचें कार्य पाहूं. तुम्ही माझ्याबरोबर येतां का ? " हा प्रश्न ऐकून निवेदितांनीं निःश्वास टाकला आणि त्या म्हणाल्या, " तुम्ही म्हणत असाल तर आपण मठांत जाऊं. पण त्या ठिकाणीं तुम्हांला विवेकानंद सांपडणार नाहींत. "

निवेदिता आपली दैनंदिनी लिहीत असत. त्या दैनंदिनीच्या आधारानें त्यांनीं पाश्चात्यांना विवेकानंदांबद्दल काय वाटतें हें सांगणारा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या ग्रंथाचें नांव ‘ माझे गुरुदेव ’ ( My Master as I Saw Him. ) हा ग्रंथ ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर टी. के. चेन

यांच्या वाचनांत आला. त्यांनीं या ग्रंथावर परीक्षण लिहिलें. त्या परीक्षणांत प्रो. चेन म्हणाले कीं, "माझ्या 'सद्‌गुरुविषयींचा माझा स्वतःचा अनुभव' या ग्रंथाची गणना जगांतील उत्कृष्ट धर्मग्रंथांमध्यें करण्यास मला बिलकूल संकोच वाटत नाहीं. 'सेंट ऑगस्टाईनचें आत्मनिवेदन' किंवा सबाटियरकृत 'सेन्ट फ्रान्सिसचें चरित्र' यांच्याच जोडीला एकाच खणा-मध्यें बायबलादि पवित्र पुस्तकांच्या खालोखाल माझ्या ग्रंथसंग्रहालयांत मीं सदर ग्रंथाला स्थान दिलें आहे."

त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले. त्या सर्वांत The web of Indian Life भारतीय जीवनाचें जाळें—हा ग्रंथ सर्वमान्य झाला आहे. 'आधुनिक भारतांतील महिला' या ग्रंथाचा लेखक म्हणतो, "She wrote many books, but the Web of Indian Life is the most well known. It is a great book indeed. It is read not only by Indians but also by the people of other countries. It shows the soul of the people. It gives a new meaning to the old Hindu ways of living. It also gives very fine pictures in words of places." या ग्रंथांत भारताचा आत्मा प्रतिबिंबित झाला आहे. निवेदितांनीं भारतीय जीवनाकडे नवीन दृष्टीनें पाहण्यास आपणांस शिकविलें. या ग्रंथांतील भारतीय गृहजीवनाचीं कांहीं शब्दचित्रें इतकीं रेखीव आहेत कीं, तीं वाचून एखाद्या कलावंताला रेखाचित्रें काढावींशीं वाटतील. एका संग्रहालयांत एक सतीचें चित्र भगिनी निवे-दितांनीं पाहिलें. त्यांचें वर्णन केलें. त्या निबंधाचें साने गुरुजींनीं रूपांतर केलें आहे. त्या वर्णनांत निवेदिता निवेदन करतात कीं, "नंदलाल बोस यांची भावनादर्शनाची रीत किती आकर्षक आहे ! या चित्रांत एक स्त्री दिसत आहे. तिनें नववधूप्रमाणें शृंगार केला आहे. त्या अग्नि-दिव्याचा मीलनक्षणावर तिचा सारा जीव जडला आहे. आपल्या थोर पराक्रमाची तिला जाणीवही नाहीं. तिचा आकार केवळ सत्त्वगुणी आहे. तिनें चितेवर गुडघे टेकले आहेत. अग्निज्वाला फूत्कार करणाऱ्या नागिणी-प्रमाणें वर उसळत आहेत. तिच्या मुखमंडलावर भीतीचा लवलेश नाहीं. तिच्या प्रार्थनेंत निरोप घेतांना अश्रू मिसळलेले नाहींत. त्या सतीच्या डोळ्यांना तिच्या पतीच्या पुण्यमूर्तीशिवाय अन्य कांहीं दिसत नाहीं.

तिचे आप्तजन, तिला जाळीत वर उसळणाऱ्या ज्वाला; यांपैकीं कोणाचेंही तिला स्मरण होत नाहीं. तिचें मन निश्चल आहे. शांततेचा सागर तिच्या हृदयांत उचंबळला आहे. ही निस्सीम निर्भयता हा अहंचा पूर्ण अभाव, ही स्वतःच्या जाणिवेची शून्यता, ही पतिप्रेमाची उज्ज्वलता, आपल्याला आजच्या भारतीय स्त्रियांतही नवीन स्वरूपांत पहावयास मिळेल. या सतींच्या निर्दोष यशाचा मार्ग दिव्यतेचा आहे. या मार्गावरील प्रत्येक पाऊल पहातांच आपण विनम्र व्हावयास पाहिजे. या दिव्य मार्गावरील धूळ मस्तकीं धारण करावयास पाहिजे. ”

भगिनी निवेदितांनीं लेखनावर मिळविलेले पैसे शाळेकरतां खर्च केले. कलकत्त्याच्या बागबझार येथील गरिबांच्या वसतींत त्या येऊन राहिल्या. त्या आळींतील रस्ते त्यांनीं झाडले. मुलींच्याकरतां एक शाळा सुरू केली. त्या शाळेच्या उद्घाटनप्रसंगीं रामकृष्णांच्या धर्मपत्नी शारदा या हजर होत्या. त्यांनीं आशीर्वाद दिला कीं, “ निवेदिता, तुझ्या शाळेचें कार्य यशस्वी होईल. भारतांतील महिलाशिक्षणाची तूं एक थोर प्रवर्तक आहेस.” शाळेचें काम जोरांत सुरू झालें. सनातनी महिला आपल्या मुली शाळेंत पाठवीनात. निवेदितांनीं पडदानशीन स्त्रियांच्या सैंपाकघरांत जाऊन शिकवण्यास आरंभ केला. लहान मुली, प्रौढ स्त्रिया आणि बालविधवा या सर्वांच्या शिक्षणास सुरवात झाली. निवेदितांच्या शाळेंत जागा पुरेना इतक्या मुली येऊं लागल्या. निवेदिता शिकवण्यांत दंग झाल्या. देहभान विसरल्या. एक दिवस एक इंग्रज प्रवासी त्यांची शाळा पहाण्यास आला. त्यानें दाराशीं टक् टक् केलें. निवेदिता लहान बालिकांच्या संगतींत बालगीतें म्हणत होत्या. पुन्हा टक् टक् आवज झाला. निवेदितांनीं दाराकडे पाहिलें. तो प्रवासी नमस्कार करून म्हाणाला, “ तुम्ही काय करीत आहांत ? ” तपस्विनी निवेदिता म्हणाल्या, “ मी माझ्या लहानग्या देवतांची सेवा करीत आहें. ” हें उत्तर वाचल्यावर आपल्याला भगवान् रामकृष्णांनीं विवेकानंदांना जो उपदेश केला त्याची आठवण होते. समाधीच्या अवस्थेंत रामकृष्ण उद्गारले कीं, “ मी मदत करतों अशी उद्धट भाषा बोलूं नका. शिवस्वरूपांत जिवाची सेवा करा. सेवा करण्याची संधि मिळाली म्हणून त्या जगन्नियन्त्याचे आभार माना. ”

बंगालमध्यें कांहीं ठिकाणीं महापूर आला. गांवें वाहून गेलीं. दुष्काळ पडला. हें पाहून निवेदितांचें अंतःकरण तिळतिळ तुटूं लागलें. त्यांनीं अनेक स्वयंसेविका जमवल्या. व्याख्यानें दिलीं. पैसे जमविले आणि निराश्रित झालेल्या लोकांना मदत केली. युद्धांत जायबंदी झालेल्या हजारों सैनिकांची फ्लॉरेन्स नाइटिंगेल या परिचारिकेनें सेवा केली. फादर डेमियन हा महारोग्यांच्या शुश्रूषेकरितां धाऊन गेला. त्याचप्रमाणें भगिनी निवेदितांनीं दुष्काळांत सांपडलेल्या किसानांची सेवा केली.

१९१० साल सुरू झालें. निवेदितांना त्रेचाळिसावें वर्ष लागलें. रात्रंदिवस केलेल्या कष्टांमुळें त्या जराजर्जर दिसूं लागल्या. तशांत कलकत्त्यांत प्लेग सुरू झाला. इस्पितळांत रोग्यांची दाटी झाली. भगिनी निवेदिता या रोग्यांच्या सेवेकरतां रात्रंदिवस कष्ट करूं लागल्या. एक दिवस एक-दोन वर्षांचें लहान मूल घेऊन एक मनुष्य आला. तो म्हणाला, “ भगिनी, या तान्हुल्याचे आईबाप प्लेगनें वारले. यालाहि प्लेगची गांठ आली आहे. मी या कुटुंबाचा शेजारी. आपली दयाशीलता ऐकून मीं आपल्याकडे धांव घेतली. आपण या मुलाची व्यवस्था पहाल काय ? ” भगिनी निवेदितांनीं त्या मुलाला हृदयाशीं घट्ट धरलें. डॉक्टरला बोलावलें. औषध सुरू केलें. रात्र झाली. त्या मुलानें कण्हत कण्हत डोळे उघडले. निवेदिता रात्रभर जागून त्या मुलाची शुश्रूषा करीत होत्या. त्या मुलानें त्यांच्या झग्याचें टोंक घट्ट धरून ठेवलें. दोन हजार मैलांवरून आलेली एक परदेशांतील महिला एका अनाथ बालकाचें संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत होती. त्या बालकाचे डोळे क्षीण होत चालले. त्यानें कष्टानें डोळे उघडले. कृतज्ञतेनें निवेदितांच्या प्रेममय मूर्तीकडे पाहिलें आणि शांतपणानें डोळे मिटले, ते पुन्हा उघडले नाहींत.

१९११ साल उजाडलें. निवेदितांना मलेरियानें ग्रासलें. लोकांनीं त्यांना विनंती केली कीं, ‘ दार्जिलिंगला चला. हवापालट केल्यावर तुम्हांला बरें वाटेल.’ निवेदितांनीं तें म्हणणें नाइलाजानें मान्य केलें. त्यांनीं आपलीं पुस्तकें आवरलीं, आपल्या आळींतील लहान बालबालिकांचा निरोप घेतला, आपल्या शाळेकडे डोळे भरून पाहिलें, गुरुदेवांचें स्मरण

केलें आणि दार्जिलिंगच्या प्रवासाला आरंभ केला. वाटेंत थांबावें लागलें. शेवटीं टप्प्याटप्प्यानें निवेदिता दार्जिलिंग येथें पोंचल्या. भोंवतालची हिमाच्छादित शिखरें पाहून त्यांना आनंद झाला. डॉक्टरचें औषध सुरू झालें. पण त्या औषधानें प्रकृति सुधारेना. मासिकाकरितां लेखन करणें, रोजच्या पत्रांना उत्तरें देणें, नियमानें नामस्मरण करणें, आपल्या बालविद्यार्थ्यांची चौकशी करणें, हें सर्व चालूच होतें. पण हे कष्ट त्यांना सहन होईनात. त्यांच्या लक्षांत आलें कीं, आपल्या प्रयाणाची वेळ जवळ आली आहे. त्यांनीं औषध घेण्याचें सोडून दिलें. थोडें चालण्याचे श्रमहि त्यांना घेतां येईनात. चार पावलें टाकलीं तरी धाप लागे. १३ ऑक्टोबर १९११ ही तारीख उजाडली. भगिनी निवेदितांच्या जीवनाची तगमग सुरू झाली. हळूहळू शुद्ध जात चालली. भारताबद्दल कांहीं अस्पष्ट उद्गार ऐकूं आले. भ्रमांत सुद्धां त्यांना या धर्मभूमीची आठवण राहिली होती. शेवटीं त्यांनीं डोळे उघडून अंतराळांत पाहिलें. एक हात वर केला आणि त्या म्हणाल्या, " ती पहा पूर्वदिशा आरक्त झाली. तो पहा प्रकाश ! तो पहा भारताचा उषःकाल ! " —हेच त्यांचे अखेरचे उद्गार. या उद्गारांनंतर त्यांची प्राणज्योत मालवली.

हिंदुपद्धतीनें निवेदितांच्या देहाचें दहन करण्यांत आलें. त्यानंतर भारतांतील प्रमुख वृत्तपत्रांनीं त्यांच्या कार्याचें सिंहावलोकन करणारे मृत्युलेख लिहिले. निवेदितांच्या कार्याचें महत्त्व सांगावें तितकें थोडेंच ! त्यांना सौन्दर्याची, कलेची आणि वाङ्मयाची आसक्ती होती. ज्वलज्जहाल राजकारणी असूनही निवेदितांना साक्षात्कारी संत असें म्हणतां येईल. त्यांच्या वक्तृत्वांत रणगर्जना होती. राष्ट्रभक्ति हा त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव होता. त्यांनीं भारतीय संस्कृतीचें महत्त्व पाश्चिमात्यांना पटवून दिलें. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विचारांचा संघर्ष समन्वयानें सोडविण्याचा प्रयत्न केला. स्त्रीजीवनांतील गुणसंपदेचा आदर्श त्यांच्या जीवनांत दिसून येतो. त्यांच्या आध्यात्मिक विभूतिमत्वाचें पृथक्करण करणें फार कठीण आहे.

*   *   *

भगिनी निवेदितांनीं Religion and Dharma असें शीर्षक देऊन कांहीं निबंध लिहिले. त्या निबंधांचा अनुवाद साने गुरुजींनीं दोन पुस्तकांमध्यें केला. त्यांचीं नांवें: ( १ ) समाजधर्म, ( २ ) राष्ट्रीय हिंदु धर्म. सोयीकरतां एकाच पुस्तकाचे हे दोन भाग केलेले आहेत. **'समाजधर्म'** या पुस्तकाच्या सर्व प्रती संपल्या म्हणून ही स्थूलवाचनाकरितां शालेय आवृत्ति तयार केली आहे. या आवृत्तीमध्यें मागील आवृत्तीमधील कांहीं कठीण निबंध वगळले आहेत. **' राष्ट्रीय हिंदु धर्म '** या पुस्तकांतील मुलांना उपयुक्त असे निबंध या आवृत्तींत घेतले आहेत. **' समाजधर्मा'**तील वगळलेले निबंध **' राष्ट्रीय हिंदु धर्मा '**च्या नवीन आवृत्तींत समाविष्ट करण्यांत येतील.

या पुस्तकांत सोळा निबंध आहेत. या निबंधांच्या वाचनानें आणि मननानें विद्यार्थ्यांना उंच वातावरणांत विहार करण्याचें सौख्य मिळेल. व्यावहारिक दृष्टीनेंही एक महत्त्वाचा लाभ होईल. परीक्षेंत विचारलेल्या चार निबंधांपैकीं एक निबंध चिंतनात्मक स्वरूपाचा असतो. हा निबंध लिहिण्यास **' समाजधर्मा '**ची मदत होईल. निबंधाबरोबर कल्पनाविस्तार हा एक नवीन प्रकार प्रवेशपरीक्षेच्या प्रश्नपत्रिकेंत घालण्यांत आला आहे. कल्पनाविस्ताराला योग्य अशीं वाक्यें **'समाजधर्मा'**त जाड टाइपांत घातलीं आहेत. त्या वाक्यांच्या पुढेंच त्या कल्पनेचें स्पष्टीकरण सांपडतें.

या पुस्तकाच्या वाचनांतून कांहीं निबंध सुचवितां येतील. तसेंच कल्पनाविस्ताराकरितां कांहीं वाक्यें उपयोगी पडतील.

## निबंधांकरितां विषय

( १ ) सामुदायिक प्रार्थना. ( २ ) सर्वसंग्राहक हिंदु धर्म. (३) अनुकरण. ( ४ ) प्राचीन शहरें आणि अर्वाचीन शहरें. ( ५ ) पंथप्रियता. ( ६ ) धर्माची आवश्यकता. ( ७ ) फुरसतीचा वेळ. ( ८ ) स्वातंत्र्य. ( ९ ) शिक्षकाचें महत्त्व. (१०) विद्यार्थी. (११) कलावंत. (१२) साधी राहणी व उच्च विचारसरणी. (१३) आपत्ति आणि चारित्र्यविकास. (१४) संयमाचें महत्त्व. (१५) प्रेम आणि प्रगति. (१६) यत्न तो देव जाणावा. (१७) यंत्रसंस्कृतीचे परिणाम. (१८) स्त्रीशिक्षण. (१९) बालकांचें शिक्षण. (२०) चारित्र्यविकास.

## कल्पनाविस्ताराकरितां वाक्यें

(१) सामुदायिक प्रार्थना हा युरोपनें लावलेला फारच मोठा शोध आहे. ( २ ) धार्मिक विचारांच्या बाबतींत युरोपमधील मोठा पंडितही हिंदुस्थानांतील एखाद्या शेतकऱ्यापुढें पोरकट ठरेल. ( ३ ) समाजसेवेचें जें कर्म आपणांस करतां येणें शक्य असेल तें हृदय ओतून करावें व मुक्त व्हावें असें श्रीगीता सांगत आहे. ( ४ ) ज्ञान हीच जीवनाची खरी भाकरी आहे. ( ५ ) पंथ म्हणजे घटना आहे; विघटना नाहीं. ( ६ ) ज्या धर्माला जिवंत रहावयाचें असेल त्यानें वाढलें पाहिजे. ( ७ ) धर्म जिवाशिवांचें ऐक्य करतो; त्याचप्रमाणें मानवजातीचेंही करतो. ( ८ ) आपल्याला रिकामा मिळालेला वेळ आपण कशांत खर्च करतों यावरून आपल्या शिक्षणाची खरी परीक्षा होत असते. ( ९ ) अंगबळापेक्षां अकलेचें बळ अधिक; परंतु अकलेच्या बळापेक्षां चारित्र्याचें बळ अधिक. (१०) ज्यांच्या जीवनांत धडपड उरत नाहीं ते जिवंत असून मेलेलेच असतात. (११) आपल्या लहरींच्या ताब्यांत जाणें म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. (१२) जो जो आपणांस भेटेल त्याच्याकडे हा ज्ञानदाता आहे या दृष्टीनेंच बघावें. ( १३ ) जो सद्गुरु असतो तो कांहीं एक मागत नसतो. (१४) पैशाचा किंवा नांवलौकिकाचा हेतु जर कलावस्तूच्या निर्मितीच्या मुळाशीं असेल तर कलेंतील सारा अभिजात मोठेपणा नाहींसा होतो. (१५) सेवा, दारिद्य, असहायता ह्या धीरवान् लोकांच्या शाळा आहेत.

५ ऑक्टोबर, १९५२.

त्र्यंबक गणेश बापट,
शिक्षक, भावे स्कूल, पुणें २.

# स मा ज ध र्म

## समाज : १ :

### सामुदायिक प्रार्थना

खिस्ती लोकांच्या चर्चमध्यें त्यांच्या प्रार्थनेच्या वेळीं जावें म्हणजे युरोपीयन लोकांची संघटनाशक्ति, त्यांचें सहकार्यचातुर्य, त्यांचा व्यवस्थितपणा, त्यांची टापटीप या सर्व गुणांचा आपल्या मनावर खोल ठसा उमटल्याशिवाय राहणार नाहीं. खिस्ती धर्मांतील धर्मविचार, हिंदुधर्मांतील अत्यंत संपन्न व परमोच्च विचारांसमोर पोरकट दिसतील, अर्धवट दिसतील, खालच्या पायरीचे दिसतील; परंतु त्यांच्या प्रार्थनेंतील गंभीरता, सुंदरता, उठावदारपणा या गोष्टी आपल्याकडे दिसणार नाहींत. या बाबतींत आपण त्यांच्याशीं तुलनेस उभे राहूं शकणार नाहीं.

**सामुदायिक प्रार्थना हा युरोपनें लावलेला फारच मोठा शोध आहे यांत शंका नाहीं.** ज्यानें ही प्रथा पाडिली त्याची बुद्धि फारच विशाल असली पाहिजे, जीवनाचा ठाव घेणारी असली पाहिजे. युरोपीयन बुद्धीची व हृदयाची येथें फार मोठी उंच उडी आहे यांत शंका नाहीं. सामुदायिक प्रार्थना प्रथम ज्यू लोकांत बीजरूपानें होती; मुसलमानांनीं त्या कल्पनेचा जास्त फैलाव केला. धर्मयुद्धाच्या काळांत—क्रूसेडसच्या काळांत—सारें युरोप इस्लामी संस्कृतींतील विचारांनीं भरून गेलें होतें. मुसल्मानी विचार युरोपमध्यें सर्वत्र पसरले, जिकडे तिकडे रुजले. युरोपीयन विचारांत इस्लामी विचार मिळून गेले, एकरूप होऊन गेले. पुढें १४५३ मध्यें तुर्की लोकांनीं कॉन्स्टँटिनोपल घेतलें व नवयुगाला सुरवात झाली. नवयुगाला सुरवात होतांना कोणकोणत्या गोष्टींना, कोणकोणत्या विचारांना, कोणकोणत्या भावनांना महत्त्व दिलें गेलें, हें कोण आज काय सांगणार? राष्ट्राच्या किंवा व्यक्तीच्या जीवनांत कोणत्या गोष्टीचा ठसा खोल उमटतो, कोणतें विचारबीज पेरलें जातें, कोणते विचार जोरानें फोफावतात, हें कोण सांगू शकेल? तुर्की लोकांनीं

कॉन्स्टँटिनोपल घेतलें व तेथून जे ख्रिस्ती लोक युरोपमध्यें गेले त्यांनीं ही तुर्कांची सामुदायिक प्रार्थना, इस्लामीयांची सामुदायिक प्रार्थना तिकडे सर्वत्र रूढ केली नसेल ना?

कांहींही असो, ख्रिस्ती धर्म हा आरंभीं आशियांतील विचार असला, पौर्वात्य विचार असला, तरी त्याचें अंतिम पर्यवसान आजच्या युरोपीयन प्रॉटेस्टंट पंथांत झालें आहे खरें. सामुदायिक प्रार्थनेचा विचार ज्यू व इस्लामी संस्कृतींत उत्पन्न झाला व त्याचें परिणत रूप आज इंग्लंडमधील प्रॉटेस्टंट पंथांत दिसून येतें. कोणतें बीज कोठें उडून जाईल व वाढेल याचा नियम नसतो. पूजाकर्मांतील सामुदायिक प्रार्थनेचें अंग हें अत्यंत महत्त्वाचें आहे यांत शंका नाहीं.

सामुदायिक प्रार्थना हिंदुधर्मांत असलीच तरी ती अविकासित रूपांत आहे. उपाध्यक्ष व यजमान यांपलीकडे सामुदायिक प्रार्थनेचा विकास झाला नाहीं. हिंदुधर्मांतील प्रार्थनेची कल्पना इतकी तीव्र, भावनोत्कट व प्राणमय असते, ही कल्पना इतकी आंतरिक व जिव्हाळ्याची असते कीं, ती सामुदायिक करणें, चव्हाट्यावर मांडणें, लोकांना कसेंसेंच वाटतें. हिंदुमताचा या विचारानें गोंधळ होतो. हिंदुधर्मांत व्यक्ति पूजा करिते, व्यक्ति प्रार्थना करिते. परंतु पूर्वीं कोणींतरी रचिलेली प्रार्थना व्यक्तीकडून म्हणण्यांत येते. प्रार्थना रचणाऱ्याची भूमिका तीच प्रार्थना म्हणणाऱ्याची असते असें नाहीं. ठराविक मंत्र, ठराविक स्तोत्रें व प्रार्थना व्यक्ति म्हणते. परंतु तीं स्तोत्रें व त्या प्रार्थना न मानणारे जे युरोपीयन लोक त्यांना नॉन्कॉन्फर्मिस्ट म्हणतात. परंपरेनें चालत आलेल्या ठराविक व निश्चित प्रार्थना म्हणणें ते नाकारतात. स्वतःस योग्य वाटेल त्या शब्दांनीं ते देवाला आळवतात. ज्या दिवशीं जी प्रार्थना रुचेल ती ते म्हणतात. परंतु आपल्याकडे तसें नाहीं. कोणी रुद्र म्हणेल, कोणी सौर म्हणेल, कोणी ठराविक हरिपाठाचे अभंग म्हणतील, कोणी रामरक्षा, ठराविक करुणाष्टकें म्हणतील. त्या प्रार्थनेशीं आपण एकरूप होत नाहीं, होऊं शकत नाहीं. प्रार्थना व पूजा यांत्रिक झाल्या आहेत.

ख्रिस्ती धर्मांत ऋषि फार नाहींत व संतहि फार थोडे. अनेक शत-कांनीं एखादा साधु फ्रॅन्सिस जन्माला येतो; एखादी जोन ऑफ् आर्क

आढळते. आणि हे संत सुद्धां ज्या पंथांत मूर्ति, भजन, जप, तप, साधन वगैरे गोष्टी राहिल्या आहेत, त्या पंथांतच बहुधा जन्मास आलेले आहेत. परंतु युरोपची शक्ति, ख्रिश्चन धर्माची शक्ति, ज्या कांहीं अपवादात्मक विभूति निर्माण होतात त्यांवर अवलंबून नाहीं. बहुजनसमाजाच्या विकासांत युरोपची शक्ति आहे, त्यांत युरोपचे सामर्थ्य आहे. फार अत्युच्च मोठेपणांत, परमथोर विभूतिमत्वांत युरोप मागें पडेल; परंतु व्यावहारिक धर्मांत, रोजच्या धर्मांत, युरोप श्रेष्ठ आहे. थोड्याशाच परंतु निश्चित कल्पना, न दबण्याची वृत्ति, रोजच्या व्यवहारांतील मोक्ष व स्वातंत्र्य या गोष्टी तिकडील बहुजनसमाजांत आढळून येतील. ज्या वेळेस सर्व समुदायाला बरोबर घेऊन जावयाचें असतें त्या वेळेस पुष्कळशी छाटाछूट करूनच पुढें जावें लागतें. सर्वसाधारण जनतेला परमोच्च ध्येय मानवत नाहीं, झेपणार नाहीं. यासाठीं ख्रिश्चनधर्मानें मोठमोठ्यांचीं डोकीं उडवलीं आहेत. फार उंच जाणारे आम्हांला नकोत असें ख्रिश्चनधर्म सांगत असतो. सर्वांचीं डोकीं सारखींच उंच होऊं द्या असें तो म्हणतो. पाय एकाच भूमीवर व डोकीं एकाच पातळींत. कोणीहि फार खुजा दिसूं नये, बुटगेपणा दिसूं नये, म्हणून फार उंच लोकांना ख्रिश्चन धर्मानें दूर केलें आहे. ख्रिश्चन धर्माला एखादा हिमालय व बाकीचीं सारीं ढेपळें, असें नको आहे. त्यांना सर्व टेकड्या पाहिजे आहेत. त्यांचीं प्रार्थना ही सामान्य लोकांसाठीं आहे; म्हणून त्यांनीं ती सुंदर केली, साधी केली; त्याला त्यांनीं संगीताची जोड देऊन प्रार्थनेंत आकर्षकता आणली. ज्ञानापेक्षां सेवेला ख्रिश्चन धर्म थोर मानतो, भक्तीपेक्षां सार्वजनिक उपयुक्ततेला महत्त्व देतो, तिच्यावर भर देतो. ख्रिश्चन धर्मानें आपलें ध्येय बेताचें उंच केलें आहे व त्या ध्येयाप्रत सर्वांनीं जावें, सुसंघटित, स्वाभिमानी, तेजस्वी व बळकट होऊन जावें, अशी व्यवस्था केली आहे.

**धार्मिक विचाराच्या बाबतींत युरोपमधील एखादा मोठा पंडितहि हिंदुस्थानांतील एखाद्या शेतकऱ्यापुढें पोरकट ठरेल;** याच्या उलट युरोपमधील झाडूवाल्यासहि सार्वजनिक कर्तव्याची व

हक्कांची जी जाणीव असते, ती आमच्याकडील मोठमोठ्या पुढाऱ्यांस व मुत्सद्यांसहि नसते.

आज ध्येयाची देवाणघेवाण करण्याची वेळ आली आहे. मानवजातीस आपल्या मुलांना तेच तेच धडे शिकवावयास अवसर नाहीं. मानवजातीची अशी अपेक्षा आहे कीं, पृथ्वीच्या एका भागांत जो धडा तिनें शिकवला तो जगांतील इतर लोकांनीं घ्यावा व आपलासा करावा. पौर्वात्य विचार पाश्चिमात्य जगाला लौकरच जिंकून घेणार यांत शंका नाहीं; आणि पौर्वात्यांच्या विकासाला पाश्चिमात्य ध्येयें व पद्धती येथे येऊन हातभार लावतील ही गोष्ट सुद्धां तितकीच खरी आहे. एकमेकांनीं एकमेकांस पूर्ण व्हावयास मदत करावयाची आहे. एकमेकांचें विशिष्टत्व नाहींसें करावयाचें नाहीं; एकमेकांस दूर करावयाचें नाहीं. पूर्व पश्चिमेस हात देईल व पश्चिम पूर्वेच्या मदतीस येईल. **ईश्वराच्या या विश्वमंदिरांत पूर्व व पश्चिम एकमेकांचे हात धरून प्रेमानें फुगडी घालतील.**

भविष्यकाळांत हिंदुधर्म सुद्धां बहुजनसमाजाच्या विकासांत भाग घेतल्यावांचून राहणार नाहीं. सामुदायिक प्रार्थनेचें महत्त्व हिंदुधर्म समजून घेईल. सामान्य लोकांच्या शिक्षणाचा, त्यांच्या विकासाचा विचार वरच्या लोकांच्या मनांत डोकावेल व तो त्यांना स्वस्थ बसूं देणार नाहीं; सेवेचे विचार, कर्मांचीं ध्येयें डोळ्यांसमोर उभीं राहतील; साक्षात्काराचें परमोच्च ध्येय सामान्य जनतेसाठीं खालीं येईल. यशोदेसाठीं परमात्मा बाळकृष्ण होईल. विराट् विश्वमूर्ति अर्जुनासाठीं चतू भुजांनीं नटेल. हिंदुधर्म सामान्य लोकांसाठीं जरा खालीं येणार नाहीं का? जरा खालीं वांकून आपल्या मुलांबाळांशीं हितगुज करणार नाहीं कां? साक्षात्काराचें आपण कौतुक करतों, तेंच कौतुक सेवा करणाऱ्या पुरुषांचेंही आपण करूं. याचा अर्थ असा नाहीं कीं, ईश्वराकडे जाण्यासाठीं जीवानें विरक्त, निरसंग, अलिप्त राहावें, हा जो विचार तो आपण सोडून देत आहोंत. परंतु हा विचार हृदयांत बाळगूनहि, ही दृष्टि जवळ ठेवूनहि, आपण सामान्य जनांच्या विकासासाठीं, त्यांच्या सुप्त शक्ति जागृत करण्यासाठीं झटूं; त्यांच्याहि हृदयांतील देवाला जागृत करणें हें

तितकेंच महत्त्वाचें काम आहे; त्यांच्या जीवनाला फुलण्यास मदत करणें हें तितकेंच आवश्यक व पवित्र कर्तव्य आहे हें ओळखूं; या गोष्टीवर जोर देऊं. आपणांत जे निरनिराळे पंथ व समाज उत्पन्न होत आहेत यावरून असें दिसतें कीं, ही सेवेची दृष्टि, हें नवीन रूप हिंदुधर्म घेत आहे. आर्यसमाज, ब्राह्मणसमाज वगैरे समाज याच दिशेनें चालले आहेत; हा नवयुगधर्म सुरू होत आहे.

अर्वाचीन सनातन हिंदुधर्मानें लोकहिताचें, लोकजागृतीचें, लोकांचे संसार सुंदर व मंगल करण्याचें, जीवन तेजस्वी व बलवान् करण्याचें असें हें सेवामय स्वरूप जर आपलेंसें केलें नाहीं, तर तरणोपाय नाहीं. हिंदुधर्माला जर तेजस्वी व्हावयाचें असेल, बलवान् , जयिष्णु व्हावयाचें असेल, जगाचें मन ओढून घ्यावयाचें असेल, स्वतःच्या इकडे तिकडे जाणाऱ्या, इतर धर्मांत जाणाऱ्या मुलांना जवळ ठेवावयाचें असेल, परधर्मांतील श्रद्धाळू लोकांना बाहु पसरून जवळ ओढावयाचें असेल, तर अतःपर हिंदुधर्मानें सर्वांपासून दूर असलेल्या उत्तुंग व परमोच्च अशा साक्षात्काराच्या ध्येयापासून खालीं आलें पाहिजे. हिमालयांतील शंकराच्या जटाजुटांतील गंगा खालीं आली पाहिजे व तिनें मैदानावर येऊन लाखों लोकांचीं शेतेंभातें पिकविलीं पाहिजेत. संन्यासाच्या, साक्षात्काराच्या कैलासावरून सेवेच्या मैदानांत, शेतकरी-मजूर यांच्या रोजच्या जीवनांत साहाय्य करण्यासाठीं धर्मानें खालीं आलें पाहिजे. हिंदुधर्माच्या प्रार्थनांत सर्व लोकांना स्थान पाहिजे. त्यांच्या आकांक्षा, त्यांचीं सुखदुःखें, त्यांचीं जीवनें, त्यांचीं हृदयें यांचें प्रतिबिंब त्या प्रार्थनांतून पडलें पाहिजे. एकत्र जमून सर्वांनीं त्या प्रार्थना म्हटल्या पाहिजेत, तन्मयता निर्माण झाली पाहिजे. प्रार्थना चालली असतांना लोकांचें हृदय बोललें पाहिजे व तोंडही उघडलें पाहिजे. साऱ्यांनीं प्रार्थनेस केव्हां जमावयाचें, कोठें जमावयाचें, हें ठरलें पाहिजे, व्यवस्थितपणा आला पाहिजे. मंदिरांतील व्यासपीठें आतां प्रवचनपीठें होऊं देत, व्याख्यानस्थानें होऊं देत. तेथून साक्षात्कार व संन्यास या परमोच्च ध्येयाचें, जग म्हणजे माया आहे, "का ते कांता कस्ते पुत्रः" वगैरे उपदेशाचे न झेपणारे व न पेलणारे, बोलणारांनाहि केवळ ओठांपुरते आणि ऐकणाराला फक्त कानांपुरते, असे घुटके पाजण्याऐवजीं

**लोकांना रोजच्या जीवनांत व रोजच्या कामकाजांत, रोजच्या व्यवहारांत उपयोगी पडेल असें शास्त्रीय ज्ञान, आरोग्यज्ञान, सहकर्मज्ञान, संघटनाज्ञान या मंदिरांतील व्यासपीठावरून दिलें गेलें पाहिजे.** असें केल्यामुळें वैयक्तिक पूजा—जिवाशिवाचें एकांतांतील बोलणें, तें देवभक्तांचें हितगुज—नाहींसें होईल असें नाहीं. आपल्या ज्या धार्मिक खजिन्यांची—जुन्या ठेवण्यांची—किंमत आतांशीं फिरून कळूं लागली आहे ते खजिने, ते ठेवे, आपण गमावूं अशी कोणालाहि भीति वाटावयाला नको.

हे दिवस असे आहेत कीं, देव आपणांवर नवीन विचारांचा वर्षाव करीत आहे; नवीन कर्तव्यें, नवीन रस्ते भगवान् दाखवीत आहे; नवीन संस्कृतीचा प्रकाश दाखवीत आहे. अशा वेळेस हिंदुधर्मानें कोपऱ्यांत बसून चालणार नाहीं. धर्मानें पुढें आलें पाहिजे. या नवविचारांची, नवभावनांची केवळ उपेक्षा करून भागणार नाहीं, त्यांना शिव्याशाप देऊन चालणार नाहीं. हिंदुधर्मानें त्यांचा अंतर्भाव करावयास, संग्रह करावयास, पोट विशाल केलें पाहिजे. हे नवविचार आपणांत मिळवून, आपला त्यांच्यावर शिक्का मारून, आपले म्हणून, निरनिराळ्या रूपांत प्रकट केले पाहिजेत. प्राचीन काळांत, आपल्या पूर्व इतिहासांत, प्रत्येक सामाजिक वा राष्ट्रीय जागृतीचा प्रश्न धर्मानेंहि उचलला होता; त्या त्या जीवनांच्या नानाविध क्षेत्रांत धर्म बेफिकीर राहिला नव्हता. आपल्या प्राचीन इतिहासांत राष्ट्रीय आकांक्षा, राष्ट्रीय भावना व राष्ट्रीय विचार यांचें प्रतिबिंब धर्मांत पडलेलें दिसून येईल. अशानेंच धर्म श्रीमंत होतो, संपन्न होतो, विकासित होतो. यामुळें आपलें कांहीं एक जाणार नसून उलट कांहींतरी अधिक मिळणारच आहे. सामान्य जनतेसाठीं आज कर्माला प्राधान्य देऊं, सेवेला महत्त्व देऊं. शेती उत्कृष्ट आहे, ती पूजाच आहे, कर नीट; रस्ता झाडणें पवित्र आहे, नीट झाड; असें धर्मानें आज सांगितलें पाहिजे. याचा अर्थ असा नाहीं कीं, ज्ञान व भक्ति हा जो ईश्वराच्या कांहीं थोड्या आवडत्या जीवांचा मार्ग तो नाहींसा होईल. ज्ञान व भक्ति आणि त्यामुळें मुक्ति हा मार्गहि राहीलच. परंतु सेवेंत व कर्मांतहि मुक्ति आहे—हाहि मोक्षाचाच मार्ग आहे—असें सांगा, हें दालन नीट खुलें करा. तुमचें ज्ञानभक्तीचें दालन खुलें आहे; परंतु तेथें अनेकांना जातां येत नाहीं व

जमतां येत नाहीं. परंतु सेवारूप जें सामाजिक कर्म त्या दालनांत अनेकांना जमतां येईल. " स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।" —आपणांस जें योग्य करतां येईल, **समाजसेवेचें जें कर्म आपणांस करतां येणें शक्य असेल—मग तें शेती, विणकाम, कुंभारकाम, मृत ढोरें फाडण्याचें काम, कोणतेंहि असो—तें नीट हृदय ओतून करावें व मुक्त व्हावें—असें श्रीगीता सांगत आहे.** गीतेनें सर्वांना मोक्ष खुला केला आहे. कर्माचें महान् दालन सर्वांना उघडलें आहे. तुमचें ज्ञान—भक्तीचें दालन ज्या तुम्हां दोन चार जणांना लागेल त्यासाठीं खुलें आहेच व हेंहि मोकळें होऊं दे. खरोखर या तिन्ही दालनांतील हवा एकमेकांत गेली पाहिजे. तीं अगदीं अलग असतांच कामा नयेत. हिंदुधर्म हा स्थाणु नसून गतिमान् आहे. तो सदैव विकासित होणारा नवीन पानांफुलांनीं नटणारा, सदैव सतेज व टवटवीत राहणारा आहे, हें सत्य आपणांस सिद्ध करून द्यावयाचें आहे. हिंदुधर्म अनादि आहे, तसाच अनंतहि आहे. ज्याची वाढ पुरी झाली त्याला अंत येणार—फळ पिकलें कीं पडणार ! हिंदुधर्म सदैव वाढतच राहणार व म्हणूनच तो सदैव राहील. नदी वाहते म्हणून तेजस्वी आहे; सांचेल तर घाण होईल. हिंदु-धर्माला सार्थ व कार्यकर सनातनत्व पाहिजे असेल तर त्यानें वाढत राहिलें पाहिजे, नवीन नवीन घेत राहिलें पाहिजे. हिंदुधर्म असा संग्राहक आहे, विकासक्षम आहे, तें जगाला दाखवून द्या.

* * *

# सहकार्य : २ :

सहकारी तत्त्वावर, परपस्परसाहाय्याच्या तत्त्वावर, ख्रिश्चन लोकांनीं युरोपमध्यें जसें काम चालविलें आहे, त्याच नमुन्यावर किंवा त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान यांनीं केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पाश्चिमात्य नाचतात तसें आपण नाचावें असा ह्या सांगण्यांतील हेतु नाहीं; पाश्चिमात्यांचें सदैव अनुकरण करीत राहावें असेंहि कोणाचें

म्हणणें नाहीं. अनुकरण करणें निराळें आणि पाश्चिमात्यांच्या संस्थांचें स्वरूप व महत्त्व समजून घेऊन आपण तशाच गोष्टी आपल्यास अनुरूप व आपल्या परंपरेस शोभतील अशा स्वरूपांत प्रकट करणें हें निराळें. पाश्चिमात्य संस्कृति व पाश्चिमात्य जीवनपद्धति आपल्याकडे आल्यामुळें आपल्या बहुमोल अशा संघटनेच्या प्राचीन संस्था नष्टप्राय झाल्या आहेत. जुन्या ग्रामसंस्था, त्यांच्यांतील सहकार्य व जूट, त्यांतील साधी, सुटसुटीत, कालापव्यय न करणारी आणि परिणामकारी अशी कार्यपद्धति, ती नैतिक व्यवस्था, प्रत्येक गोष्टींतील सहेतुकता व उपयुक्तता, उच्च विचार व श्रेष्ठ त्याग यांचें स्वागत करावयास सदैव सज्ज असणारी वृत्ति–हें सर्व आतां नाहींसें झालें. आज सतरा ठिगळें लागलेली बेढब अशा नागरसंस्कृतीची–शहरांत रूढ झालेल्या या नवसंस्कृतीची–गोधडी आपल्या अंगावर पडली आहे. पूर्वीची शाल गेली व ही गोधडी आली.

मध्ययुगांतील आपलीं नगरेंहि व्यवस्थित होतीं. त्यांच्या व्यवस्थेंत हेतुबद्धता होती. मध्ययुगी भारतीय नागरजीवनांत परस्परसहकार्य होतें. उत्कृष्ट जीवरचना होती. येथें उगीच बजबजपुरी व बाजारबुणगेपणा नसे. उत्कृष्ट संस्कृतीचें दर्शन तेथें होत असे. सुव्यवस्थेशिवाय संस्कृति नाहीं. पूर्वी जो कोणी काशी किंवा अलाहाबाद येथें जाई, तो आपापल्या विशिष्ट लोकांच्या वस्तींतच उतरे. दक्षिणी ब्राह्मणांच्या पुऱ्यांत दक्षिणी ब्राह्मण जाई; बंगाली लोकांच्या वस्तींत वंगीय जाई. आलेल्या मनुष्याच्या भोंवतीं लगेच त्या त्या पुऱ्यांतील लोक जमावयाचे, विचारपूस व्हावयाची, मित्र भेटायला येत, लगेच ओळखी होत. आलेल्या मनुष्याची व्यवस्था तावडतोब लावण्यांत येई, त्याला साहाय्य दिलें जाई, त्याला सल्ला मिळे. याप्रकारें तो नवखा मनुष्य तेथील संस्कृति पाहूं शके व ती आपलीशी करून घेऊं शके. जोंपर्यंत तो त्या नगरांत राही तोंपर्यंत तो पुरा म्हणजेच त्याचें घर. पुरा म्हणजे त्याचें जणूं एक मंडळ असे, क्लबच असे म्हणा ना. आलेला नवीन मनुष्य आजारी पडला तर त्याची शुश्रूषा होई, औषधपाण्याची व्यवस्था केली जाई. त्याला कोणत्याहि प्रकारची वाण तेथें कोणी पडूं देत नसे. अर्वाचीन शहरांतूनहि महाराष्ट्रसंघ, वंगीय मंडळ, तामील आश्रय वगैरे तत्तत्प्रांतीयांच्या संस्था असतात; परंतु ह्या संस्थां-

पेक्षां पूर्वींचे ते पुरे फारच उत्कृष्टपणें कार्य करीत व उपयोगी पडत. कारण आलेल्या नवख्या मनुष्यास आपल्या बंधूचें सारें जीवन अंतर्बाह्य पाहतां येत असे. या शहरांतच सुसंघटित असें जातीय मतप्रदर्शन होई, व त्याचा परिणाम व प्रसार अन्यत्र दूरवरच्या प्रांतांताहि होई. या मोठमोठ्या नगरींतून प्रथम मतध्वनि उठत व त्यांचें पडसाद मग सर्वत्र जात. एकाच नगरांत भिन्न भिन्न जातीय संघ असत. हे संघ उदार असत. संघांतील वातावरण मोकळेपणाचें असे. बंधुभाव व स्नेहभाव भरपूर असे. शुष्क औपचारिक पद्धतीस तेथें वाव नसे; तेथें जिव्हाळा असे. या संघांना श्रीमंत लोक राजाप्रमाणें देणग्या देत असत. अशा रीतीनें सामाजिक वातावरण, तत्तत् जातीय वातावरण, तत्तत् प्रांतीय वातावरण शुद्ध ठेविलें जाई. या जातीय जीवनाचा विकास होई, सांभाळ होई. समाजाचें किंवा त्या त्या जातींतील लोकांचें आदर्श आचरण कसें असावें, शील कसें असावें, हें अशा संघांकडून दिग्दर्शित केलें जाई. हे संघ म्हणजे दीपस्तंभ असत, मार्गदर्शक असत. प्राचीन नगरांतून अशी ही परंपरा उत्कृष्टपणें पाळली जाई. कल्पना करा कीं, एखादा दक्षिण हिंदुस्थानांतील विद्यार्थी काशींत शिकण्यासाठीं म्हणून गेला; तर तेथें आतांच तो आपल्या प्रांतांतील आपल्या जातीच्या लोकांतच राहावयास जाई. यामुळें शहरांतील मोह किंवा व्यसनें यांपासून तो पहिल्यासूनच दूर राही. जणुं आपल्या स्वतः-च्याच दुसऱ्या घरांत राहावयास आपण आलों असें त्यास वाटे; आप-ल्याच वडीलधाऱ्या मंडळींत आपण वावरत आहोंत असें त्याला वाटे. त्याच्या सभोंवतालचे लोक त्याच्याच प्रांतांतील, त्याच्याच जिल्ह्यांतील असत. आपण अयोग्य रीतीनें वागलों तर ती बातमी आज ना उद्यां आपल्या घरीं जाईल अशी त्याला भीति वाटे. कारण त्याच्या प्रांतांतील जाणारे येणारे नेहमीं असतच व ते तेथेंच उतरत. आपल्या गांवीं जर आपल्या वाईट वर्तनाची बातमी गेली तर आपल्या आईबापांस खालीं मान घालण्याची पाळी येईल हा विचार त्या तरुण विद्यार्थ्याच्या मनांत सदैव जागृत असे व म्हणून तो जपून, सावधगिरीनें वागे.

**हे भारतांतील प्राचीन शहरांतील चित्र डोळ्यांसमोर आणलें व आजच्या शहरांतील चित्राहि मनासमोर आणलें, तर केवढा**

**विरोध दिसतो** ! हा विरोध पाहून मनाला वाईट वाटते. कलकत्त्यासारख्या शहरांत हजारों मुसलमान खेड्यांपाड्यांतून येतात व गाडीवान् होणें, टांगा, बगी हाकणारे होणें, हे यांचे धंदे असतात. या जीवनांत कसे पदोपदीं मोह असतात तें सांगण्याची आवश्यकता नाहीं; त्या गोष्टी सुप्रसिद्धच आहेत. दारू, विडी, पानपट्टी, हॉटेल यांनीं बनलेली त्यांची संस्कृति असते. दुर्दैवानें दारूचे गुत्तेहि ठिकठिकाणीं उघडले जात आहेत, वाढत आहेत ! ज्यानें त्यानें आपल्याच मोहल्ल्यांत जाऊन राहण्याची चाल मागें पडत चालली. वाटेल तेथें मनुष्य राहतो, म्हणजे वाटेल तें करावयास हरकत रहात नाहीं. कोण बघणार, कोण हटकणार, कोण आपल्या घरीं कळवणार? अशा प्रकारची राहाणी रूढ होऊं पहात आहे. शहरांतील या अनिर्बंध व स्वच्छंद राहणीमुळें खेड्यांतील शेंकडों सुखी कुटुंबांचें सुख मातींत मिळत असलें तर त्यांत आश्चर्य कसलें ? कलकत्त्यांत गेलेल्या या मजुरांच्या व्यसनमय जीवनामुळें खेड्यांतील त्यांच्या घरीं अश्रु पडत असतात.

इतकें आहे तरीहि जगांतील इतर देशांतील लोकांपेक्षां हे आपले लोक अजून अधिक वरच्या दर्जाचे आहेत. सभोंवतालच्या परकी लोकांच्या संसर्गामुळें व परकी संस्कृतीनें आणलेल्या व्यसनामुळें, फॅशनीमुळें, ज्या गरीब माणसाचें जीवन शहरांत बिघडून जातें, जो गरीब मनुष्य मोहांत व व्यसनांत बुडून जातो, तोच मनुष्य पोटाला एकदांच खाऊन खेड्यांतील आपल्या घरीं कांहीं पैसे पाठवीतच असतो ! किती त्याची धडपड ! या हल्लींच्या काळीं हिंदी नोकरांच्या जीवनांत जो त्याग दिसून येत आहे तो इतिहासांत नमूद केला जाणार नाहीं हें खरें आहे. परंतु आज आपल्या देशांतील अगदीं साधे सामान्य असे लोकहि पोटाला इतके चिमटे घेत आहेत, स्वतःच्या क्षुधेवर एवढें नियंत्रण घालीत आहेत, स्वतः इतके उपासतापास काढीत आहेत कीं, **अशा त्यागी माणसांना इतर देशांनीं हुतात्मे म्हणून गौरविलें असतें** ! या त्यागाला तोड नाहीं.

आजच्या विद्यार्थ्यांनीं सभोंवतालच्या सामाजिक प्रश्नांचा विचार करावयास लागण्याची पाळी अजूनहि आली नाहीं कां ? आपल्या राष्ट्रासाठीं आपण काय केलें पाहिजे, आपापली स्थिति सुधारण्यासाठीं

लोकांनीं काय केलें पाहिजे, लोकांत बळ कसें येईल, उत्साह कशानें येईल, त्यांना खाण्यापिण्यास पोटभर कसें मिळेल, या प्रश्नाचा विचार तरुण विद्यार्थ्यांनीं नको का करावयाला? नवीन धर्मतत्त्वें शोधून काढण्याची जरूरी नाहीं. आपल्या पूर्वजांच्या कृपेनें त्यांचा भरपूर ठेवा आपणांला लाभलेला आहे. नैतिक भावना आज प्रत्यक्ष रोजच्या व्यवहारांत, रोजच्या वागणुकींत कशा आणाव्या, कशा आणतां येतील, हा प्रश्न आहे. नैतिक भावनांच्या आधारावर सहकारी संस्था, परस्परसाहाय्यक मंडळें कशीं स्थापावीं हा प्रश्न आहे. पूर्वजांचीं ध्येयें कृतींत कशीं आणावयाचीं, "सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।" हा मंत्र केवळ पोपटाप्रमाणें म्हणत न बसतां प्रत्यक्ष आचरणांत कसा आणावयाचा व सत्य करावयाचा, दैन्य हरून सुखाचा सुकाळ कसा करावयाचा, हा प्रश्न आहे; रोग हरून आरोग्य सर्वांस कसें द्यावयाचें हा प्रश्न आहे.

शहरांतील प्रत्येक विद्यार्थ्यानें स्वतःच्या मनाला पुढील प्रश्न विचारावा—"**माझ्या गांवांहून ह्या शहरांत आलेले शूद्र लोक कोठे राहतात?**" ह्या प्रश्नाचें उत्तर जर देतां येत नसेल, आपणांला त्यांची माहिती नसेल; सर्वांची बाजूला राहूं द्या, अशा एकाहि इसमाची जर माहिती नसेल, त्याचा ठावठिकाणा माहीत नसेल, तर ऐक्याचें ध्येय, बंधुत्त्वाचें ध्येय आचरणांत आणण्याचे बाबतींतील केवढी उदासीनता, किती निष्काळजीपणा, केवढी गाफिलगिरी! माझ्या गांवच्या माणसांची मीं चौकशी केली नाहीं? त्यांना मदत करणें मला शक्य होईल का? मला ज्या सवलती, जीं सुखें मिळत आहेत, त्यांत त्यांना भागीदार करतां येईल कां असा विचार नको का प्रत्येकानें करावयाला? या गोष्टीचा आपण अनुभव घेतला पाहिजे, करून पाहिलें पाहिजे. आपल्या बांधवासाठीं कितीतरी गोष्टी आपणांस करतां येतील! आपणांस लाभणाऱ्या गोष्टी, मिळणाऱ्या नाना संधि, ह्यांचा त्यांनाहि उपयोग देतां येईल. पण इच्छा हवी, तळमळ हवी, पोटतिडीक हवी! उगीच शक्याशक्यतेच्या शंका नका काढूं. करून पहावयास लागा म्हणजे काय ते दिसून येईल. **ज्यांना शाळेंत जातां येत नाहीं, शिक्षण घेण्याचीं साधनें ज्यांना नाहींत, अशांसाठीं मी वर्षांतून निदान बारा तास**

**देईन व शिकवीन,–महिन्याला एक तास देईन व शिकवीन–अशी प्रतिज्ञा जर प्रत्येक विद्यार्थी करील तर भारतीय विचारांत केवढी क्रांति होईल?** बारा घडे शिकविणें–महिन्यांतून एक तास देणें–तें का ओझें आहे? परंतु शिकणाऱ्यांना केवढी मदत! हे बारा घडे कसलेहि असले तरी चालतील. तुम्हांला येत असेल तेंच तुम्ही द्या. एखाद्याला व्यायामाचे प्रकारच माहीत असतील, तर त्यानें तेच शिकवावें. लिहिणें, वाचणें, संख्या मांडणें या गोष्टी शिकविल्या तर बरें. परंतु सर्वांत उत्कृष्ट गोष्ट म्हणजे इतिहास व भूगोल या विषयांवर गोष्टी सांगा; या विषयांसंबंधींच्या गप्पा मारा; तसेंच रोजच्या जीवनांतील शास्त्रीय गोष्टी, साधीं परंतु रोज उपयोगांचीं अशीं शास्त्रीय सत्यें त्यांना सांगा; किंवा आजूबाजूच्या सृष्टीचें नीट निरीक्षण करावयास त्यांना शिकवा. जें साधेल तें करावयास चला, जें देतां येईल तें द्यावयास चला.

विचारांची थोडीशी पुंजी जवळ असेल तर जीवनाला कळा चढते. विचारानें जीवनाला निराळाच रंग येतो. एखादाच किरण परंतु काळ्या मेघाला तो किती रमणीय करतो! एखादाच पेरलेला विचार–तो कसा रुजेल, कसा वाढेल, कोणाला केव्हां आशा येईल, धीर, सुख देईल, जीवनाला कसे गंभीर करील–ह्याची कल्पना तुम्हीं कधीं केली आहे का? खरोखर, **ज्ञान हीच जीवनाची खरी भाकर आहे.** ह्या भाकरीशिवाय जीवनांत राम नाहीं, जीवनाला अर्थ नाहीं, जीवनाला कळा नाहीं, जीवनाला तेज नाहीं, जीवनाला अर्थ नाहीं, जीवनाला गोडी नाहीं, सौंदर्य नाहीं! “न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।”—ज्ञानासारखें पवित्र व जीवनदायी अन्य कांहींहि नाहीं. म्हणून स्वतःपाशीं जें जें असेल, जें जें कांहीं उत्कृष्ट असेल, तें तें घेऊन आपल्या आजूबाजूच्या बंधूंना देण्यासाठीं त्वरा करा, धांवून जा,

* * *

# पंथप्रियता 

नाना पंथ अस्तित्वांत आल्यानें फार नुकसान होतें अशी सर्वत्र ओरड ऐकूं येते. परंतु असल्या ओरडींत सत्याचा अंश फारच थोडा असून अतिशयोक्तीचा भागच बराचसा असतो. पुष्कळ वेळां मनुष्य कांहीं गोष्टी गृहीतच धरून चालतो, त्यांसंबंधी तो कधीं विचारच करीत नाहीं. वरच्या विधानासारखीं विधानें अविवेकानें व मूर्खपणानें केलीं जातात. पंथांचा उपयोग होतो कीं दुरुपयोग होतो याचा काळजीपूर्वक विचार करावयास हवा; पूर्वग्रह सोडून शांतपणें सत्य काय तें शोधून पहावयास हवें.

क्षुद्र गोष्टीसच नुसतें महत्त्व देऊन त्यासंबंधी काथ्याकूट करणें व रणें माजवणें ही प्रवृत्ति त्याज्यच होय यांत संशय बिलकूल नाहीं. असल्या हलकट वृत्तीमुळें, उथळ वृत्तीमुळें, भांडणें माजतात व मत्सरास ऊत येतो. कलीनें एकदां प्रवेश केला कीं बारीकशा कारणासाठीं वाट पाहणारा, निमित्तावरच टेंकलेला, असा जो समाज, त्याचे तुकडे पडण्यास उशीर लागत नाहीं. असला प्रकार खोडसाळ व निंद्य आहे याबद्दल दुमत नाहीं, वाद नाहीं. पंथासाठीं केवळ पंथाभिमान, माझाच पंथ खरा, इतर सारे खोटे, असला दुरभिमान यांची जर पंथासाठीं आवश्यकता असेल, अशा वृत्तीची जर कोणत्या पंथास जरूर भासत असेल, तर मात्र तो पंथ मृत्युपंथासच लागलेला बरा. असले अहंपूर्ण पंथ म्हणजे प्लेगचे जंतूच ते. असले विषारी प्राण घेणारे जंतू कोणत्याहि सबबीवर अस्तित्वांत येतां कामा नयेत. परंतु पंथ हटला म्हणजे भांडणतंटे, खोटा अभिमान, एवढाच अर्थ का? पंथानें भांडणें माजवावीं हाच एक पंथाचा उद्देश असतो कां? पंथांनीं जगांत भेदभाव माजवले, मत्सर माजवले, याहून अन्य कांहींच त्यांनीं केलें नाहीं का? पंथांच्या नांवावर कांहीं चांगल्या गोष्टी नमूद आहेत कीं नाहींत? कांहीं हित मंगल त्यांच्या नांवें जमा आहे कीं नाहीं?

नवीन पंथ अस्तित्वांत कां येतो? भांडण्यासाठीं खात्रीनें नाहीं. तोडण्यासाठीं नसून जोडण्यासाठीं पंथ जन्माला येत असतो. एका ध्येयाच्या

झेंड्याखालीं, एका सत्याच्या सेवेसाठीं, त्या ध्येयावर व त्या सत्यावर ज्यांची श्रद्धा असेल, सत्यरूप परमेश्वराची त्या विशिष्ट सत्यानेच ज्यांना पूजा करावयाची असेल, त्यांची ही पूजा सांग व संपूर्णपणें पार पाडावी, यासाठीं पंथ प्रकट होत असतो. पंथ सहकार्य व सद्भाव शिकवतो. **पंथ याची व्याख्याच करावयाची झाली तर ' श्रद्धावान जीवांचा संघ ' अशी करतां येईल.** अशी व्याख्या प्राचीन काळींच करण्यांत आलेली होती. या विशाल अर्थानें पंथाकडे बघा. " स्वेच्छेनें व श्रद्धेनें एका ध्येया-साठीं किंवा एखाद्या विशिष्ट गोष्टीचा अभ्यास करण्यासाठीं एकत्र आलेला मंडळींचा समुदाय " त्याला पंथ असें म्हणतां येईल. वैद्यकशास्त्रमंडळ, इतिहास संशोधक मंडळ, आरोग्यमंडळ, जीवदयाप्रसारक मंडळ–हीं सारीं मंडळें म्हणजे एक प्रकारचे धर्मपंथच होत. हीं मंडळें संघहि आहेत व धर्मपंथहि आहेत. कांहीं लोक एकत्र आले म्हणून त्यांस संघ म्हणतां येईल; एका ध्येयानें प्रेरित होऊन श्रद्धेनें एकत्र आले म्हणून त्यांना धर्मपंथ असेंहि म्हणतां येईल. अशा दृष्टीनें पंथांकडे पाहिलें म्हणजे पंथ हा एकत्र आणणारा, विखुरलेल्या फुलांना एकत्र गुंफून हार करणारा, ऐक्यावर जोर देणारा आहे असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. पंथ म्हणजे घटना आहे, विघटना नाहीं; बंधुभाव आहे, वैरभाव नाहीं; प्रेम आहे, विरोध नाहीं.

आपण निरनिराळ्या धार्मिक पंथांकडे दृष्टि फेकूं या. हे धर्मपंथ जगाची कांहींच सेवा बजावीत नाहींत कां? कांहींच थोर व उदार सेवा करीत नाहींत का? त्यांच्यापासून शिकण्यासारखें, घेण्यासारखें, कांहींच का नाहीं? असें नाहीं. हे पंथ कितीतरी काम करतात. प्रत्येक पंथ म्हणजे जणूं भ्रातृसंघ असतो. पंथ म्हणजे सर्व अनुयायांचें घर, आधार-स्थान. पंथ म्हणजे अनुयायांची प्रेमपुरी. कोणी आजारी पडला, विपत्तींत सांपडला, दारिद्र्यानें गांजला तर पंथ त्याच्या मदतीस धांवतो. पंथाचे इतर लोक त्याला एकटा उघडा पडूं देणार नाहींत. कोणावर सामाजिक हल्ला झाला, उपहास झाला, तर पंथांतील इतर सारे त्याची बाजू घेऊन धांवतील. कारण त्या एकाच्या यशांत, अब्रूंत, कल्याणांत सर्वांचें यश, अब्रू व कल्याण सांठवलेलें असतें. एकाचा झगडा तो साऱ्यांचा, एकाचें दुःख

तें साऱ्यांचें. जैन, पारशी, ज्यू, शीख या लोकांच्या पंथांत असले बंधुतेचें स्वरूप दिसून येतें.

पंथ म्हणजे आधारस्थान, त्याचप्रमाणें पंथ म्हणजे शाळाहि असते. आपल्या अनुयायांच्या, मुलांबाळांच्या शिक्षणाची तरतूद करणें हें पंथाचें काम असतें. पंथांचें ध्येय हेंच पुढें त्या मुलांचें ध्येय व्हावयाचें असतें. मुलें, पंथ-वृक्ष वाढवणाऱ्या शाखाच त्या–तें ध्येयच त्या मुलांचा भावी ठेवा; त्याचे ते वारसदार व्हावयाचे असतात. यासाठीं पंथाची शिस्त, पंथाचे विचार, पंथाचीं तत्त्वें लहानपणापासून मुलांच्या मनांत बिंबविणें जरूर असतें. मुलांना लहानपणापासून पंथाचे शिपाई बनवावयाचें असतें. मुलें म्हणजे पंथाचें नवयुवकपथक. मुलांना तत्त्वनिष्ठ शिपाई बनविणें हें पंथाचें काम असतें.

आपल्या अंगांतील गुण, आपल्या अंगांतील कौशल्य, आपली करामत प्रकट करण्याचें स्थान म्हणजे आपला पंथ हेंच होय. पंथांत साऱ्या सवलती मिळतात, स्वातंत्र्य असतें. आपापल्या पंथाचा आधार असल्यामुळें प्रत्येकजण जीवनांत उत्साहानें उडी घेतो. त्याला इतरांचा आधार व पाठिंबा असतो, नैतिक पाठबळ असतें; मी एकटा नाहीं ही भावना त्याच्या हृदयांत असते, व म्हणून तो निराश होत नाहीं; तो दुबळा दिसत नाहीं. पंथांतील प्रत्येक अनुयायानें अधिकांत अधिक कार्य करून दाखवावें अशी पंथाची अपेक्षा असते. पंथ म्हणजे जणुं माता. आपल्या अनुयायांना, आपल्या पुत्रांना ही पंथ-माता सांगते, " जा बच्चांनो, भरपूर काम करा. " काम करून पुत्र आला म्हणजे ही पंथ-माता त्याचें कौतुक करते, त्याचें स्वागत करते. आपल्या मुलाचें प्रत्येक कृत्य पंथ-माता नमूद ठेवते व स्वतःचा इतिहास रचीत असते. भावी पिढीला हा पूर्वइतिहास–सेवेचा व त्यागाचा इतिहास–मिळावा अशी तरतूद करण्यांत येते. पंथांतील कोणी तरुण परदेशांत साहस करण्यासाठीं जर गेला, नवीन विद्या किंवा नवीन कला हस्तगत करून घेण्यासाठीं जर गेला, तर तिकडे त्याला मित्रमंडळी भेटतील, साहाय्य करतील, अशी व्यवस्था पंथ-माता करीत असते. पंथ म्हणजे माता; पंथ म्हणजे सखा; पंथ म्हणजे गुरु; पंथ म्हणजे सेनापति; पंथ म्हणजे पथदर्शक;

पंथ म्हणजे ध्येय; पंथ म्हणजे झेंडा–पंथ म्हणजे सारें. असा हा पंथ कोण अवमानील? पंथ म्हणजे पाप, घाण व भांडण असें आतां कोण म्हणेल? **हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जाती म्हणजे जणूं पंथच आहेत! या दृष्टीनें जर जातींकडे बघूं तर किती छान होईल!** दुसऱ्याचा मत्सर न करतां स्वतः उन्नत होणें यांत वाईट काय आहे?

**परंतु पंथाचें शेवटचें ध्येय पंथातीत होणें हें आहे** ही गोष्ट विसरतां कामा नये. आपल्या पंथाच्या बाहेर जे आहेत त्यांच्याजवळ कांहींच सत्य नाहीं, ते सारे नास्तिक, काफरच आहेत असें म्हणणें म्हणजे घोर पातक आहे. हा फार मोठा प्रभु-द्रोह आहे. आर्यसमाज, ब्राह्मसमाज, स्त्रीशिक्षणसंस्था, राष्ट्रीय शिक्षण मंडळ, मद्यपानप्रतिबंधक मंडळ, भारत सेवक समाज, मजूरमंडळ–नाना संस्था असतील. परंतु यामुळें भिऊन जावयास नको, चिडून जावयास नको. प्रत्येकानें दुसऱ्यांनाहि स्वातंत्र्य द्यावें व स्वतःचाहि विकास करावा. जो **माझा विकास दुसऱ्याची वाढ खुरटवूनच मला साधतां येणें शक्य आहे तो माझा खरा विकासच नव्हे.** दुसऱ्याच्या विकासाच्या आड येणारा माझा विकास हा माझा विकास होऊं शकत नाहीं. हा धर्ममय विकास नाहीं. ‘मीच तेवढा खरा’ यासारखें असत्य जगांत दुसरें नाहीं. प्रत्येक क्षणीं आपण देवाच्या न्यायासनासमोर उभे आहोंत या भावनेनें वागलें पाहिजे. तुम्ही कितीहि मोठें कार्य केलेंत, कितीहि तुमचीं स्तुति-स्तोत्रें गायिलीं गेलीं, कितीहि तुमची पाठ थोपटली गेली, तरी शेवटीं तुम्हीं जें केलें तें कोणत्या वृत्तीनें केलें हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या उत्तरावरच तुमच्या कार्याचें मोल अवलंबून राहील. स्वतःच्या कामाचें एकंदर सार तुम्हीं काय काढतां यावर त्या कार्याची थोरवी, महत्ता व सत्यता अवलंबून आहेत. “माझेंच करणें व माझेंच म्हणणें खरें होतें व आहे, बाकी सारें चूक” असें तुम्ही मरणशय्येवर म्हणणार कीं, “मला प्रकाश मिळाला त्याप्रमाणें जगांत जो जो जन्माला येतो त्यालाहि मिळतच असतो” असें म्हणाल? ईश्वर आपल्या कोणत्याहि लेंकरांना अंधारांत पाठवीत नाहीं, आंधळे करून पाठवीत नाहीं; प्रत्येकाच्या हृदयमंदिरांत दिवा लावूनच तो प्रत्येकाला पाठवीत असतो. अंतरींचा ज्ञानदिवा सर्वांजवळ आहे.

३०५१३
२५६६
६१

"जगांत येणाऱ्या प्रत्येकाचा मार्ग त्यांचा प्रकाश उजळीत असतो," हे थोर शब्द भारतांतील एका थोर संताच्या मुखांतून बाहेर पडलेले आहेत. "मलाच काय तें सत्य कळतें" व "सर्वांनाच सत्य कळतें" या दोन वृत्तींतील यथार्थ कोणती ह्याबद्दल दुमत असणें शक्य नाहीं. कोणत्याहि एका पंथाला सत्याचा वारसा दिलेला नाहीं. ईश्वराच्या घरची सत्याची रास सर्वांच्याच मालकीचीं आहे. त्या सत्यधनाचे सारे वारसदार आहेत. तें सत्यधन कोणा एकाचेंच वसन नाहीं. या जगांत कोणालाहि स्वतःच्या एकट्याच्या बळावर तरून जातां येणार नाहीं. **एकमेकांना मिळालेले सत्याचे किरण जर एकमेक आदरानें घेतील तरच सर्वांच्या मार्गांतील अंधार दूर होऊन पाऊल टाकण्यापुरता प्रकाश मिळेल. अखेरचा सर्वसंग्राहक विशाल पंथ म्हणजे मानवजात.** सर्व पंथ मानवजातीच्या पोटांत सामावतात. कोंबडीच्या पंखांखालीं सारीं पिलें जमतात त्याप्रमाणें अखिल मानवजातीच्या पंखांखालीं सारीं पंथ–बाळें शेवटीं येतील. भगवान् बुद्ध म्हणत, "जीवाला ज्या ज्या गोष्टीनें म्हणून जीवन मिळेल, सत्यतत्व, शिवत्व व सुंदरत्व मिळेल, तें तें सारें मानवजातीनें आपल्या महापंथांत, महाभवनांत अंतर्भूत करून घेतले पाहिजे."

ज्याप्रमाणें पंथ आपल्या अनुयायांची अहोरात्र काळजी वाहणारे मायबाप बनत, त्याप्रमाणें आज प्रत्येक खेडें होऊं द्या. पंथ म्हणजे निराधार भक्तांचा आधार, घरदार नसलेल्यांचें घर; पंथ म्हणजे ज्ञान देणारी शाळा; पंथ म्हणजे भ्रातृप्रेम; प्रत्येक खेडें आज असें होऊं द्या. प्रत्येक खेड्यांतील लोकांस परस्परांबद्दल जिव्हाळा वाटो, परस्परांबद्दल प्रेम वाटो. पंथ ज्याप्रमाणें सर्वांवर कृपा करणारी माता, त्याप्रमाणें भारत देश ही आपली सर्वांची माता. पंथानुयायी एकमेकांचे बंधू असत. तसे आपण ग्रामवासी, भारतवासी, एकमेकांचे बंधू होऊं द्या. धार्मिक पंथ एका विशिष्ट सत्यासाठीं उभा राही. आपण आपल्या स्थानासाठीं, आपल्या गांवासाठीं भारतवर्षासाठीं उभे राहूं या. वसाहत करावयास निघालेल्या आपल्या प्राचीन आर्यपूर्वजांनीं जेथें जेथें त्यांना पवित्र जागा दिसली तेथें तेथें त्यांनीं

होमशाळा बांधिल्या, पवित्र अग्नि प्रज्वालित केला. प्रत्येक घर, प्रत्येक खेडें, यज्ञभूमीच, पवित्र भूमीच वाटूं दे. आपलीं घरें, आपलीं मंदिरें, आपलीं खेडीं, आपलीं नगरें, आपला प्रांत, आपला देश, या सर्वांच्या रूपानें ती विशाल व थोर सृष्टिमाताच नटली नाहीं का? तो परमेश्वरच या अनेक रूपांनीं उभा नाहीं का? एकाच दिव्य सत्याचीं हीं सारीं रूपें असें भारतीय हृदयास वाटत नाहीं का? एकाच सूर्याचे हे सारे किरण, एकाच महान् सिंधूंतील हे पवित्र बिंदू, असें भारतीय हृदयास आज अनुभवतां येत नाहीं? **या विशाल व रमणीय भारतमंदिरांत जमलेलीं आपण सारीं मुलें म्हणजे भाऊ भाऊ नाहीं का**? आपण एकत्र येणार नाहीं का? बंधुप्रेमानें बळकट एकत्र बांधले जाणार नाहीं का? परस्परांच्या विकासासाठीं शक्य तो त्याग करणार नाहीं का?

* * *

## व्यापक व वाढतें विधिशास्त्र : ४ :

ज्या धर्माला जिवंत राहावयाचें आहे त्यानें वाढलें पाहिजे; त्यानें स्थाणु असून भागणार नाहीं. नदीनें वाहात राहिलें पाहिजे, वाऱ्यानें फिरत राहिलें पाहिजे, धर्मानें वाढत राहिलें पाहिजे. ज्यांत जीवन नाहीं त्यांतील लवचीकपणा जातो, ती वस्तु शुष्क, नीरस, कठीण होते. तिच्यांत बदल करतां येत नाहीं, तिच्यांत वाढ होत नाहीं. त्या वस्तूचा विकास थांबतो. जे जिवंत आहेत त्यांनीं नवीन नवीन प्रांत आक्रमण केले पाहिजेत, नवशक्ति संपादिली पाहिजे, नवीन साधनें त्यांनीं मिळविलीं पाहिजेत. पूर्वीं माहीत नसलेल्या अज्ञात असलेल्या अशा गोष्टीसाठीं, अशा प्रांतांतहि घुसण्यासाठीं, स्फूर्ति त्यांच्या अंतरंगांत संचारली पाहिजे. जे जिवंत राहूं इच्छितात त्यांनीं नवीन ध्येयें, नवीन प्रकाश यांना मिठी मारण्यासाठीं उभें पाहिलें पाहिजे. बदलणाऱ्या परिस्थितीला आकार देण्यासाठीं त्यांनीं कंबर बांधून तयार राहिले पाहिजे.

सनातनधर्मानेंहि वाढलें पाहिजे. वाढण्यांतच त्यांचें सनातनत्व आहे. वाढीचा नियम सनातनधर्मानेंहि पाळला पाहिजे. जर हिंदु धर्म वाढणार नाहीं, घरांतून बाहेर येणार नाहीं, नवीन पोषाख घालणार नाहीं, नवीन पल्लव त्याला जर फुटले नाहीत, तर तो चिरंजीव होणार नाहीं, हिंदु धर्म जर नवीन अनुभव घेणार नाहीं, नूतन कार्यक्षेत्रांत जर तो घुसणार नाहीं, तर तो टिकणार नाहीं. **इतर सगळ्या धर्मांपेक्षां हिंदु धर्मांत अधिक विकासक्षमता आहे.** हिंदु धर्माची वाढ खुरटलेली नाहीं. तो वाढेल, नवीन मिळवील, नवीन जोडील, नवीन भाव प्रकट करील, नवीन रूप दाखवील. हिंदु धर्मांत ही क्षमता आहे. म्हणूनच त्याला आपण सनातनधर्म, अमरधर्म, असें म्हणतों. ' बाबावाक्यं प्रमाणं ' साठीं त्याला सनातन म्हणत नाहीं.

परंतु कोणत्या कोणत्या बाबतींत फेरफार केले पाहिजेत तें समजून घेणें अशक्य आहे. कोणत्या गोष्टींत फेरफार करण्याची वेळ आली आहे हें जाणण्याची बुद्धि हवी. गेलीं हजार दीड हजार वर्षें हिंदु धर्म म्हणजे व्यक्ति व परमात्मा या दोघांपुरतांच जणूं झाला आहे. यजमान व उपाध्याय, जीव व शिव एवढ्यांतच धर्म येऊन बसला आहे. सर्व धर्मांची शेवटची शिकवण, सर्व धर्मांतील अंतिम प्राधान्य हेंच आहे; ही गोष्ट खरी. आध्यात्मिक व्यक्तिवाद किंवा वैयक्तिक अध्यात्मवाद–जिवाचा व्यक्तिगत उद्धार हेंच सुसंस्कृत व सुसंघटित धर्मांचें सार आहे. जातां जातां कांहीं सामाजिक विचारहि अनुषंगिक रीत्या धर्म सांगत असतात; परंतु धर्म ती गोष्ट मुख्य मानीत नाहींत, प्रधान मानीत नाहींत. परंतु धर्म केवळ वैयक्तिक नाहीं तर सामुदायिकहि आहे. **धर्म जिवाशिवांचें ऐक्य करतो, त्याचप्रमाणें सर्व मानवजातीचेंहि ऐक्य करतो.** आपण जर सारीं एकाच परमेश्वराचीं लेंकरें असूं तर आपण सारे एक झालों, भाऊ भाऊ झालों. एका बाजूनें प्रगति झाली असेल तर दुसऱ्या बाजूनेंहि झाली पाहिजे; एरव्हीं पूर्णता नाहीं. आज सामुदायिक पूजेनें, सार्वत्रिक पूजेनें, अधिकांचा, पुष्कळांचा उद्धार होईल. सर्वांच्या सेवेवर आज जोर द्या; सर्व मिळून पूजा करा.

यासाठीं सामुदायिक प्रार्थना हवी. सामुदायिक प्रार्थनेची संघटना सुरू केली पाहिजे. हजारों मुखांतून एकच सूर बाहेर पडत आहे, हजारों लोक एका क्षणांत एका विचारानें प्रेरित होत आहेत, एका भावनेनें भारून जात आहेत, अशा प्रार्थना प्रचारांत आल्या पाहिजेत. या प्रार्थना अर्थातच लोकांच्या रोजच्या बोलण्याच्या भाषेंत असल्या पाहिजेत. सामुदायिक प्रार्थनेंत दोन भाग करावे. कांहींनीं सांगावी व इतरांनीं ती प्रार्थना म्हणावी.

*          *          *

# सुखविलास व पुरुषार्थ : ५ :

## The Use of Leisure

**आपल्याला रिकामा मिळालेला वेळ आपण कशांत खर्च करतों यावरून आपल्या शिक्षणाची खरी परीक्षा होत असते.** आपणाला जीं कर्तव्यें व जीं कामें करावींच लागतात व म्हणून जीं यथासांग आपण पार पाडतों, त्यांतून आपलें खरें चारित्र्य प्रकट होत नाहीं; तर आपणांस कोणत्या गोष्टींची हौस आहे, कोणत्या गोष्टींत आनंद वाटतो, कोणत्या गोष्टींचा आपणांस छंद आहे—त्यावरून आपलें शील व आपलें चारित्र्य हीं दिसून येतात.

ज्या काळांत सुखविलासाचें पुराण सर्वत्र सांगण्यांत येत असतें, त्या काळांत श्रीमंत वर्गाचें अपरंपर नुकसान होण्याचा संभव असतो. नीट व्यवस्थित श्रम केल्यानें जो मनुष्य भला माणूस झाला असतां, तोच मनुष्य हें पुराण ऐकून पशूहि होतो; आणि सारेंच जीवन ख्यालीखुशालींत जर तो दवडील तर तो पशूहूनहि नीच होतो. आणि ज्या वेळेस ह्या सुखभोगाच्या, ख्यालीखुशालीच्या कल्पना परदेशांतून येतात, त्या वेळेस आपलें जें नुकसान होईल त्याला तर मोजमापच राहणार

नाहीं. **ह्या विदेशी विलासकल्पनांचा जर आपणांवर पगडा बसला तर शतमुखांनीं आपली हानि होईल.** मोटार गाडीनें जो अनिवार्य व अपरिहार्य विनाश आणिला आहे त्याला युरोपांतील नीतीहि आळा घालूं शकत नाहीं; मग मोटारच नव्हे, तर मद्याचे प्याले, घोड्यांच्या शर्यती वगैरे शेंकडों प्रकार आले म्हणजे हिंदी राजेरजवाड्यांची, हिंदुस्थानांतील जहागीरदार, जमीनदार, कारखानदार यांची काय स्थिति होईल व कोठवर पाळी येईल हें कोणी सांगावें? आणि पुन्हा युरोपमधील थोर नैतिक ध्येयांचा ज्यांना स्पर्शहि नाही अशा युरोपियन लोकांकडून हे प्रकार आमच्या श्रीमंतांना दाखविले जातात व शिकविले जातात—ह्यामुळें तर आणखीच धोका.

सदैव बंधनांत ठेवल्यानें वस्तूचीं खरी परीक्षा होत नाहीं. बंधनें काढून व्यक्ति मुक्त करा व मग ती आपलें स्वातंत्र्य कशा तऱ्हेनें घालविते, त्यावरून तिच्या शिक्षणाची किंवा इतर विचारपद्धतीची परीक्षा करा. एकाच ध्येयाकडे येण्यास अनेक मार्ग असतात. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन यांच्या शिष्टाचारांच्या पद्धती वेगवेगळ्या असतील. परंतु त्या त्या पद्धतींच्या द्वारा त्यांचा शिष्टपणा प्रकट झाला पाहिजे. पद्धत कोणतीहि असो, शब्द कोणत्याहि भाषेंतील असो, त्यांतून एकच अर्थ निघाला पाहिजे. त्या निरनिराळ्या लोकांच्या भिन्न पद्धतींतूनहि त्यांची भलाई, त्यांचें सद्गृहस्थत्व प्रकट झालें पाहिजे. जर तो सभ्य गृहस्थ म्हणून ठरला नाहीं तर त्याचें शिक्षण कुचकामाचें ठरेल, त्याची संस्कृति हीन ठरेल. युरोप काय किंवा आशिया काय—दोन्हीं ठिकाणीं जुगार खेळणें, दारू पिऊन झिंगून पडणें, सारखें तोंडाचें धुराडें चालू असणें—ह्या गोष्टी सभ्यतेच्या मानल्या जात नाहींत. अशा ओंगळ गोष्टी करणाऱ्याला चांगलें गृहशिक्षण मिळालें आहे असें समजत नाहींत. आणि ह्या गोष्टी जरी समाजांत रूढ असल्या तरी त्यांना मर्यादा असते—अमर्यादपणा होऊं देत नाहींत. अमर्यादपणा झाला तर शिष्टाचाराचा भंग झाला असेंच मानतात. युरोपमध्यें इतरांनीं आपणांस बावळट व नेभळट समजूं नये म्हणून फार दक्षता बाळगतात. ते तरतरीत राहतील, नीटनेटका पोषाख करतील, चपळ व उत्साही राहतील. तसेंच स्त्रियांना व

इतर अशक्त पंगू वगैरे माणसांना आपण सांभाळलें पाहिजे, त्यांना साहाय्य दिलें पाहिजे, अदबीनें त्यांच्याजवळ वागलें पाहिजे, ह्या गोष्टी युरोपमधील लोकांत जणू उपजतच असतात. स्त्रिया पाहून ते फिदीफिदी हंसणार नाहींत. **स्त्रियांच्या समोर ते दाक्षिण्यानें वागतील.** हे गुण प्रत्येकांत असलेच पाहिजेत अशी युरोपीयन संस्कृतीची शिकवण आहे. धडधाकट शरीर, बेताबाताचा कपडालत्ता, बळकट मनगट, आनंदानें शारीरिक कष्ट सहन करण्याची तयारी—ह्या गोष्टी सद्गृहस्थ होण्यास तिकडे आवश्यक आहेत. युरोपीयन समाजाच्या या ध्येयामुळें तेथील व्यसनांनाहि मर्यादा राहते, आळा बसतो. परंतु मनुष्य सदैव हेतुपुरस्सर ध्येयाला चिकटून बसतोच असें नाहीं. यामुळें युरोपीयन लोकांचें सद्गुण एकदम मनांत भरण्याऐवजीं त्यांचे दोष व त्यांची व्यसनेंच हिंदी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत भरण्याचा अधिक संभव असतो.

आपल्याकडील विद्यार्थीच नाहीं, तर सारेच वर्ग पाश्चिमात्यांच्या चालीरीतींकडे झुकत आहेत. परंतु दुःखाची व खेदाची गोष्ट ही कीं, त्यांच्या ध्येयाकडे व सद्गुणाकडे न झुकतां, त्यांच्या नटण्यामुरडण्याच्या, त्यांच्या सुखविलासांच्या कल्पनांकडेच आपण जोरानें खेचले जात आहोंत. इंग्लंडमध्यें सकाळीं सारेच चहा घेतात. त्यांत कांहीं दोष आहे असें मानण्यांत येत नाहीं. परंतु रेल्वेपासून दूर असलेल्या भागांत इंग्रज मनुष्य पायांनीं हिंडेल किंवा फार तर घोडा घेईल. त्यानें तसेंच केलें पाहिजे. आपण त्यांचा चहा उचलला; परंतु खेड्यापाड्यांत जातांनाहि आपण गाडीघोडे उडवीत जाऊं, किंवा पालखी मेणे सजवूं. इंग्रज मनुष्य चांगलें खातो परंतु कामहि भरपूर करितो. समाजांत, चारचौघांत तो आपल्या शरीरप्रकृतीची, आरोग्याची कधीं चर्चा करणार नाहीं. त्यांना त्यांत कमीपणा वाटतो. आजारी पडण्याची त्याला लाज वाटते व म्हणून शक्य तों आपल्या आजारीपणाचें तो प्रदर्शन करणार नाहीं. दुसऱ्यांनीं कींव करावी, दया करावी, असें त्याला वाटत नाहीं. इंग्रज मनुष्य स्वाभिमानी आहे. त्याला निशाण मारतां येतें, पिस्तूल झाडतां येतें. या जगांत तो मर्दाप्रमाणें वागेल व आपल्या सर्व शक्तिनिशीं तो स्वतःचा बचाव करून घेईल. आपण इंग्रजांप्रमाणें पाव, बिस्किटें, अंडीं, यांचा खुराक सुरू केला,

परंतु स्वतःबद्दलची कुरकूर कधीं न करणारा त्यांचा स्वाभिमान, ज्यामुळें अधःपात होईल असल्या सुखलोलुपतेचा त्याच्याजवळील अभाव, या गोष्टीचें मात्र अनुकरण आपण करणार नाहीं. **इंग्रजांचा स्वच्छंदीपणा सहज आपलासा करूं, परंतु त्यांचा संयम, स्वाभिमान व मर्दपणा यांना जवळ करण्याची गोष्ट काढणार नाहीं.**

ज्याला आधींच धोक्याची सूचना मिळाली त्याचा अर्धाअधिक सांभाळ झाला. भारतवर्षांत ही धोक्याची घंटा वाजली आहे. आपली नीति बिघडूं न देणें, आपलें चारित्र्य निष्कलंक ठेवणें, दृष्टि निर्मल राहणें, यांमध्यें जें सामर्थ्य आहे तें आपल्यापैकीं फारच थोड्यांच्या ध्यानांत येतें. **अंगबळापेक्षां अकलेचें बळ अधिक; परंतु अकलेच्या बळापेक्षां चारित्र्याचें बळ अधिक.** पावित्र्य हें सर्वांत मोठें सामर्थ्य आहे. आपली ध्येयें हींच आपलीं अभेद्य कवचें; हींच संरक्षण करणारीं चिलखतें. नर-जातीची व नारीजातीची थोरवी कशांत आहे तें आपण सदैव ध्यानांत धरूं या. तें जर ध्यानांत राहील तर फुरसतीचा मिळालेला प्रत्येक क्षण, धनधान्याचा मिळालेला अधिक कण म्हणजे थोर ध्येयासाठीं करावयाचा जो महायज्ञ, त्याचीच नवीन सामुग्री होय असें आपण मानूं; व त्या क्षणाचा व त्या कणाचा आपल्या ध्येयसिद्धीच्या कामांत उपयोग करूं.

* * *

# स्वातंत्र्य : ६ :

ज्याची बुद्धि मेलेली नसून स्वतंत्र आहे असा मनुष्य ‘ स्वातंत्र्य म्हणजे काय ’ हा प्रश्न पुनः पुन्हा स्वतःला विचारल्याशिवाय राहणार नाहीं. आपण बहुतेक सारेजण स्वातंत्र्यासाठीं जन्मलेले आहोंत. आपण सगळेच कशासाठीं तरी धडपडत असतों, तडफडत असतों. जेथें धडपड करावयास लावणारें असें ज्या जीवनांत कांहींच नाहीं तें जीवनच नव्हे. तें बिनधडपडीचें जीवन, ती स्थिति अत्यंत भयाण व भेसूर वाटेल,

धडपड हें भाग्य आहे, जीवनाचें सौंदर्य आहे धडपडीनें जीवनाला तेज असतें, जीवनाला अर्थ असतो. धडपड जीवनाचें सारसर्वस्व आहे. जेथें कशाचीहि आकांक्षा नाहीं, **जेथें कांहींतरी मिळवावें व तें मिळवण्यासाठीं मरावें असें वाटत नाहीं, तें जीवन कसचें** ? तें जीवन असह्य होय; त्यापेक्षां मरण पत्करलें. ज्याची सारी धडपड शांत झाली आहे असा निरुत्साही मृतप्राय मनुष्य कदाचित् तुरुंगांत असणें शक्य आहे. परंतु तुरुंगांतहि ज्याचें मन मेलेलें नाहीं, ज्याची बुद्धि स्वतंत्र आहे, तो धडपड करीलच करील. त्याच्यानें तेथें शांत बसवणार नाहीं. त्याचें आंतील कुरुक्षेत्र तरी निदान त्याच्याजवळ असतेच. तें कोणती सत्ता हिरावून घेणार ? फक्त हातापायांची, मनगटाची हालचाल म्हणजे धडपड? समाजांतील स्पर्धाक्षेत्रांतच धडपडीस वाव असतो अशी ज्याच्या मनांत धडपडीची कल्पना असते, धडपडीचा एवढाच बाह्य व स्थूल अर्थ जो पाहतो, त्याच्या धडपडीला तुरुंगांत वाव नाहीं, तेथें ती खलास झाली, संपली, ही गोष्ट खरी. परंतु स्वतंत्र बुद्धीच्या माणसाची धडपड तेथेंहि संपणार नाहीं. तो मनांत अनेक प्रश्न उत्पन्न करील व धडपड करीतच राहील. धडपडीची संकुचित व्याख्या करणारा, बुद्धीची धडपड ज्याला माहीत नाहीं, अशाच्या जीवनाला तुरुंगामध्यें ज्याप्रमाणें अर्थ राहात नाहीं, त्याची सारी धडपड संपते, तसाच दुसराहि एक मनुष्य आहे. संपत्तीच्या पिंजऱ्यांत लहानपणापासून वाढलेली परंतु संपत्तींतील सुखविलास वरवटावें असें मनास न वाटणारी, त्या पिंजऱ्यांतून पळतांहि येत नसलेली व तेथें राहूनच आत्मविकासाचा मार्ग शोधून काढण्याची बुद्धि नसलेली अशी जी एखादी व्यक्ति—तिचीहि धडपड संपली असें समजतां येईल. अशा तऱ्हेनें **ज्यांच्या ज्यांच्या जीवनांत धडपड उरत नाहीं ते जिवंत असून मेलेलेच असतात**; किंकर्तव्यशून्य असे दगड ते बनतात. आपला आनंद, आपला उत्साह, आपली बुद्धि ह्यांना धडपडीनें तेज चढतें. जेथें धडपड नाहीं तेथें नुसता कसातरी एक शेणाचा गोळा पडलेला आहे असेंच दिसेल. धडपडींतच खरी वाढ आहे, प्रगति आहे व स्वतंत्रता आहे.

अमुक व्यक्ति क्षुद्र आहे कीं महान् आहे, राष्ट्र क्षुद्र आहे कीं महान् आहे, हें स्वतंत्र होण्यासाठीं तेथें धडपड चालली आहे कीं नाहीं

यावरून सांगतां येईल. स्वतंत्रता म्हणजे काय हें बुद्धीनें वर्णन करून जरी सांगतां येत नसलें तरी ती आपण अनुभवूं शकतों व तिच्यासाठीं धडपडतहि असतों. आपण सारेच कोणत्या ना कोणत्या तरी बाबतींत स्वतंत्र होऊं पाहात असतों; हळुहळूं थोड्याफार प्रमाणांत निर्दोष, अव्यंग व स्वयंपूर्ण असें स्वातंत्र्य आपण उभारीत असतों. कोणी हक्काच्या नांवाखालीं स्वातंत्र्यासाठीं झगडतात. ईश्वर व माझा हक्क हें अशा लोकांचें ध्येय असतें. परंतु हिंदु धर्म फार खोल जाणारा आहे, सूक्ष्म बघणारा आहे. हिंदु धर्म सांगतों कीं, मनुष्याला वस्तु प्रिय नसून मुक्ति प्रिय आहे. अमुक एका बाबतींतील, अमुक एका वस्तूबद्दलचें स्वातंत्र्य नव्हे, तर केवळ स्वातंत्र्य, **वस्तुनिरपेक्ष स्वातंत्र्य, हें हिंदु धर्माचें ध्येय आहे.** हें ध्येय वस्तुप्राप्तीच्या पैलाडचें आहे. आत्मविकासाचें प्रधान साधन म्हणजे अशा प्रकारची मुक्ति असें हिंदु धर्म मानतो. जो स्थिरमति झाला, स्थितप्रज्ञ झाला, ज्याला प्राप्तव्य व गंतव्य राहिलें नाहीं, तोच खरा मुक्त व स्वतंत्र असें हिंदु धर्म सांगत आहे. जो आत्मरूप झाला, आत्मरत झाला, तोच मुक्त; तोच सर्व बंधनांतून सुटला, इतर गति खुंटून त्यालाच खरोखर परमगति मिळाली.

स्वातंत्र्याच्या कल्पनेंत मुख्य कल्पना झगडण्याची आहे. स्वातंत्र्य शब्द उच्चारतांच डोळ्यांसमोर झगडा उभा राहतो. कोणाजवळ तरी झगडून कशापाशीं तरी झगडून, स्वातंत्र्य अनुभवावयाचें असतें. स्वातंत्र्य म्हणजे झगडा. विरोधाशीं झगडण्यांत स्वातंत्र्याचा जन्म होतो. चकमक झाल्यानें ठिणगी पडते, मनुष्य किंवा मनुष्यांनीं बनलेला समाज स्वतःला समजूं इच्छित असतो; स्वतःचें स्वरूप समजूं इच्छित असतो. स्वतःतील अर्थ प्रकट करूं इच्छित असतो. ज्याप्रमाणें बीज स्वतःमधील विकास प्रकट करूं पाहतें त्याप्रमाणेंच व्यक्तीचेंहि असतें. व्यक्ति किंवा व्यक्ती मिळून बनलेली समष्टि प्रयत्न करून, स्वतः प्रयत्न करून, स्वतःचा विकास करून घेऊं पाहात असते; दुसऱ्याचें दडपण व्यक्ति किंवा समष्टि झुगारून देत असते. व्यक्तीला समाजाचें बंधन झुगारावेंसें वाटतें व एक समाज दुसऱ्या समाजाचीं बंधनें झुगारून देऊं पहात असतो. जे मर्द असतात, खरे

नरवीर असतात, त्यांना सामाजिक बंधनें केव्हां एकदां झुगारून देऊं असें होतें. समाजाचें कृत्रिम दडपण त्यांना सहन होत नाहीं. असा स्वतंत्र बुद्धीचा मर्द पुरुष कधीं समाजाच्या इच्छेप्रमाणें वागतांना दिसेल; परंतु त्याच्या त्या वागण्यांत समाजाची हुकमत नसते; त्याला स्वतःला तसें वागणें पसंत पडलेलें असतें, म्हणूनच तसा तो वागतो. **परंतु अशा जीवनांत कधीं कधीं धोका असतो.** कारण हे झुंजार वीर पुरुष, हे स्वातंत्र्येच्छु पुरुष, आपल्या स्वतःच्याच मनाला फार मानतात, स्वतःच्या विचारांचेंच स्तोम माजवतात, स्वतःचाच उदो उदो करतात. ते हट्ट धरून बसतात, आग्रही होतात. कांहींतरी ओढाताण करून स्वतःच्या मतांचें समर्थन करीत राहणें एवढेंच त्यांचें काम होऊन बसतें. आपलें मतस्वातंत्र्य कोणी हिरावून घेईल म्हणून असा मनुष्य फार जपतो, अधीर व उल्लू बनतो. असा मनुष्य लहान मुलासारखा वागूं लागतो. ज्या मुलाला ‘ वाढ म्हणजे काय, विकास म्हणजे काय ’ हें माहीत नाहीं, असें मूलहि त्याच्याजवळ कांहीं मागा, त्याला कांहीं श्री, ग म्हणावयास सांगा, तर तें ‘नाहीं’ ‘नाहीं’ म्हणेल. कारण नाकारण्यांत त्याला स्वतःचा हक्क दिसतो, स्वतःचें स्वातंत्र्य दिसतें. जसें मुलाचें तसेंच वरील व्यक्तीचेंहि होण्याचा संभव असतो. आपल्याच मताला चिकटून बसणारे असे हे लोक कोत्या व संकुचित दृष्टीचे होतात, दुसऱ्याला ‘नेति’ ‘नेति’ म्हणूं लागतात. स्वतंत्र राहूं पाहतां गुलाम होतात; त्यांच्या मनांत घमेंडखोरपणा शिरतो, स्वार्थ बळावतो; आत्मश्लाघा वाढते. अशा व्यक्ती मग दुसऱ्यांच्या सुखदुःखाकडे बघत नाहींत. स्वतःचें झालें कीं संपलें, आपलें झालें कीं पुरे, असें त्यांना वाटतें. अशा व्यक्तींना मग पुढें जीवनांत मोठमोठ्या कार्यांसाठीं एकत्र येणें, सहकार करणें या गोष्टी साधत नाहींत. ते एकांडे शिलेदार बनतात. खरोखर मोठे जे असतात त्यांना ‘ आपलें स्वातंत्र्य कोणी हिरावून घेऊं शकणार नाहीं ’ ही जाणीव असते. ‘ माझें स्वातंत्र्य कोणी हिरावून घेणार नाहीं व आपण हिरावूं देणार नाहीं ’ ही श्रद्धा, हा आत्मविश्वास, ज्यांच्याजवळ असतो. ते दुसऱ्याला स्वातंत्र्य देतात, दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा अपहार ते करीत नाहींत. दुसऱ्याची सेवा करण्याचा जो हक्क त्याची संधि ते गमाऊं

इच्छीत नाहींत. असे थोर पुरुष आपण समाजांत नेहमीं पाहतों. त्याग, मनाचा मोठेपणा हा मान मानवजातींत दुर्मिळ नाहीं. पदोपदीं तो दिसून येत असतो. समाजाची सारी इमारत मजबूतपणें, भक्कमपणें उभी राहणें शक्य करणारा चुना म्हणजेच तर त्याग. त्याच्या शिवाय कसें चालणार? तो नसेल तर कसें होणार?

समाजाजवळ झगडून व्यक्तीला आपलें स्वातंत्र्य हिसकावून घ्यावयाचें असतें. परंतु एवढ्यानें प्रश्न सुटला नाहीं. अजून शिल्लक आहेच. मनुष्य जी ही स्वतंत्रता मिळवूं पाहतो तिचें स्वरूप काय? आणि हें ठरवतांना, अशा वेळींच चुका होण्याचा फार संभव असतो. कोणी म्हणतात कीं, "कसलें स्वातंत्र्य घेऊन बसलांत! माहीत आहे तुमचें स्वातंत्र्य! स्वतंत्र व अनिर्बंध वागूं पाहणारे तुम्ही शेवटीं स्वतःच्या वासनांचे गुलाम होतां झालें! तुमचें स्वातंत्र्य तुम्हांला स्वच्छंदी बनवितें; विलासी, सुखलोलुप व स्वार्थी बनवितें! असें हें पै किंमतीचें तुमचें स्वातंत्र्य आहे. त्यानें विकास तर दूरच राहिला. विनाश मात्र दारांत येऊन उभा राहील. तुमचें स्वातंत्र्य म्हणजे वासनांचें पराकाष्ठेचें दास्य होय!"

आपले सर्व व्यवहार, आपल्या सर्व क्रिया प्रथम आपल्या वासनांतूनच निर्माण होत असतात. आपल्या वासनांनींच आपल्या वृत्ति बनूं लागतात, त्या वाढूं लागतात. परंतु मागून कळूं लागतें कीं, वासना म्हणजे विकार आहे. एक प्रकारचा रोग आहे; या रोगांतून आपण मुक्त झालेंच पाहिजे. **आपल्या लहरीच्या ताब्यांत जाणें, आपल्या वासना अत्यंत प्रबळ होऊं देणें म्हणजे स्वातंत्र्य नव्हे.** आपल्या वासनांतील सद्वासना कोणत्या हें शोधून काढलें पाहिजे. कुवासनांचें अत्यंत सूक्ष्म परंतु बळकट असे बंध आपणांस जखडून टाकीत असतात. या वासनांच्या हातांतील खेळणें होणें हें फार भयंकर आहे; ही गोष्ट घातुक आहे, मारक आहे. शारीरिक व मानसिक, बाह्य व आंतरिक, स्थूल व सूक्ष्म, सर्व प्रकारच्या वासना व आसक्ति झडझडून फेंकून दिल्याशिवाय आपलें सत्यस्वरूप आपणांस कळत नसतें, तोंपर्यंत शुचिनिश्चय होत नाहीं, खरें स्वातंत्र्य लाभत नाहीं.

ज्याला अंतरात्म्याच्या अमृत क्षेत्रांत हें दिव्य, भव्य, स्वर्गीय स्वातंत्र्य, लाभतें त्याचें जीवन खरोखर किती विशाल, किती शांत, किती स्थिर, किती अनुपम आनंदमय, किती सुंदर, किती वैभवशाली ! तेथील ज्ञान-प्रकाश कधीं मावळत नाहीं. तेथें अखंड शांति, अखंड आनंद व अखंड प्रकाश भरून असतात. मुक्त पुरुषाला, जो खरोखर स्वतंत्र झाला त्याला, या दिव्य संपत्तीचा वारसा मिळत असतो. अखंड चिन्मयत्वाचें छत्र त्याच्यावर झळकत राहतें. हें महान् जीवन एकदां लाभलें म्हणजे मग तें साऱ्या गोष्टींत प्रकट होतें. तुम्ही कांहीं करा, त्यांत तें दिव्यत्व प्रकट झाल्याशिवाय राहणार नाहीं. मुक्त पुरुषालाच मुक्तीचा अर्थ कळतो. आपला स्वतंत्रपणा कसा कोठें दाखवावा, हें तोच जाणतो. मुक्त पुरुषाचेंच कर्म प्रभावशाली व प्राणमय असूं शकतें. त्याला स्वतःचा दुबळेपणा उरत नाहीं व दुसऱ्याची हडेलहप्पी व दडपेगिरी तो चालूं देत नाहीं. मुक्त, स्वतंत्र ! होय, **मुक्ति हेंच आत्म्याचें अंतिम प्राप्तव्य.** मुक्ति—खरें स्वातंत्र्य; तेथें रात्र नाहीं, अंधार नाहीं, संशय नाहीं, दुबळेपणा नाहीं. पूर्ण मोकळा प्रकाश ! अधिक नाहीं, कमी नाहीं ! विश्वांतील काना-कोपऱ्यांतहि अलोट प्रकाश ! अशा त्या प्रकाशाचें वर्णन करावयास जाल तर वाणी लटपटेल, कल्पना मागें मुरडेल, 'नेति' 'नेति' असेंच म्हणत बसावें लागेल !

आज्ञा पाळणें, हुकुमाप्रमाणें वागणें, मरणाच्या तोंडांत उडी घेणें, हीच शिपायाची प्रार्थना. विश्रांतीच्या वेळीं जप नको व कर्माच्या वेळीं निद्रा नको. योग्य वेळीं योग्य कर्म न करणें यांत हानि आहे; तो मोहच आहे. मोह वाईटाचाच असतो असें नाहीं, तर चांगल्याचाहि मोह असतो. **दिवसभर कर्ममय जप झाल्यावर रात्रीं निजावयाचे वेळेस माळा ओढीत बसणें हें योग्य नव्हे.** अशानें पुण्य मिळत नसतें. आई मुलाला सांगते, "जा, बाहेर खेळावयास जा–" त्या वेळेला आईला सोडून, आईला विसरून, एकदम बाहेर खेळावयास जाणारें मूल–तें आनंदी, सूर्यकिरणांप्रमाणें सुंदर, हंसरें मूल–त्या मुलाजवळ खरी मातृभक्ति आहे. तुमच्या शेंकडों नमस्कारांपेक्षां व प्रदक्षिणांपेक्षा त्या मुलाची ती बाहेर जाण्यांत असणारी, आईला विसरण्यांत असणारी भक्ति थोर आहे.

# गुरु व शिष्य



मनुष्याचा सर्वगामी जो विचार त्या विचाराच्या नियमाची गुरु-किल्लीच हिंदु धर्मांतील तत्त्वज्ञानानें दिली आहे. ज्या वेळेस हिंदु धर्मांतील तत्त्वाची निर्मळपणें व निःपक्षपातीपणें नीट मांडणी केली जाईल त्या वेळेस वरील गोष्ट नमूद केली जाईल. हिंदूंची तत्त्वज्ञानपद्धति असे सांगते कीं, प्रत्येक वस्तूच्या दर्शनानें, प्रत्येक विचाराच्या स्फुरणानें, आपण उत्तरोत्तर अधिक मोठ्या विचारवर्तुळांत शिरत असतों. जगांतील आजच्या सर्व प्रकारच्या अभ्यासांत व शिक्षणांत हीच दृष्टि मान्य केली गेली आहे, ही विचारपद्धति स्वीकारिली गेली आहे, असें दिसून येईल. बुद्ध धर्म हें हिंदु धर्माचेंच बाळ आहे ही गोष्ट धर्मपदाच्या प्रारंभींच्या शब्दांवरूनच दिसून येतें. सनातनधर्माच्या महासागरावरीलच एक लाट म्हणजे बुद्ध धर्म होय ही गोष्ट धर्मपदांतील प्रारंभींच्या शब्दांनीं जितकी स्वच्छपणें व स्पष्टपणें लक्षांत येतें, तितकी दुसऱ्या वचनांनीं व शब्दांनीं येणार नाहीं.

"आजची आपली अंतर्बाह्य स्थिति हें पूर्वींच्या चिंतनाचें व मननाचें फळ आहे. आजचें जीवन आपल्या पूर्वींच्या विचारांत प्रकट झालेलें आहे, पूर्वींच्या विचारांवर उभारलेलें आहे."

—धर्मपदाच्या आरंभींचे हे शब्द होत. ह्या शब्दांतील सत्यावर धर्माची उभारणी करणारा बुद्ध हा हिंदूच असला पाहिजे. सनातनधर्मीयांनाच वरील सिद्धान्त सुचेल, अन्यधर्मीयाला कदापि सुचणार नाहीं.

हिंदुस्थानांत ज्या शेंकडों विचारांना धर्मतत्त्वांचें स्वरूप मिळालें आहे, धर्मतत्त्वें अशी मान्यता लाभली आहे, त्या सर्वांत गुरुभक्ति हें तत्त्व, गुरुभक्तीची कल्पना, हा विचार फार रमणीय आहे आणि तितकाच कुतूहलजनकहि आहे. हा विचार परक्याला समजण्यास कठीण जातो. गुरुभक्ति म्हणजे कांहींतरी गूढ कल्पना असें परकीयांस वाटतें. एखादा विचार आपणांस मिळावा, कांहीं विशिष्ट प्रकारच्या ज्ञानाचा वा अनुभूतीचा स्पर्श आपणांस व्हावा, म्हणून ज्याच्याजवळ तो विचार किंवा तें ज्ञान किंवा ती अनुभूति असेल, त्याच्या चरणांजवळ आपलें मन रिकामें

करून भक्तिपूर्वक मुकेपणानें वसणें, त्या पुरुषाची अखंड प्रेमानें व नम्रतेनें सेवा करणें, हा जो मार्ग त्या मार्गांतील रहस्य कळून त्याच्यावर श्रद्धा वसण्यास त्या मार्गाचा अनुभवच घेतला पाहिजे. त्या मार्गाची कसोटी घेतली पाहिजे. गुरुभक्तीचा हा जो मार्ग तो केवळ अध्यात्मिक शिक्षणाचे बाबतींत आहे असें नाहीं, तर इतर ज्ञानाच्या बाबतींतहि असू शकेल. सटरफटर शेंकडों गोष्टी वरपांगी धार्मिक स्वरूपाच्या सांगण्यांच्या क्रियेंत मात्र ती असणें शक्य नाहीं.

सत्याला ग्रहण करावयास चित्त सदा तत्पर असलें पाहिजे. रिकाम्या भांड्यांतच ओततां येतें. विहिरीमध्यें अपार पाणी आहे, परंतु पोहरा जर वांकणार नाहीं तर त्याच्यांत पाणी शिरणार नाहीं. नम्रपणा हा ज्ञानाचा आरंभ आहे. त्याच्याजवळून आपण कांहीं शिकतों त्याला आपण पूज्य मानिलें पाहिजे. ज्याच्याबद्दल आपणांस आदर वाटत नाहीं त्याच्यापासून आपण काय शिकणार? काय घेणार? त्याच्या शब्दांकडे आपण लक्षहि देणार नाहीं; त्याच्या उपदेशाची व शिकवणुकीची आपण टर करूं. जेथें आदर नाहीं तेथून ज्ञान आपणांस घेतां येणार नाहीं. वयानें मोठें, अधिकारानें मोठें, संबंधानें मोठे—अशा सर्वांना आपण उत्थान देतो, आदर दाखवितों. **परंतु चारित्र्य व पावित्र्य, ज्ञान व विद्या यांच्यामुळें जो मोठा त्याच्यासमोर तर निरहंकारपणें लोटांगणच घालावें असें वाटतें,** त्याची धूळ आपल्या मस्तकीं धारण करावी असें वाटतें, त्याच्या पायाची धूळ आपण बनावें असें मनांत उत्कटत्वानें येतें. आपणांस शिकविणारे अनेक शिक्षक आहेत. जगांतील सजीव, निर्जीव प्रत्येक वस्तु आपणांस शिकवीतच आहे. हें सारें चराचर म्हणजे गुरूच आहे. परंतु त्या लक्षावधि गुरूंमध्यें एक सद्गुरु असतो – ज्याचें केवळ अस्तित्व, ज्याचें केवळ दर्शनच अनंत गोष्टी शिकवीत असतें. ‘ जया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे ’ असा तो असतो. त्याचें सारें जीवन मुकाट्यानें आपणांस कांहींतरी देतच असतें. ‘ गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यस्तु छिन्नसंशयः । ’— अशी ती स्थिति असतें. अशा गुरूचें केवळ अस्तित्व म्हणजेच महाशिकवण होय. असा जो असेल, ज्याच्याजवळ गेल्यानें हा अनुभव येईल तोच खरा गुरु. आपण आपल्या अनुभवानें

शेवटीं कोठें जावयाचें हें तोच दाखवून देतो. कोठलेंहि ज्ञान असो— अगदीं साध्या क्षुद्र वस्तूचें का तें असेना – तें ज्याच्यापासून आपणांस मिळालें, तें जें कायमचें आतां आपलें झालें, तो जो ज्ञानदाता, त्याचें स्मरण आपण सदैव केलें पाहिजे. तो ज्ञानाचा उगम विसरणें म्हणजे कृतघ्नतेसारखें ओंगळ व वाईट या जगांत दुसरें काय आहे?

**जो जो आपणांस भेटेल, दिसेल, आढळेल, त्याच्याकडे हा ज्ञानदाता आहे या दृष्टीनेंच आपण सदैव बघावें.** ह्याच्यापासून आपण कांहीं तरी घेऊं, ह्याच्यापासून आपण कांहीं तरी शिकूं, अशा भावनेनेंच त्याच्याकडे पाहावें. प्रत्येकाचे अनुभव, प्रत्येकाला लाभलेले सत्याचे साक्षात्कार, ते पाहाण्यासाठीं, ते समजून घेण्यासाठीं, आपण दक्ष व उत्सुक असलें पाहिजे. संधि कधीं गमावतां कामा नये. अशा रीतीनें सदैव ज्ञानोत्सुक जर आपण राहूं, ही संवय जर स्वतःला लावून घेऊं, ज्ञानाबद्दलचा हा आदर जर अशा रीतीनें वृद्धिंगत होईल, तर दुसऱ्यांच्या मतांबद्दल व विचारांबद्दल पूज्यभाव, आदर व सहानुभूति दाखविण्यास आपण शिकूं. सुसंस्कृत व थोर पुरुषांच्या सहवासांत राहण्याचें भाग्य ज्याला लाभतें, त्याच्या ठिकाणीं ही वृत्ति येते. विचारक्षेत्रांतहि मागचा व पुढचा हा भाव असतो. ही गोष्ट जो विसरून जातो, आपलेंच मत खरें व हें आपणच प्रथम जगाला देत आहोंत—मागें कोणीं दिलें नाहीं, पुढें याच्याहून चांगलें कोणी देणार नाहीं – असें ज्याला वाटतें, तो मनुष्य हीन वृत्तीचा व असंस्कृत मनाचा समजावा. त्याला सत्संगति मिळाली नाहीं, थोरांच्या सहवासांत, संतांच्या मेळाव्यांत, तो कधीं गेला नाहीं असें समजावें.

जी पिढी नवविचार घेत असते, नवीन दृष्टि ग्रहण करीत असते, नवमतवादी म्हणून जी होऊं पाहात असते, त्या पिढींतील तरुण लोकांच्या मार्गांत तर असें अहंकार पदोपदीं नडतील. एका बाबतींत आपल्या पूर्वजांच्या मार्गाहून आपण भिन्न मार्ग घेत आहोंत, एवढ्यानेंच दुसऱ्या इतर क्षेत्रांत आपल्या पूर्वजांना अधिक ज्ञान व अधिक अनुभव होते ही गोष्ट ते विसरून जातात. आणि जो नवीन मार्ग त्यांनीं आज स्वतः स्वीकारला आहे, त्या मार्गांतहि त्यांच्याकडून पुष्कळ

पुढें गेलेली, त्यांच्याकडून थोर थोर अशी मंडळी आहेत हेंहि ते विसरतात. ह्यामुळें त्यांच्या ठिकाणीं अहंकार उत्पन्न होतो. जो नवविचार आपलासा करून घेत आहेत, जें नवीन ज्ञान ते मिळवीत आहेत, त्यामुळें ते आपल्या सभोंवतालच्या लोकांपासून अहंकारानें व ऐटीनें जर दूर राहातील, तर तें नवीन ज्ञान फारसें किंमतीचें नाहीं असें खुशाल समजावें. **जें ज्ञान सहकार्य शिकवीत नाहीं, नम्रता देत नाहीं, पूर्वसंस्कृतीबद्दल आदर दाखवीत नाहीं, तें ज्ञान तरुणांचा विकास कसें करणार** ? अशा घमेंडखोर व तुसडेपणाच्या वृत्तीमुळें तरुणांचेंच नुकसान होतें. अशा अविनयी स्वभावामुळें सुसंस्कृत मंडळींत, थोरांच्या बैठकींत त्यांना जातां येत नाहीं. थोरांच्या बैठकींत एकदोनदां त्यांची परीक्षा घेतली जाते. परंतु शेवटीं हीन जनांच्या संगतींत, स्वतःहून लहान असलेल्या लोकांतच राहण्याची त्यांच्यावर पाळी येते व तेथें ते नायक होतात, पुढारी व देव होतात. ' वासरांत लंगडी गाय शहाणी ' या नात्यानें मग ते तेथें मिरवतात व स्वतःच्या अहंकाराची तृप्ति करून घेतात, पूजा करून घेतात त्यांना तेथें सदैव स्वस्तुतीच ऐकूं येतें व आपण फार मोठे आहोंत असें त्यांना वाटूं लागतें. अशांचा विकास थांबतो, वाढ खुंटते. नवीन विचारांचा प्रकाश, नवीन विचारांची हवा त्यांना मिळत नाहीं. आपण सर्वज्ञ आहोंत, आपणास कोण काय नवीन देणार, या ऐटींत राहिल्यामुळेंच ते अज्ञानांत राहातात, अंधारांत राहातात. अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेले हे सर्वज्ञशिरोमणि जे खरोखर श्रेष्ठ आहेत. त्यांना त्रासदायक वाटतात. अशांचा उर्मटपणा व उथळपणा ते किती सहन करणार ? हे उल्लू तरुण त्यांना असह्य वाटतात. आपणच खरे नेते, आपणच अद्वितीय पुढारी, असें ज्या तरुणाला वाटतें, ह्या कल्पनेनें जो घेरला गेला, ग्रासला गेला—असा तो तरुण म्हणजे समाजाला जडलेला रोगच होय. शनीची साडेसाती ती. **जो शिकण्याच्या वृत्तीचा असतो. मला अजून काय समजले आहे, कांहींच नाहीं, अशी ज्याची नम्रपणाची, वरपांगी नव्हे तर आंतरिक वृत्ति असते, नवीन विचारासाठीं, नवीन ज्ञानासाठीं, सर्वस्व अर्पण करावयास जो उत्सुक असतो, स्वतः कष्टपूर्वक सेवा करूनहि विनयानें जो थरथरत उभा**

**असतो, ज्याच्यामध्यें उत्कटता, उत्सुकता व नम्रता सारख्याच प्रमाणांत दिसून येतात—अशा तरुणाला थोर विचार स्फुरत असतात.** ‘ वत्स, एहि एहि ’ अशा प्रकारची हांक, प्रेमळ व गंभीर हांक, परमोच्च ध्येयें त्याला मारीत असतात. परंतु ही नम्रता ज्याच्या गांवींहि नाहीं, पुढारी म्हणून ज्याला मिरवावयाचें असतें, तो स्वतःला वाटेल तेव्हां विकील. तो आज या छावणींत घुसेल, उद्यां त्यांच्या कंपूंत शिरेल. आज येथें पुढारी, उद्यां तेथें पुढारी. जेथें पुढारीपण मिळेल तेथें तो जातो व लगेच तेथलीं मतें व विचार त्याचींच होतात. मतें व विचार म्हणजे जणुं सदरे कोट. वाटेल तेव्हां बदलावे, वाटेल तेव्हां फाडावे, फेंकावे, नवीन धारण करावे ! परंतु खरे पुढारी—ते जन्मतःच पुढारी असतात. पुढारी जगाच्या कारखान्यांत व बाजारांत तयार करितां येत नसतो. तो धरूनच पुढारीपण व त्याला लागणारे गुण घेऊन येत असतो. **पुढाऱ्याची मूर्ति प्रत्यक्ष परमेश्वरानें घडविलेली असते व ती या जगन्मंदिरांत पाठविली जाते.** श्रद्धाळू व कष्टाळू सेवकांतूनच नेते निर्माण होत असतात. आपल्यांतून थोर पुढारी निर्माण व्हावेत, आपणांमधून थोर नेते समाजाला मिळावेत, म्हणून आपण भरपूर सेवा करूं या; खूप मेहनत करूं या; नम्रपणानें, गंभीरपणानें व मुकाट्यानें खोल असे जे विचार ते सेवा करतां करतां ग्रहण करीत राहूं या. मग खऱ्यानें त्यांची तूट राष्ट्रास भासणार नाहीं. परंतु जेथें असे सेवकच नाहींत, तेथें नेत्यांचें दुर्भिक्ष्यच असावयाचें ? जेथें पाणीच नाहीं तेथें कमळें कुठून फुलणार ? मग प्रत्येक सेवकच नेता म्हणून मिरवूं लागतो व पूर्वी त्याच्या हातून होणारी थोडीफार सेवा तिलाहि तो मग या पुढारीपणामुळें पारखा होतो.

त्या त्या विषयांतील गुरु, त्या त्या विचारक्षेत्रांतील गुरु त्या विवक्षित ज्ञानप्रांतांत आजपर्यंत जितकी प्रगति झालेली असेल त्या प्रगतीच्या पराकोटीशीं आपणांस घेऊन जात असतो. आईबापांपासून शरीर मिळतें गुरूपासून अध्यात्मिक व बौद्धिक जीवन आपणांस मिळतें. आईबाप जगाच्या बाहेरच्या अंगणांत आपणांस आणून सोडतात; गुरु जगाच्या अंतःपुरांत घेऊन जातो. ह्या क्षणापर्यंत जें जें कळलें, जें जें ज्ञान झालें, तें

सारें तो दाखवितो. त्या त्या विषयांतील आजतागायत ज्ञानाची तो मूर्ति असतो; त्या ज्ञानाचा तो प्रतिनिधि असतो. ज्ञानाच्या अदम्य तृष्णेनें, शिक्षणाच्या अतुलनीय उत्कंठेमुळेंच तो असा ज्ञानमूर्ति झालेला असतो. ज्याच्याजवळ शिकण्यासाठीं, जगांतून सारखें ग्रहण करण्यासाठीं, अनंत शक्ति व अनंत उत्साह आहे, ज्याचे मन व बुद्धि कधीं थकतच नाहींत, तो सदैव शिकूं पाहाणारा नम्र पुरुष थोर शिकविणारा गुरु या पदवीला चढेल.

विद्यार्थ्यांनीं ज्ञान कसें मिळवावें, रसग्राही कसें व्हावें, हें शिकविण्यासाठीं विद्यापीठें असतात. वस्तुमात्रांतील ज्ञानाचा मध कसा चोखून घ्यावा त्यांचें रहस्य, त्याची पद्धति, विद्यापीठांनीं समजून द्यावयाची असते. उडण्याची कला शिकवून, भक्ष्य कसें मिळवावें हें शिकवून, पक्षी पिलांना स्वातंत्र्य देतात. दिलेल्या परिस्थितींतून, दिलेल्या जगांतून दिलेल्या वस्तुजातांतून, जो जास्तींत जास्त ज्ञान मिळवून घेतो तो सर्वांहून मोठ्या बुद्धीचा. जो जास्त रस शोषून घेईल तोच खरा रसग्राही. गुळाचा एकहि कण, साखरेचा एकहि कण मातींत शिल्लक आहे तोपर्यंत मुंगी जात येत राहील. शिक्षणाची सर्वांत मोठी खूण म्हणजे मनुष्याची ग्रहणशक्ति किती वाढली तें पाहणें ही होय. शिक्षणानें नम्र किती झाला, ज्ञानासाठीं प्रेमानें प्रत्येक वस्तुजवळ वांकण्याची वृत्ति किती उत्पन्न झाली, एक प्रकारें निष्क्रिय, मुका व स्थिर होऊन—थोडक्यांत मन रिकामें करून जगांतील ज्ञानरस आंत किती भरून घेतो—यावर सारें अवलंबून आहे. आपण पोकळ झालें पाहिजे, कीं जगांतील ज्ञान आंत शिरलेंच समजा; श्रीकृष्णाचा उपदेश काय फक्त पार्थच ऐकत होता? श्रीकृष्णाचे शब्द ऐकून रथाचे घोडेहि फुरफुरत होते, नाचत होते; घोडेच नाहीं तर तो निर्जीव रथ—त्या रथावरहि घों घों करून येणारा श्रीकृष्णाच्या गंभीर वाणीचा जो प्रवाह—त्याचा परिणाम होत होता. नर, हय, रथ—तिघे जरी केवळ मूक राहून उपदेश श्रवण करीत होते तरी तिघांच्या मुकेपणाची भूमिका, तिघांची ग्रहण करण्याची भूमिका—ती एकच होती का? ती सारखीच होती का? नाहीं. दोन माणसेंहि जर निरनिराळ्या रीतीनें ऐकतात—मग येथें तर नर, तुरंग व रथ असें श्रोते आहेत! प्रत्येकाची

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय ठाणे.
ग्रं. क्र. ६३०२ नों दि ........
दि. ... ५। ५।



योग्य वेळ आली पाहिजे. त्याला कळलें तें मला कळत नाहीं, म्हणून आदळआपट करण्यांत काय अर्थ ? योग्य वेळ आल्याशिवाय कोणतीहि गोष्ट करणें म्हणजे धसमुसळेपणा होय. आपली मूकता आपणांस पुढें पुढें नेतच असते. गुरुचरणाजवळची आपली मूकता, ती का आळशी असते ? नाहीं. ती अत्यंत काम करीत असते. आपल्या अनंत गत जन्मांतील सारी धडपड, सारे झगडे, साऱ्या गुंतागुंती त्या गुरुपदाशीं मुकेपणानें बसण्यांत असतात.

**आपल्या सावकाराच्या पाठीमागें, आपल्या सिद्धीच्या पाठीमागें, यशाच्या पाठीमागें गुरुकृपा असते, गुरुचें सामर्थ्य असतें.** आपला प्रयत्न कशासाठींहि असो, परंतु मानवजातीनें जे जे अनुभव पूर्वीं मिळविले, जे जे शोध केले, जी जी कमाई केली, तें सारें जर पुन्हा आपण नव्यानें करून बघूं असें म्हणूं तर आपले प्रयत्न व्यर्थ जातील. पूर्वींच्या अनुभवांची शिदोरी न घेतां अहंकारानें आपण जर जगूं लागलों तर एक रेघोटी येथें, एक रेघ तेथें, एक सूचना येथें, एक कल्पना तेथें याहून जास्त कांहींएक करतां येणार नाहीं. कारण शास्त्र अपार आहे व जीवित हें अत्यल्प आहे. अनंतस्वरूपी ज्ञानेश्वराकडे मानवजातीची यात्रा सारखी सुरू आहे. त्या यात्रेंतूनच जर आपणहि जाऊं तर श्रेय मिळेल, पुण्य घडेल. पूर्वजांची जी कालपर्यंतची सिद्धि-तिच्यावर मी उभा आहें; उद्यांची उषा माझी आहे. ज्या उंचीवर आधींच आपण उभे आहोंत, ती उंची अनेक शतकांतील लहानमोठ्यांच्या श्रमांचें फळ आहे. गुरूजवळ आपण निष्ठेनें राहिलों म्हणून हें स्थान आपणांस मिळालेलें असतें. ह्या उंचीवर आणून त्यानें बसविलें. जसजसें आपलें ज्ञान वाढेल अनुभव वाढेल, तसतशी आपण ज्ञानांत घालण्यासाठीं आणलेली भर–तो आपला कण अत्यंत क्षुद्र आपणांस दिसूं लागेल. जसजसे अधिक शिकूं, तसतसा इतिहासाचा सिंहनाद, इतिहासाचें रणशिंग जास्तच गंभीरपणें ऐकूं येऊं लागेल. मोठमोठ्यांची कृत्यें, विचार व वचनें ह्यांच्यांत अधिकच अर्थ दिसूं लागेल, अधिक रहस्य दिसूं लागेल. आपल्या गुरूप्रमाणें आपणहि मग अधिकाधिक पाहावयास शिकूं–उंच जाण्याचा प्रयत्न करूं. त्या गुरूच्या वतीनें त्याच्याच झेंड्याखालीं राहून नवीन नवीन

प्रांतांत घुसूं; त्याच्याच देखरेखीखालीं, त्याच्याच कृपाछत्राखालीं, त्याच्याच स्फूर्तीनें अन्यत्र नवीन प्रयत्न करूं.

**जो सद्गुरु असतो तो कांहींएक मागत नसतो.** शिष्याची देणगी न मागतां येते. गुरु फक्त ध्येयदर्शन करवितो. गुरु शिष्याला गुलाम करीत नाहीं. गुलामगिरी ही निराळ्याच जातीची अन्यत्र वाढणारी विषवल्ली आहे. गुरूच्याजवळ ती वाढत नाहीं. सद्गुरु जितकें स्वातंत्र्य देतो, तितकें कोणीच देत नाहीं. ज्या स्वातंत्र्याच्या मोकळ्या हवेंत ध्येयाचीं फुलें फुलतात, जें दिल्यानें ध्येयाचा अधिकच विकास होतो, तें स्वातंत्र्य सद्गुरूइतकें देणारा कोण आहे? आणि शिष्यहि मागावें त्याहूनहि अधिक भक्तिप्रेम देतो. सद्गुरु स्वातंत्र्य देतो. म्हणूनच शिष्य भक्ति देतो. आणि शेवटीं असा एक भाग्याचा दिवस उजाडतो कीं, त्या दिवशीं सद्गुरु शिष्याला म्हणतो, "वत्सा, आतां सेवा पुरे. आतां तुला बळवान् पंख फुटले आहेत. जा आतां व स्वतंत्र गगनविहार कर." गुरुशिष्यांचे स्थूल संबंध, बाह्य बंधनें तोडून शिष्याला दूर जा असें सांगण्याचें कठिण काम, शिष्याला स्वातंत्र्य देण्याचें काम गुरूच करतो. कारण शिष्याला सेवेंत व भक्तींतच आनंद वाटत असतो. तो सोडून जावयास तयारच नसतो. परंतु खरा विकास हा बंधनांत होणार नाहीं हें जाणून, खरी कसोटी बंधनांत नाहीं हें जाणून, गुरु शिष्याला मोकळा करितो.

गुरूच्या सिद्धींत शिष्यांची शक्ति आहे. गुरुजवळ ज्या मानानें असेल त्या मानानें शिष्यास मिळेल. गुरूच्या जोरावरच शिष्याच्या साऱ्या उड्या. **अध्यात्मिक जगांत निराधार असणें याहून दुर्दैव नाहीं.** ज्याला पाळ ना मूळ, ज्याला माय ना बाप, ज्याला सखा ना सद्गुरु—असा उपटसुंभ कोणीतरी होणें, अशी कोणाशीं संबंध नसलेली, कोणावर न कधीं विसंबिलेली अपूर्व विभूति होणें ह्यापेक्षां जन्माला न येणें बरें. ज्याला खालीं खोल मूळ नाहीं, आधार नाहीं, असलीं कुत्र्याचीं भुतें किती वेळ टिकणार? काय दिवे लावणार? तीं उगवलीं नाहींत तों वाळून जातील, दिसलीं नाहींत तों अदृश्य होतील. त्याचप्रमाणें असेहि दुसरे कांहीं आहेत, कीं जे स्वतःच्या विकासाला बांध घालतात, स्वतःला मिळालेल्या देणगीची वाढ करीत नाहींत—तेहि लवकर मरतात. जो

प्रवाह पुढें जाणार नाहीं. दुसऱ्या शेंकडों प्रवाहांशीं प्रेमानें मिळणार नाहीं, मोठ्या प्रवाहांशीं मिळून त्यांचे हितगूज ऐकत नाहीं, तो प्रवाह गंगेला मिळणार नाहीं व म्हणूनच महान् सागराचें दर्शनहि त्याला नाहीं. तो प्रवाह सुकून जाईल--नाहींसा होईल.

* * *

## पूजेचें फूल : ८ :

ज्या ज्या वेळेस आपण एखादी जुनी हस्तालिखित पोथी, एखादी जुनी तसबीर, एखादे जुनें रत्न, 'किंवा अगदीं साधीं का गोष्ट होईना— एखादें भांडें, एखादा जरकाम भरतकाम केलेला कापडाचा तुकडा—. आपल्या हातांत घेऊन पाहतों, त्या वेळेस क्षणभर का होईना, आपल्या मनांत एक विशिष्ट भाव सहजपणानें उत्पन्न होतो. प्रदर्शनांत, एखाद्या संग्रहालयांत, अजबखान्यांत जाऊन त्या वस्तू हातांत घेऊन पाहा. एक विशेष भाव हृदयांत जागृत होतो. ती ती वस्तु पाहातांच मनाला प्रसन्नता वाटते. ज्या कारागिरानें ती वस्तु तयार केली त्यानें स्वतःचें सारें जीवन आनंदानें त्या वस्तूसाठीं दिलें होतें. हृदयाच्या रंगानें त्यानें ती वस्तु रंगविली होती. मारूनमुटकून, गरज आहे म्हणून, इच्छा नसतांना तें काम निर्माण झालेलें नाहीं. मारूनमुटकून केलेलें काम दुसऱ्याला प्रसन्न करणार नाहीं, दुसऱ्याच्या हृदयाला स्पर्श करणार नाहीं. ज्या कामांत आपलें प्रसन्न व मोकळें मन ओतलेलें आहे, तेंच काम दुसऱ्याच्या मनांत प्रसन्न भाव जागृत करील. त्या कलावस्तूंत कारागिर जें सौंदर्य ओतीत होता, त्यांत त्याचा सारा धर्म होता. त्या क्षणापुरता, त्या घडीपुरता— त्याची कला हाच त्याचा परमधर्म होता. ज्या वेळेस स्वतःला विसरून आपण कर्म करीत असतो त्या वेळेस आपण अत्यंत धर्ममय असतों.

मोठमोठीं कामें अशा प्रकारेंच निर्माण होतात. ज्याच्या निर्मितींत माणसानें जीवन ओतलें नाहीं, हृदयाचें रक्त ओतलें नाहीं, ती निर्मिति.

कवडीमोल होय. **आपल्या रक्तानें कर्म रंगवा म्हणजे श्रीरंग तुम्हाला भेटेल.** बेफिकीर व विचारशून्य माणसाच्या दृष्टीला ज्या गोष्टी क्षुद्र व कमी महत्त्वाच्या वाटतात त्यासाठीं लोकांनीं जीवनें दिलेलीं असतात. एक सुंदर वीणा तयार करावयास एक वर्षहि लागेल, सारें जीवनहि कदाचित् खलास होईल. तें वाद्य उत्कृष्ट तयार करण्यासाठीं साधनें सारखीं शोधीत रहावें लागेल. चांगला दांडा, चांगला भोपळा—त्यांना कमावून तयार करणें, मजबूत करणें, तारा जोडणें, त्या तारा कशा लावाव्या, किती लावाव्या, अंतर किती राखावें, ते माणि अडकावयाचे, ती घोडी चढवायची, त्या खुंट्या बसवायच्या—शेंकडों गोष्टी आहेत. तो वीणाकार त्यासाटीं रात्रंदिवस श्रमतो व ती वस्तु तयार करतो. त्या वीणाकाराप्रमाणेंच दुसरेहि असे वेडे पीर असतात. कोणी हस्तलिखित ग्रंथच सुंदर व नकशीनें सजवून ठेवितो, कोणी कलावतूचें अपूर्व काम करतो, कोणी सूर्यकिरणासारख्या झिरझिरीत व तलम शाली तयार करतो. अशीं दृश्यें भारतांत परवांपरवांपर्यंत पाहावयास मिळत होतीं. अशा सुंदर आश्चर्यकारक वस्तू राजेमहाराजांच्या संग्रहीं राखलेल्या अहेत. भारतांतील कलावानाची ही निःसंगवृत्ति अजूनहि कोठें कोठें निदर्शनास येते. रस्त्यावर, बाजारांत, गरिबांच्या गल्लींतून असे कलावान् काम करतांना अजूनहि दिसतील. भारतवर्षाचें अजून खरें म्हटलें तर मध्ययुगच चाललें आहे. यंत्रांचा—निर्जीव यंत्रांचा-सुळसुळाट अजून येथें फारसा झाला नाहीं. अजूनहि वस्तूंमध्यें अंतरें ओतून, जीवनें ओतून, त्या वस्तू समाजाला पुरविणारें अल्पसंतोषी कारागीर भारतांत वावरत आहेत. मध्ययुगांतून अर्वाचीन युगांत शिरावयाचें झालें तर किती शिरावें याचा विचार करीत भारतवर्ष घुटमळत उभा आहे. त्याच्या पाठीमागें मध्ययुग आहे व समोर अर्वाचीन युग आहे.

**मध्ययुगाचे काय बरें विशेष होते?** मध्ययुगांत असें काय विशेष होतें, कीं ज्यामुळें कारागीर हातांतील अत्यंत मोलवान् कामापासून तों साधी हुक्क्याची नळी बनविण्याच्या कामापर्यंत—सर्वांमध्यें सौंदर्य व कला ओतीत असत? या गोष्टीचा क्षणभर विचार करण्यासारखा आहे. **पहिली गोष्ट म्हणजे त्या काळांत सुंदर व थोर असा साधेपणा होता.** ज्या

खोलींत माणूस काम करी, कला निर्मी, तेथेंच खाणेंपिणें, उठणेंबसणें; तेथेंच त्याचा जप, तेथेंच त्याची झोंप, तेथेंच शेजघर व तेथेंच देवघर, सारें तेथेंच. नाना प्रकारच्या काम्य व भोग्य वस्तूंनीं त्याचें घर भरलेलें नसे. त्याची इच्छा एकच असे, व ती त्याच्या कामांत ओतलेली असे. तीच त्याची हौस, तोच आनंद. त्याच्या खोलींतील जास्तींत जास्त शोभेच्या वस्तु म्हणजे एखादें शेषशायी भगवानाचें चित्र व त्याच्याच हातचे कलांचे कांहीं नमुने. आपल्या कामांत पूर्णता आली पाहिजे ही जी त्याची इच्छा, त्या इच्छेला दुसरें कोणतेंहि खाद्य त्याच्या खोलींत नसे. ती इच्छाच स्वत:ला खाई व पुष्ट होई. सभोंवतीं अत्यंत साधेपणा असणें—वरती निळा चांदवा, खालीं भूमिमाय—दुसरें कांहीं नको. या साधेपणाचा कलेवर किती व काय परिणाम होतो हें आपणांस समजून येत नाहीं; परंतु त्याचा फार खोल परिणाम होत असतो. कांहीं नसण्यांत जें सौंदर्य आहे तें पाहणारे फार थोडे. भारतवर्षांतील हा साधेपणा आपणांस आजहि दुकानांतून दिसून येईल. वाणी आपल्या मित्रांना आपल्या दुकानांतील मालाच्या राशींतच भेटतो—सभोंवतीं मीठ, मिरची, गूळ, तेल पडलेलेंच असतें. मध्ययुगांत भारतीयाला अभ्यासाची खोली, प्रयोगाची खोली, जेवणाची खोली, लोकांना भेटण्याची खोली—साऱ्या कर्मांची एकच जागा व एकच खोली असे.

**दुसरी गोष्ट म्हणजे थोड्या गरजा.** हें पाहिजे, तें पाहिजे, अशी त्या वेळच्या लोकांना भगभग नव्हती. त्यामुळें व त्या काळांत भरपूर खाण्यापिण्याला मिळत असल्यामुळें मध्ययुगीन कारागिराला एका घटकेंत लखपति व्हावें अशी श्रीमंत होण्याची असोशी व उताविळी नसे. आज नानाप्रकारच्या सुखसोयी व विलासवस्तु यांच्यासाठीं श्रीमंत व्हावें, पैसे मिळवावे, असें वाटत असतें. आज गरजा व मोह वाढले आहेत, व देश तर दरिद्री झाला आहे. त्या काळांत हल्लींचे नाना मोह नव्हते. त्यामुळें कामांत भरपूर वेळ देतां येत असे. जी वस्तु कारागीर तयार करी, ती त्याच्या जीवनाचें सुख असे; ती वस्तुच त्याचें बक्षीस, तोच त्याचा आनंद. आपणांस ह्या वस्तूपासून आनंद होत आहे तसाच तो इतरांसहि होईल अशी सुद्धां भावना त्याच्या हृदयांत येत नसे. आपण

क्रमांक ३०५१७

चित्रांत अमुक रंग गर्द कां दिला, येथें जरा छाया कां दाखविली, येथें जरा वांक कां दिलें; या गोष्टींचीं तीं कारणें व त्यांचा आनंद तो त्याचा त्याला ठावा. तो आनंद त्याची सहृदयता–याची दुसऱ्यास काय कल्पना येणार ? तो आपल्याच वस्तूस पाही, तिचें चुंबन घेई, तिला हृदयाशीं धरी. ती वस्तु तो दुरून पाही, जवळून पाही. ती वस्तु म्हणजे त्याचा देव, त्याचें बाळ. ती वस्तु म्हणजे त्याचें ध्येय, त्याचा आनंद. होणाऱ्या आनंदाची अंधुक कल्पनाहि त्यांला इतरांस देतां येत नसे. तो अंतरीं उचंबळे, हेलावे, डोले. स्वतःचा आनंद तो शब्दांत व्यक्त करूं शकत नसे. तो वर्णन करावा असेंहि त्याच्या मनांत स्वप्नींहि येत नसे. तो आनंद स्वसंवेद्य असे, म्हणूनच फार पवित्र असे.

वस्तु निर्माण करणाऱ्याला स्फूर्ति कोठून मिळाली, प्रेरणा कशांतून झाली, हें जर कळलें तर त्या वस्तूचें स्वरूप समजण्याला अधिक मदत होते. त्या वस्तूचें स्वरूप अधिक स्वच्छपणें ध्यानांत येतें. त्या ज्ञानाचा मग दिवा हातांत घेऊन त्या वस्तूकडे आपण पाहतों. **पैशाचा किंवा नांवलौकिकाचा हेतु जर कलावस्तूच्या निर्मितीच्या मुळाशीं असेल तर कलेंतील सारा अभिजात मोठेपणा नाहींसा होतो.** कलेच्या मुखमंडलाभोंवतीं असणारें तेजोवलय नाहींसें होतें. खऱ्या कलावंताला कशाची अपेक्षा? नसते न धनाची, न मानाची. आपल्या मर्त्य हातांकडून अमर्त्य वस्तु निर्माण व्हावी यांतच त्याचा सारा संतोष भरून राहिलेला असतो. दुष्काळ पडला तरी पुनः पुनः पेरणाऱ्या कष्टाळू व श्रद्धाळू शेतकऱ्याप्रमाणें मार्गांत कितीहि निराशाजनक परिस्थिति आली तरी पुनः पुनः तो आपल्या कामाला मनःपूर्वक वाहून घेतो. आपलें कमळ उत्कृष्टपणें फुलविण्यासाठीं तो आपली पराकाष्ठा करतो. सर्व सामर्थ्य त्या कामीं खर्च करितो. कीर्ति मिळेल कीं नाहीं, गौरव होईल कीं नाहीं, धनलाभ होईल कीं नाहीं, त्याची चिंता त्याला कशाला? तो त्याचा–खऱ्या कलावंताचा प्रश्नच नव्हे.

**स्वतःच्या अंतःकरणांतील भावनांना प्रकट करण्यासाठीं खरा कलापूजक कलासर्जन करीत असतो.** त्या सर्जनाच्या द्वारा तो स्वतःच्या अंतराला बाहेर पाहात असतो. आपल्या भावनांचें आंतररूप बाहेर

पाहण्याची त्याला इच्छा असते. स्वतःला मूर्त झालेलें पाहण्याचा जो आनंद, त्या आनंदासाठीं तो तें काम करतो. ज्या ज्या व्यक्तीवर तो प्रेम करतो त्या सर्वांना त्याची ती कलावस्तु आवडते. अशा साध्या, सरळ व भावनोत्कट जीवांच्या आनंदामधूनच, त्यांच्या निरागस, अकपट व सहज-सुन्दर निर्दोष सुखामधूनच जगांतील अत्यंत भव्य व दिव्य, लावण्यपूर्ण व हृद्यंगम अशा वस्तू निर्माण झाल्या आहेत. लहान मूल खेळण्यांशीं खेळतांना ज्याप्रमाणें रंगून जातें त्याप्रमाणें हे साधे सरळ जीव वस्तु-निर्मितींत रंगून जात. काम हाच त्यांचा आनंद व खेळ. मोठमोठीं गोपुरें, मंदिरें, मोठमोठीं भव्य लेणीं, सुन्दर चित्रें व रमणीय मूर्ति, मोठ-मोठीं शहरें व मोठमोठीं राज्यें—या वस्तू निर्माण करणाऱ्यांना त्या निर्माण करण्यांत अपूर्व आनंद वाटत असतो. सूर्यप्रकाशांत पांखरें उडतात व गाऊं लागतात. तितक्याच सहजतेनें हे लोक त्या त्या प्रिय वस्तु—आपल्या मनाच्या वस्तु—घडवीत असत.

**प्राचीन संस्कृतीनें ज्या गोष्टी मानवी आवाक्यांत आणिल्या होत्या, त्या अर्वाचीन संस्कृतीनें उधळून टाकिल्या आहेत.** विशेष गोष्ट म्हणजे आजचें जीवन साधें राहिलें नसून गुंतागुंतीचें व कृत्रीम झालें आहे. ह्या नवसंस्कृतीनें आपल्या गरजा कारण नसतांना बेसुमार वाढविल्या आहेत व नाना प्रकारचे मोह मार्गांत उभे केले आहेत. हे मोह पूर्वींच्या आपल्या एका बाजूला असलेल्या खेडयांत, त्या खेडयांतील झोंपडींत आपणांस माहीतहि नव्हते. आज निरुपयोगी अशा शेंकडों वस्तू उगीचच्या उगीच अडगळीसारख्या घरांत भरून ठेवण्याची वेडगळ संवय आपणांस लागत आहे; आणि ही संवय जडल्यानें शांतपणें अविश्रांत श्रम करण्याचा, आपल्याच कामांत रंगून जाण्याचा जो आपला बहुमोल गुण तो आपण गमावून बसलों आहोंत. दगड पदरीं घेऊन चिंतामणि फेंकून दिला आहे. आपल्या घरांत वेडयावांकडया तसबिरी, कोठलीं तरी व कसली तरी चित्रें, मोडक्या खुर्च्या व फुटकीं टेबलें, बांकें व स्टुलें, कप व बशा भरल्या आहेत व त्या वस्तू साफसूफ करण्यांतहि भराभर श्रम खर्च होतो व वेळ वाया जातो. ह्या वस्तू

घरांत आणून आपण नवीन ऐट दाखवूं लागलों आहोंत, श्रीमंती मिरवूं पाहात आहोंत. परंतु आपला तो पूर्वीचा सुंदर व मनोहर असा थोर साधेपणा, ती चित्ताची प्रसन्नता, शांति व एकाग्रता, ती हृदयाची तन्मयता या गोष्टी गमावून बसलों आहोंत.

तो थोर साधेपणा—त्या साधेपणाची पूजा करावयास फिरून चला. साधेपणांत असलेले ते थोर फायदे, चला ते परत मिळवूं. घरांत अडगळ नसणें, खटाळभर वस्तू नसणें, तें स्वच्छ व सुंदर रिकामें असणें म्हणजेच सौंदर्य. कांहीं नसण्यांत जें सौंदर्य आहे तें पुन्हां आणूं या. विचाराची गंभीरता, तिचा रंग पुन्हां पैदा करूं या. साध्या जमिनीवर टाकलेली एक चटई, पसरलेली घोंगडी—परंतु तिच्यावर बसणाऱ्याच्या मनांत परमोच्च विचार व रमणीय कल्पना! **साधी राहाणी व उच्च विचार-सरणी.** जवळ मंद प्रकाश देणारी समई, परंतु हृदयांत अनंत विचाराचे दिव्य दीप! तो बाह्य साधेपणा व हृदयाची ती श्रीमंती चला आपलीशी करूं. जीवनाच्या साधनांची चिंता नका करूं; जीवनाला फुलवूं या, रंगवूं या, त्यांतच मन ओतूं या. नोकरी कशी मिळेल, पोटाची टीचभर खळगी कशी भरेल, याचीच विवंचना ज्या काळांत सारे लोक करीत असतात, अशा उदरंभर व पोटभरू काळांत थोर शंकराचार्य, भगवान् बुद्ध हे जन्मास येत नसतात. ताडामाडाच्या झाडांखालीं झापांनीं शिवलेली झोंपडी ती पुरेशी आहे. तेवढी श्रीमंती पुष्कळ झाली या देहाला. मनाला व बुद्धीला मात्र सर्व त्रिभुवनांतील सौंदर्य व विचार आणण्यासाठीं पाठवा. बुद्धीनें व आध्यात्मिक सामर्थ्यानें, ज्ञानानें व चारित्र्यानें सजलेले सिंहाचे छावे प्रसविण्याचें ज्या दिवशीं भारतीय माता बंद करतील, असे सिंह-किशोर वाढविण्याचें सोडून देतील, त्या दिवशीं भारताचें नष्टचर्य ओढवलेंच समजा; भाग्यभास्कर कायमचा मावळला असें निःसंदेह समजा.

संन्याशाला स्वतःचें जीवन जितकें पावन व पवित्र वाटतें, तितकें कलावानाला स्वतःचें कर्म व स्वतःचें जीवन वाटूं दे. आपल्या हातांतील कामास प्रत्येकानें पवित्र मानावें, त्या कर्मास नटवावें, सजवावें. सारी दृष्टि त्या कर्मावरच खिळूं दे. डोळा इकडे तिकडे भटकतां कामा नये,

नजर दुसऱ्या गोष्टीकडे झुकतां कामा नये. कोणत्याहि फळावर दृष्टि नको. आपण साधेपणानें राहूं. बाह्य मदतीवर न विसंबतां स्वतःवर विसंबूं. जसजसा काल जाईल, तसतसा हृदयांतील गोपाळकृष्णाच्या मुरलीचा आवाज ऐकूं येऊं लागेल व त्या आवजानें कर्म कसें करावें, रंग कोणते द्यावे, शब्द कोणता वापरावा, छिनी कोठें व कशी मारावी—सारें समजूं लागेल. ध्रुवाच्या गालाला नारायणानें स्पर्श केला व तो वेद बोलूं लागला. परंतु तोपर्यंत तो तपस्याच करीत होता. आपण आपलें काम करीत राहूं या. अपार श्रमांनीं व हृदय ओतून केलेले जें आपलें कर्म, त्याला परमेश्वर अमृतहस्तानें स्पर्श करील व तें कर्म सौंदर्यानें भरून जाईल. आपल्या कर्मावर प्रसन्न होऊन त्याला परमेश्वर जेव्हां आशीर्वाद देतो, तेव्हां त्या कर्मांत सौंदर्य नुसतें नाचून राहतें. सौंदर्य म्हणजे ईश्वरी कृपा, ईश्वराचा प्रसाद. त्या प्रसादाला स्वतःला विसरून केलेल्या श्रमानें पात्र होऊं या. आपापल्या झोंपडींतून साधेपणांत निरहंकारपणानें झगडूं या. प्रत्येक प्रयत्न, प्रत्येक मारलेला घाव, फिरवलेलें कलम, घेतलेला तान म्हणजे मुक्तीचेंच स्वरूप होऊं दे, मोक्षद्वारच होऊं दे. फिरविलेलें चाक, हाकलेली मोट—साक्षात्काराचें साधन होऊं दे. प्रत्येक घाव म्हणजे मुक्ति आहे. कारण तो मारतांना आपण स्वतःला विसरून गेलों होतों. **अशाप्रकारें मुक्तिवर मुक्ती जेव्हां आपण रचीत जाऊं, प्रत्येक प्रयत्न ध्येय दाखवील अशा वृत्तीनें केलेल्या अनंत प्रयत्नांचा पर्वत आपण रचूं, तेव्हां मग तें परब्रह्म, तें परमतत्त्व—तें आपणांस मिळेल कीं नाहीं, तें प्रभूचें प्रभूलाच माहीत.**

अपरंपार दया आपल्या जीवनांत आणण्यासाठीं बुद्धदेवांनीं एक-दोन नाहीं तर पांचशें वेळां जन्म घेतलें; पांचशें वेळां जन्ममरणाच्या खस्ता त्यांनीं खाल्ल्या. मग परिपूर्ण अशी, अव्यंग अशी एखादी वस्तु निर्माण करण्यासाठीं, निस्सीम भावनेनें श्रमाची एखाद दुसरी घटका देण्यासहि आपण कां कुरकुर करावी ? ज्या भक्तीमुळें, ज्या पूजेच्या फुलांमुळें आपलीं जीवनें विश्वंभराच्या पदकमळावर वाहण्याच्या लायकीचीं होतील ती निर्दोष अव्यभिचारी भक्ति, तिचें मोजमाप करूं इच्छितां काय ?

त्या भक्तीसाठीं इतक्या घटका दिल्या, इतके दिवस दिले, असे व्यापारी जमाखर्च मांडीत बसणार होय? ज्या भक्तीनें अनंत परमात्मा मापावयाचा असतो, त्या भक्तीला माप नसतें. ती अमोप व अनंत असली पाहिजे. अनंत भक्तीनेंच अनंत तुळिला जाईल. **या सृष्टींत अपार विविधता आहे. जिकडे जाल तिकडे अनंताचें दर्शन घडेल.**

*　　*　　*

# जीवनाला वळण देणें　　: ९ :

दारिद्र्य माणसाला घणाप्रमाणें ठोकून ठोकून आकार देत असतें. **आपत्तीमुळें मनुष्याचें चारित्र्य तयार होत असतें.** दुःख, कष्ट, आपत्ति ह्यांतून तावून सुलाखून गेलेला मनुष्य समाजांत योग्य तें स्थान घेतल्याशिवाय राहणार नाहीं. श्रीमंत मनुष्याला कधीं कोठे अडचण नसते. त्याला विरोध माहीत नसतो. त्याला साऱ्या सवलती असतात, सारे हक्क असतात; परंतु म्हणूनच तो नादान निघण्याचा संभव असतो. तो लहरी होतो. तो हजारोंचीं मनें दुखवील व स्वतःचा नाश करून घेईल. मोलवान् वस्तु प्राप्त करून घेण्याची खरी शक्ति श्रीमंतीपेक्षां दारिद्र्यांत राहूनच मिळवितां येते. दारिद्र्यांत असतांना मिळालेलें ज्ञान व आलेले अनुभव ही फार मोठी संपत्ति आहे व तिच्या जोरावर आपण पुढें वाटेल तें मिळवूं शकूं.

**सेवा, दारिद्र्य, असहायता ह्या धीरवान् लोकांच्या शाळा आहेत.** ह्या शाळांत मोठे लोक तयार होतात. जो लहानपणीं गरिबींत वाढतो त्याला प्रत्येक गोष्टींत जपावें लागतें. जपून बोलणें, जपून चालणें, प्रत्येक शब्दाचा व कृतीचा विपर्यास केला जाऊं नये म्हणून तो जपत असतो. तो कुणाचा अपमान करणार नाहीं, कुणाला हिडीसफिडीस करणार नाहीं. तो उधळपट्टी करणार नाहीं, आळशी राहणार नाहीं. तो सर्वांशीं सहकार्य करील. लहानपणीं असे अनुभव घेण्याची ज्याला संधि मिळाली त्यालाच मोठेपणीं समाजांत कसें वागावें, समाजाची मनोरचना

कशी असते हें पाहण्याची पात्रता असते. तो दुसऱ्यांचा मान राखील, कोणाचें मन मुद्दाम दुखविणार नाहीं. ज्याचा स्वाभिमान दुसऱ्याच्या स्वाभिमानाला धक्का लावीत नाहीं, तोच समाजाचें चित्र अजमावूं शकेल. राजा व रयत हे बाह्यतः परस्परांशीं निराळ्या रीतीनें वागतांना दिसतील. उदाहरणार्थ, राजा सिंहासनावरच असेल व प्रजा मुजराच करील. परंतु राजा व प्रजा या दोघांच्या स्वाभिमानाला कशानेंहि बट्टा लागतां कामा नये. आपण जी सेवा करूं ती अशा रीतीनें करावी, कीं एक दिवस आपणाला अधिकार प्राप्त होईल. आज आज्ञा इतक्या कसोशीनें पाळूं या, कीं एक दिवस आपण आज्ञा करणारे होऊं. **आजचे उत्कृष्ट सैनिकच उद्याचे सेनानी होतील.** थोरांना अशी सेवा करून दाखविण्याची तळमळ असते. त्याचप्रमाणें जो सेनानी सैनिकांचा पदोपदीं अपमान करील, त्यांचा अभिमान दुखवील, त्या सेनानीचे हेतु कधीं तडीस जाणार नाहींत; त्याचें कार्य विफल होईल.

धनी व सेवक, राजा व प्रजा, सेनानी व सैनिक यांना परस्पर जोडणारें काय असतें? परस्परांच्या संबंधांतील निर्दोष वागणूक, उभयतांच्या बोलण्याचालण्यांत, प्रत्येक शब्दांत व प्रत्येक कृतींत दोघांमध्यें सहकार्य आहे ही गोष्ट दिसून आली पाहिजे. अन्योन्य होणाऱ्या सर्व व्यवहारांत परस्परांचें दिसून येणारें हें जें अकपट व संशयातीत वर्तन, मोकळेपणाचें वर्तन–तें जोडीत असतें. एकमेकांच्या मनांत परस्परांबद्दल असणारी जी अचल श्रद्धा ती एकमेकांस जोडीत असते. ज्या क्षणीं परस्परांच्या वर्तनांत श्रद्धा दिसणार नाहीं, त्या क्षणीं संबंध तुटून जातात. जगांतील सारे व्यवहार श्रद्धेवर व पतीवर चाललेले आहेत. परस्पर विश्वासावर सारे विश्व चाललें आहे. लष्करांत शिकलेला सैनिक सेनापतीला सलाम करतो. सेनापतीला योग्य तो भाव द्यावयास तो कधीं चुकणार नाहीं. सेनापतीहि त्या सलामाचा स्मितानें व सभ्यतेनें स्वीकार करील व उलट सलाम करील. सेनापति त्या सलामीचा दुरुपयोग करणार नाहीं. आपणहि या लष्करांतीलच एक अंश आहोंत व त्यामुळें हें आपलें स्थान आहे हें ओळखून, हें सदैव हृदयांत धरून तो वागेल. ज्या वेळेस हुकूम तोडणाऱ्याला देहान्त शिक्षा एकदम फर्मावयाची असते, त्या

वेळेसहि चिर अभ्यासिलेली मनाची स्थिरता तो सोडणार नाहीं. सेनापति या नात्यानें त्याला ती गोष्ट करावी लागत असते. शिस्तीच्या अमूर्त ध्येयासाठीं, लष्कराच्या आदर्शासाठीं त्याला ती कठोर गोष्ट करावी लागत असते. ती शिक्षा देण्यांत त्याचा व्यक्तिविषयक स्वार्थ, किंवा सूड कांहींच नसतो. यामुळेंच त्याच्या हुकूमाची तात्कालीन अंमलबजावणी होते. यामुळेंच त्याच्या हुकुमाला अधिकार प्राप्त होतो व दुसरे त्याप्रमाणें करावयास तात्काळ पुढें येतात.

अशा प्रकारची सत्ता चालविण्यास संयमाची अत्यंत आवश्यकता असते. अत्यंत गुंतागुंतीचे हे अनुभव असतात. अनेक प्रकारच्या गुंतागुंतीतून मार्ग काढावयाचा असतो. नाना भावना, नाना विचार, नाना विकार, नाना प्रश्न हृदयांत थैमान घालतात व यांतून मार्ग निर्माण करावयाचा असतो. मनाच्या मृदु व हळुवार भावना, त्याचप्रमाणें न्यायाच्या प्रखर भावना–दोन्हीहि उभ्या असतात. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या मेंदूंत अनेक गोष्टींचें सतत स्मरण, अनेक गोष्टींचें ध्यान राहिले पाहिजे; बारीक-सारीक शेंकडों गोष्टी, त्यांचे संबंध व परिणाम इकडे लक्ष ठेवावें लागेल. अशा माणसाचीच सत्ता दृढ होईल व चिरकाल टिकेल. **ज्याला स्वतःचें मन ताब्यांत ठेवतां येतें, जो स्वतःचा स्वामी आहे, स्वतःच्या लहरींचा, वासनाविकारांचा जो गुलाम नाहीं, तोच पुरुष सत्ता गाजवूं शकेल, हुकूम करूं शकेल**; तोच अधिकार चालवूं शकेल, गड-बडगुंडा व गोंधळ बंद करूं शकेल, व्यवस्था निर्माण करूं शकेल. ज्याला स्वतःचा स्वभाव ताब्यांत ठेवतां येत नाहीं, स्वतःच्या भावनांवर ज्याला नियंत्रण ठेवतां येत नाहीं, त्याला लहान मूल असो, चाकर असो, अनुयायी असो–कोणी मानणार नाहीं. सारे त्याचा तिरस्कार करतील. त्याच्या शब्दाला किंमत राहणार नाहीं. कारण त्याला स्वतःलाच स्वतःच्या शब्दाची किंमत नसते. दुसऱ्यांना शिस्त व संयम शिकविण्या-पूर्वीं आपण आपल्या मनाला ताब्यांत घेण्याचा प्रयत्न करावयास हवा. सत्ता व आज्ञापालन ह्या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जो दुसऱ्याला अमुक कर असें सांगतो, त्याप्रमाणें तो आधीं तसा वागत असला पाहिजे, तरच त्याच्या सांगण्याला अधिकार येतो, तरच त्याच्या

आज्ञेंत सामर्थ्य असतें. आधीं स्वतः स्वतःची आज्ञा पाळा व मग दुसऱ्यास हुकूम करा. मीच माझा सेनापतीहि आहें व सैनिकहि आहें. मीच माझा गुरूहि आहें व शिष्यहि आहें. मलाच आधीं माझा शिष्य होऊं दे-मग इतर शिष्य मला मिळतील. आपलें शिक्षण ज्या मानानें उत्कृष्ट झालेलें त्या मानानें आज्ञापालनाची शक्ति आपणांत जास्त. जो आज सत्ता गाजवीत आहे, तो काल हुकुमाप्रमाणें वागत होता. आपण उत्कृष्ट रीतीनें आज्ञा पालन करण्यास, शिस्त पाळण्यास शिकूं या कीं उद्यां आपणांस आज्ञा करणारे होतां येईल. बलवान् मनुष्याचें बळ अशाच निरनिराळ्या साधनांनीं निर्माण झालेलें असतें. संयमांतून व साधनेंतून सामर्थ्य प्राप्त होत असतें. व्रतपालनानें विजयशक्ति येत असते.

मनुष्य महाविद्यालयांत जातो. कां जातो? शिक्षक होण्यासाठीं? नाहीं; तर कसें शिकावें हें शिकण्यासाठीं. आपण जें जें ऐकतों व जें जें पाहतों, त्यापासून योग्य तो बोध ज्याची बुद्धि व हृदय घेऊं शकतात, तोच खरोखर चांगल्या रीतीनें शिकून तयार झाला. या जगांत शिकून मनानें व बुद्धीनें कसें मोठें व्हावें हें ज्याला समजलें, ज्याचीं इंद्रियें सदैव दक्ष असतात, ज्याचा मेंदू तरतरीत असतो, आजूबाजूस होणाऱ्या शेंकडों-हजारों गोष्टींच्या बाबतींत जो आंधळ्याप्रमाणें व बहिऱ्याप्रमाणें वागत नाहीं, तोच खरोखर शिकला. एखाद्या रोपांत कसे बदल होतात हें अशिक्षिताला कांहीं कळणार नाहीं. तें रोपटें अशिक्षिताला आपली कथा-जीवनकथा सांगूं शकणार नाहीं; सांगूं लागलें तरी त्याला समजणार नाहीं. अशिक्षित कधीं खोल बघणार नाहीं. नाना प्रकारच्या चाली व रूढी कां पडल्या हें तो शोधणार नाहीं. त्याचप्रमाणें **ज्याला पुष्कळ पठित ज्ञान आहे, जो केवळ पुष्कळ चोपड्या व पुस्तकें वाचतो, तोहि खरोखर शिकला असें नाहीं. तो पढतमूर्ख असण्याचा संभव असतो.** इंद्रियें जी अनुभवसंपत्ति क्षणोक्षणीं आणीत असतात, इंद्रियें जीं मालमसाल्याचीं पोतीं भराभरा भरून आणून ओतीत असतात, त्यांची उत्कृष्ट निवड करणारा, त्या सर्वांमधून उत्कृष्ट सोयी तयार करणारा, त्या सर्वांचा नीट परिपाक करणारा-तोच खरा शिकला. एक मानसिक क्रिया इतर शेंकडों मानसिक क्रियांसाठीं आपणांस समर्थ करीत

असते. केलेला एक विचार दुसरे दहा विचार करण्याची ताकद देत असतो. एकाग्रता साधण्यासाठीं केलेला प्रयत्न मनावर सत्ता चालविण्याची शक्ति देत असतो. आणि जो स्वतःच्या मनाचा मालक झाला तो जगाचा मालक होतो; तो जगाला हुकूम देण्याची शक्ति मिळवितो.

जो मनुष्य आजन्म विद्यार्थी होण्यासाठीं शिकतो, शिकण्याची कला शिकण्यासाठीं शिकतो, आणि जो दुसऱ्यापेक्षां आपण वरचढ व्हावें, आपणांस भरपूर पगार मिळावा, आपणांस विद्वान् म्हणून मान मिळावा, म्हणून शिकतो त्या दोघांच्यामध्यें केवढें नैतिक अंतर, केवढी नैतिक तफावत दिसून येईल ! एक सरस्वतीचा भक्त तर एक भाडोत्री हमाल. म्हणून तर आपल्या शास्त्रांत पदोपदीं सांगितलें आहे कीं, ज्ञानासाठीं म्हणून ज्ञान मिळवा, प्रेमासाठीं म्हणून प्रेम करा. फलरहित निःस्वार्थ-सेवा ही फार थोर वस्तु आहे व हिंदु धर्म तीच तुमच्याजवळ मागत आहे. खऱ्या सिद्धीला दोन गोष्टींची जरूरी असते. निर्मळ व निःस्वार्थ हेतु व त्या हेतूच्या परिपूर्णतेसाठीं स्वात्मार्पण करण्याची तयारी. ह्या दोन गोष्टी जवळ असतील तर बाकी सारें आपोआप येईल. आणि म्हणूनच **तरवार गाजविणाऱ्या विजयी वीराच्या पोटीं जन्मास येण्यापेक्षां संतांच्या पोटीं जन्मलेलें अधिक बरें.** वीरभूमींत जन्मण्यापेक्षां संतभूमींत जन्मणें अधिक श्रेयस्कर होय. कारण वीर जें मिळवितो तें तो उपभोगून टाकतो. त्यानें जें मिळविलें तें त्यानेंच भोगून गमाविलें. परंतु संत जें सामर्थ्य मिळवितात तें भावी पिढीला ते ठेवून जातात.

* * *

# प्रगति : १० :

"प्रेम हें साधन, संघटना हा पाया व प्रगति हें ध्येय" या तीन शब्दांत ऑगस्टस कॉम्टी या अर्वाचीन थोर ऋषीनें मानवजातीच्या आकांक्षा संकलित स्वरूपांत मांडल्या आहेत. कॉम्टी ह्याची बुद्धि एकाच गोलार्धांत खेळत होती. प्रगति हा शब्द मनांत संशय न येतां त्यानें

ठेवून दिला. परंतु प्रगति हें ध्येय असूं शकेल कीं काय ह्याबद्दल पूर्वेकडचे विचारवंत शंका घेतील. कॉम्टीला प्रगति हें ध्येय निरपवाद सत्य वाटलें. पूर्वेकडे ह्या बाबतींत कोणाला संशय वाटेल ही गोष्ट त्याच्या मनांतहि आली नाहीं. आधिभौतिक संस्कृतीचा हा पुण्यात्मक मोह आहे. ज्या काळांत सुखविलास, वासनातृप्ति हें ध्येय होऊं पाहात आहे, हेंच ध्येच समजून मानव – विचारवंत मानव – वागत आहे, अशा वेळेस सेवा, दुसऱ्याचें दुःख दूर करणें हें ध्येय म्हणून मांडणें योग्य आहे. मानव जातीची सेवा हें जीवनाचें ध्येय असणें भव्य व सुंदर वाटतें खरें–परंतु—

पौर्वात्य देशांची निष्ठुर व कठोर अशी विवेचक बुद्धि पुढें येऊन विचारते, " काय हो, सेवा हें जर ध्येय ठरलें तर मानवजातीला सदैव सेवेची अपेक्षा राहणार हें उघड आहे. म्हणजेच मानवजात सदैव दुबळी राहणार असें नाहीं का होत? मानवजातीचा दुबळेपणा का आपणांस चिरंजीव करावयाचा आहे? आईबापांना सेवेचा आनंद मिळावा म्हणून मुलानें सदैव पंगू रहावें काय? मुलाला सेवेची जरूर राहणार नाहीं, तो आपल्या पायांवर उभा आहे, ह्यांत खरा आनंद नाहीं का? मला सेवेचा सदैव आनंद हवा असेल तर जगांत सदैव दुःख व दैन्यहि पण असलीं पाहिजेत. सेवा हें अंतिम ध्येय असूं शकणार नाहीं. आत्म्याची अनंतरूपानें प्रकट होण्याची अनंत शक्ति ह्यांना संस्कृति कितीहि वाढली तरी ती तृप्त करूं शकेल का? मानवजातीची सेवा हें साधन आहे, व साध्याची प्राप्ति प्रत्येकाच्या अनुभवावर अवलंबून राहील. सर्व ठिकाणीं परमेश्वर पाहणें हें साध्य आहे. सेवेनें हें साध्य प्राप्त होईल हें खरें. सामाजिक सुधारणा, प्रगति ह्या गोष्टी चांगल्या आहेत–परंतु हीं अंतिम साध्यें नव्हेत. ह्यांचा अर्थ सेवेला महत्त्व नाहीं असा नव्हे. आजच्या आपल्या जीवनाला सेवा हें ध्येय योग्यच आहे व तेंच एक ध्येय सद्यः-परिस्थितींत सर्वांनीं मानलें पाहिजे.

ज्यांना ह्या जगाच्या पलीकडील तत्त्वाचें अंधुकहि दर्शन झालें नाहीं, त्यांना समाजाची, मानवजातीची सुधारणा हेंच ध्येय शोभतें. परंतु हें **जग म्हणजे आत्म्याची पाठशाळा** आहे. ह्या शाळेच्या बाहेर अनंत

जीवन आहे ही गोष्ट खरी. परंतु शाळेच्या बाहेरील जीवनांत त्यालाच उत्कृष्ट जगतां येईल, जो शाळेंत असतांना शाळेच्या जीवनांत उत्कृष्ट काम करीत असतो, शाळेच्या सर्व जीवनांत– खेळांत, डावांत, अभ्यासांत, वादविवादांत, वनभोजनांत – सर्व गमतीच्या गोष्टींत, त्याचप्रमाणें गंभीर गोष्टींत जो तनमनधन ओतीत असे, आत्मा रंगवीत असे, तोच शाळेच्या बाहेर गेल्यावर तेथेंहि उत्कृष्टपणेंच वागेल व आदर्शभूत होईल. जो इहलोकीं चांगला वागेल त्यालाच परलोकाची मजा. जो ह्या मर्यादित जगांत नीट खेळला तोच अनंत जीवनांतील खेळांत खेळाडू म्हणून शोभेल. जग ही परलोकाची शाळा आहे, गृहस्थाश्रम ही संन्यासाची शाळा आहे. जो गृहस्थ स्वैर व स्वछंद वागतो, तो खरा संन्यासी कसा होणार ? उत्कृष्ट गृहस्थाश्रम ज्यानें केला तोच उद्यां उत्कृष्ट संन्यासी होऊं शकेल.

शिवाय ह्या जगांत कायमची कोणाची प्रगति झाली असें इतिहास सांगत नाहीं. भरती–ओहोटी हा या जगाचा कायदा आहे. रिते भरतात व भरलेले रिकामे होतात. चढलेले पडतात व पडलेले चढतात. असें हें जग आहे. आज पाश्चिमात्य राष्ट्रांत एकीकडे संपत्तींत लोळणारे कुबेर आहेत तर दुसरीकडे दारिद्र्यानें पीडिलेले, रोगांनीं पछाडलेले, ज्ञानहीन व अन्नान्न असे मजूरहि पडलेले आहेत. युरोपचा उदय झाला आहे; परंतु आशियाचा अस्त झाला आहे. एकाचा अस्त तो दुसऱ्याचा उदय. एका बाजूला सुख दिसतें; त्याच्या दुसऱ्या बाजूला तितकेंच दुःख दिसतें. कोणाचा तरी नफा व दुसऱ्या कोणाचा तरी तोटा. आणि ह्यासाठींच प्लासीसारख्या मग लढाया होतात. चिरंतन प्रगति ह्या जगांत नाहीं. प्रगतीचा लंबक सारखा पुढें मागें होत आहे. युरोपचा उदय सारखा टिकणार नाहीं, आशिया कायमचा पडून राहणार नाहीं. एक अंधारांत असेल तेव्हांच दुसरा प्रकाशांतला शोभणार. विरोधानेंच सारें खुलून दिसतें ! पडणाऱ्यांनीं फिरून चढलें पाहिजे, पतनांतून अभ्युदयाकडे गेलें पाहिजे.

* * *

धर्मामुळें राष्ट्रें दुबळीं होतात, धर्मामुळेंच हिंदुस्थानचा ऱ्हास झाला व धर्म वगैरेंचें बंड नसल्यामुळें जपानचा अभ्युदय झाला असें जें आमच्या देशांतील कांहीं अविचारी लोक भरमसाट बडबडतात, त्यांचा कितीहि कडक शब्दांत निषेध केला तरी तो कमीच होणार आहे.

परंतु सत्य खरें काय आहे तें ज्यानें त्यानें आपल्या स्वभावानुसार, वृत्त्यनुसार पाहावें. असल्या गोष्टींत चर्चा अगदीं निरुपयोगी असते. जशी दृष्टि तशी सृष्टि. आपल्याभोंवतीं नवीन स्वर्ग निर्माण करावयाचा आहे, नवीन पृथ्वी बनवायची आहे. जो हें करून दाखवील त्याचा मार्ग सत्याचा. नवीन सृष्टि दिसूं लागल्यावर कोणाचा पक्ष सत्य हें प्रत्येकाला लगेच कळून येईल. नवीन स्वर्ग व नवीन पृथ्वी निर्माण करण्याची ही कामगिरी निराशावादी व खडे फोडणारे अशांच्या हातून कधींहि व्हावयाची नाहीं.

हिंदुस्थानांत धर्मामुळें ऱ्हास झाला व जपानचा अभ्युदय धर्माच्या अभावामुळें झाला असें म्हणणारे जे आमचे मित्र आहेत त्यांना आमचा असा प्रश्न आहे कीं, कृपा करून तुमची धर्माची कल्पना काय ती तरी आम्हांला नीट कळूं दे. एकदां धर्म काय याची व्याख्या ठरली म्हणजे मग कदाचित् असेंच दिसून येण्याचा संभव आहे कीं धर्मामुळेंच हिंदुस्थान जिवंत राहिला, धर्मामुळेंच तो टिकाव धरून उभा राहिला. परंतु असें जेव्हां आम्ही म्हणतों तेव्हां धर्म याचा अर्थ रूढी, दंतकथा, स्नानसंध्या, टिळेमाळा, भस्में व जानवी, गोमूत्रें, प्रायश्चित्तें व गोप्रदानें हा नसतो. **सत्यश्रद्धा व सत्यविचारांचें आचारांत प्रकटीकरण म्हणजे धर्म हा आमचा अर्थ असतो.**

अशा अर्थानें हिंदु धर्माकडे पाहूं लागलों म्हणजे मग माझें संकट दूर कर, माझा रोग बरा कर, असली दुबळी नवस करणारी मूर्तिपूजा म्हणजे हिंदु धर्म नव्हे हें दिसून येईल. राष्ट्राच्या महान् व अनंत जीवनांत पराजयाइतकाच जयहि क्षणभंगुर आहे. सदैव विजयीच व्हाल, ऐहिक भाग्यानें मिरवाल, अशी लालूच हिंदु धर्म दाखवीत नाहीं. जय वा अपजय

ही हिंदु धर्मातील दृष्टि नाहीं. यश कीं अपयश ही हिंदु धर्माची दृष्टि नाहीं. कर्म—निष्काम कर्म—एवढाच हिंदु धर्माचा शब्द आहे. जय येवो वा पराजय येवो तूं आपला धर्म उत्कृष्टपणें आचर, तूं आपलें कर्म नीट बजाव; तूं करीत रहा, कर्म करीत रहा. " मामनुस्मर युद्धय च । " ही हिंदु धर्माची शिकवण आहे. " विजयाकडे जाण्याचा एखादा जवळचा रस्ता माझ्याजवळच आहे, मी दाखवितों या " असलें ढोंग हिंदु धर्म दाखवीत नाहीं. स्वर्गातील अप्सरा व नंदनवनविलास किंवा नरकांतील यमयातना, नाना फळें किंवा नाना छळ—हिंदु धर्म हें कांहीं दाखवीत नाहीं. हिंदु धर्म वर केवळ विजयाचेंच तत्त्वज्ञान सांगत असेल तर तो अपूर्ण राहील; जयाच्या अनुभवावरच उभारलेला ठरेल. जय वा पराजय याची फिकीर न करतां तूं अलेपणानें, मनांत श्रद्धा व वर परमेश्वर या भावनेनें कर्म करीत रहा, अविरत झगडत रहा, असें सांगून हिंदु धर्म जयपराजयांच्या वर गेला आहे. तो विजयाचें नगारे वाजवीत नाहीं व पराजयाचें गाऱ्हाणेंहि गात नाहीं. जयानें हुरळूं नका, उन्मत्त होऊं नका; पराजयानें होरपळूं नका, मुळुमुळू रडूं नका असें सांगून हिंदु धर्म जणुं निर्द्वंद्वाकडे घेऊन जात आहे, केवळ कर्तव्याकडे घेऊन जात आहे.

आपणामध्यें खरी अचल श्रद्धा असेल तर जय किंवा पराजयाचे आपण साक्षी बनूं; जगांतील जयापजयाचे खेळ, खालीं वर नाचणाऱ्या राष्ट्रांचा नाच, हें राहटगाडगें कौतुकानें पहात राहूं. जय व पराजय हीं माझी दोन पावलें आहेत. जन्ममरणाचीं पावलें टाकीत मनुष्य ज्याप्रमाणें पुढें चालला आहे त्याप्रमाणें जयापजयाचीं पावलें टाकीत आपणांस पुढें जावयाचें आहे. जय वा अपजय या दोहोंना साधन करून मला माझें परमविकासाचें—परिपूर्णतेचें—ध्येय गांठावयाचें आहे. आमच्या अंतःकरणांत सार्वभौम असा, परम थोर असा, कशानेंहि उल्लंघ न होणारा व खचून न जाणारा असा संयम आहे. या महान् संयमाच्या जोरावर जगांतील कन्याबाईट परिस्थितीचा आम्ही आमच्या मनावर यत्किंचितहि परिणाम होऊं देणार नाहीं. ज्यांची सारी दृष्टि या मर्त्य जगांतच मिळणाऱ्या विजयावर व वैभवावर, सुखांवर व विकासांवर खिळलेली आहे, त्यांचा आपणांस हेवा व मत्सर कशाला वाटावा? या जगांत

जयापजय, सुखदुःख, जन्ममरण, पतन-आरोहण, उदय व अस्त, भरती-ओहटी, मान-अपमान, विकास व विनाश, हंसणें व रडणें, स्तुति व निंदा यांचा विशाल दोला सारखा पुढें-मागें होत आहे. सुखापाठोपाठ छायेप्रमाणें येणारें दुःख, मोठ्या विजयाच्या पाठोपाठ उरांत घडकी भरवणारा पराजय, ट्राफलगारच्या पाठोपाठ आस्टर्लिट्झ, असें चक्रनेमिक्रमेण हें जग सारखें झुलत आहे. हें आपणांस माहीत नाहीं का ? या द्वंद्वांतून तर पलीकडे जावयाचें आहे. जयाला व पराजयाला दोघांसहि काटीत छाटीत आपणांस पुढें जावयाचें आहे. समोर त्या पैलतीरावर असलेल्या परमेश्वरास पहावयाचें आहे.

परिस्थितीच्या भरती-ओहटींतून, या जयापजयांतून, दोहोंतूनहि जो मानवी विचार, जें मानवी चारित्र्य निर्माण होत असतें, त्या सत्य व चिरंजीवी वस्तूला धर्म म्हणतात. हें जें विचारधन आपण कमवीत असतों, हें जें चारित्र्य आपण जमा करीत असतों, त्यांच्याशीं सहकार्य करूनच, त्याची मदत घेऊनच, आपण आपलें सामाजिक जीवन किंवा राष्ट्रीय जीवन उभारीत असतों. राष्ट्रीय जीवन व धर्म यांची फारकत नसते. धर्म व राष्ट्र, धर्म व समाज यांच्यांत प्राण व कुडी असा संबंध असतो. हा चारित्र्यरूप व वैचारिक धर्म याची राष्ट्रीय जीवनांतून हकालपट्टी कराल तर नाश होईल. जो विचारनिधि, जीं दिव्य ध्येयें राष्ट्राला या भरती-ओहोटीच्या काळांत, या येणाऱ्या जाणाऱ्या कालौघांत मिळालेलीं असतात, तीं जोंपर्यंत राष्ट्र उराशीं धरून ठेवील, तीं जोंपर्यंत निष्ठेनें चिकाटीनें, कष्टानें, क्लेशानें, प्रसंगीं प्राणार्पण करूनहि सांभाळील, हें बीज, ही पुंजी जोंपर्यंत राष्ट्र हातची जाऊं देणार नाहीं, प्राणांचें पांघरूण घालून त्याला जपेल, तोंपर्यंत राष्ट्राला मरण नाहीं.

आपला धर्म शिकवितो कीं, हें जग कांहीं अंतिम सत्य नव्हे. अनंततेच्या मानानें हें जग कांहींच नाहीं; मिथ्याच म्हणा ना. हिंदु धर्माची ही विशाल दृष्टि ज्याच्या हृदयांत श्रद्धापूर्वक बिंबलेली असेल तो बाह्य ख्यालीखुशालीच्या जीवनासाठीं, बाह्य सुखविलासासाठीं, भराभरा सुखोपभोग भोगावयास मिळावेत म्हणून, उच्चतम असा धार्मिक आनंद, चारित्र्याचा व सत्यानुभवाचा आनंद, तो दिव्य व अवीट असा आंत-

रिक आनंद गमवावयास तयार होणार नाहीं. मृत्कणासाठीं माणिकमोती फेंकून द्यावयास तयार होणार नाहीं. चिंतामणि फेंकून गारगोटी पदरीं बांधणार नाहीं.

* * *

# शिक्षक : १२ :

**जो खरा शिक्षक आहे त्याला " खरोखर कोणी कोणाला मदत करूं शकत नाहीं " ही गोष्ट माहीत असते.** मनुष्यानें जें स्वतःच स्वतःसाठीं केलें पाहिजे, तें त्याच्यासाठीं दुसऱ्याला नीट करतां येणार नाहीं व दुसऱ्यानें तें केलेंच तर तें चुकीचेंहि ठरेल. ज्याचें त्यानेंच केलें तरच त्याचें त्याला फळ व त्या फळाचा आनंदहि. शिक्षकाला एवढेंच करतां येईल—" धीर देणें; विद्यार्थ्याला निराश होऊं न देणें; स्वतःचें काम स्वतःच करावें, स्वतःच्या पायावरच उभें रहावें, स्वावलंबनाची कांस धरावी वगैरे गोष्टी त्याच्या मनावर बिंबविणें, आणि तो विद्यार्थी याप्रमाणें प्रयत्न करीत असतांना त्याच्या मार्गांत ज्या अडचणी असतील त्या शक्य तितक्या दूर करणें."

विद्यार्थ्यानें आपल्या गुणानुसारच आपला विकास करून घेतला पाहिजे. ज्याचा जो मार्ग त्या मार्गानें जाऊनच त्यानें वाढावें, मोठें व्हावें. प्रत्येकानें आपला स्वधर्म ओळखावा, आपलें ध्येय ओळखावें. दुसऱ्याचें अनुकरण करून कोणालाहि मोठें होतां यावयाचें नाही. बेडकी बैलाप्रमाणें मोठी होण्यासाठीं फुगूं लागेल तर बैल न होतां ती मरेल. बैलानें धष्टपुष्ट व्हावें व बेडकीनें चांगली बेडकी व्हावें. गुलाबानें सुंदर गुलाब व्हावें. शेवंतीनें पिवळी धमक शेवंती व्हावें. शिक्षकाचें पहिलें कर्तव्य हें कीं त्यानें मुलांच्या मनांत, मुलांच्या जीवनांत, त्यांच्या आवडीनावडीत, त्यांच्या हृदयांत खोल शिरलें पाहिजे. **कोणत्या भूमिकेवर मुलगा उभा आहे व कोठें जाण्याचा त्याचा कल**

**आहे हें शिक्षकानें समजून घेतलें पाहिजे.** याशिवाय तो कसें शिकवील व काय शिकवील? हें न कळेल तर मुलाच्या मार्गांतील अडचणी तो कशा दूर करणार? मुलाला काय पाहिजे आहे हें कळल्याशिवाय द्यावयाचें तरी काय?

शिक्षणाला खरा आरंभ शिष्याकडून केला जातो, शिक्षकाकडून नव्हे. शिकवणाऱ्याची एखादी शारीरिक वा मानसिक क्रिया सहज होऊन जाते, परंतु शिकविणाऱ्या शिक्षकाला त्या सहज क्रियेंतून सूचना मिळते. त्या क्रियेचा तो शिक्षक उपयोग करून घेतो. मनाच्या गुणधर्मांचा, मानसशास्त्राचा त्यानें अभ्यास केलेला असतो. त्या अभ्यासाच्या साहाय्यानें मुलाची त्या क्रियेंतील प्रकट झालेली जी शक्ति तिचा तो विकास करूं पाहातो. तो प्रयोग करतो; मुलाची ती शक्ति वाढावी म्हणून त्याला संधि निर्माण करून देतो, तसें वातावरण निर्माण करितो. मुलाला निरनिराळीं साधनें तो मिळवून देतो. प्रथम आरंभ मुलाकडूनच झाला पाहिजे. तसा तो न होईल तर मुलें नुसतीं ठोंबदेवासारखीं बसतील आणि शिक्षकानें जिवंत मुलांस न शिकवितां दगड व खांब यांनाच शिकविलें असें होईल. शिक्षण किंवा उत्क्रांति, विनय किंवा विकास यांचा आरंभ नेहमीं स्वतःच्या सहज होणाऱ्या कृतींतूनच होत असतो.

ज्ञानाचा प्रत्यक्ष साक्षात्कार ज्याला घडला त्याला ज्ञानी म्हणतात. ह्या ज्ञानाचें बाह्य रंगरूप कोणतेंहि असो. भूगोल असो वा खगोल असो. ब्रूसेल्समधील मजुरांना आपले अत्यंत थोर विचार देणारा, विश्वाचा भूगोल लिहून तो त्यांना समजावून देणारा एलिसी रिक्लस हा ज्ञानीच होता. इतर थोर संतांप्रमाणेंच तो संत होता. त्याचें ज्ञान ज्ञानासाठीं होतें. त्याचा ज्ञानानंद हेतुरहित, फलरहित, निर्दोष व अव्यंग असा होता. ज्या वेळेस तो मेला त्या वेळेस त्याच्या निधनानें जगानें एक ऋषिच गमाविला! ज्ञान हें वाटेल त्या रूपानें नटेल. इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र—वाटेल त्या रूपानें तें अवतरेल. निरनिराळे भक्त त्याचा निरनिराळ्या रूपांत साक्षात्कार घेतात. Origin of Species हा जगाच्या विचारांत व दृष्टींत क्रांति घडवून आणणारा चार्लस डार्विनचा महाग्रंथ जो कोणी वाचील, अभ्यासील, तो डार्विनला महाज्ञानी म्हटल्या-

वांचून राहणार नाहीं. इंग्लंडमधील एका झोंपडींत राहणारा, स्वतःच्या देशांतून हद्‌पार झालेला प्रिन्स क्रॉपोट्‌किन्; तो परस्पर साहाय्य करण्याचे नवीन मार्ग जगाला दाखविण्यासाठीं अश्रान्त धडपडला–तो महान् मार्गदर्शक ऋषिच नव्हे तर काय?

ज्या भारतानें अद्वैताला जन्म दिला आहे त्या भारताच्या लक्षांत वरील गोष्ट इतर देशांपेक्षां चटकन् आली पाहिजे. 'एकं सत्। विप्रा बहुधा वदन्ति।' असें सांगण्याचें अपूर्व धैर्य येथीलच धर्म करूं शकला. ज्याला ईश्वर म्हणतात तोच फक्त चांगला व सुंदर आहे असें नाहीं, तर आपण सारेच चांगले आहोंत–सारें विश्वच मंगल आहे–भद्रं तद् विश्वं यद् वदन्ति देवाः—असें हें सर्वत्र मंगल पहावयास शिकणें हें ध्येय आहे. या ध्येयाकडे कोणत्याहि मार्गानें जा. तो धर्माचाच मार्ग आहे. महाभारतांतील श्लोकांइतकींच गणितशास्त्रांतील मूलतत्त्वें पूज्य व वंद्य आहेत. वेदाभ्यासाइतकेंच सृष्टिज्ञानशास्त्रहि पवित्र आहे. शब्दब्रह्माची उपासना करणारा पाणिनि हा भगवान् पाणिनि म्हणून संबोधिला जातो. परंपरेनें आलेले आचारविचार संग्राह्य वाटतात, तितकेच इतिहासशास्त्रांतील सिद्धान्तहि वाटले पाहिजेत.

प्रत्येक ज्ञान म्हणजे वेदच आहे. तें ज्ञान समाजाच्या मंगलाचें असो म्हणजे झालें. तें ज्ञान अनंताचें नवजीवन रूप प्रकट करणारें असो म्हणजे झालें. कसें जगावें हें शिकविणारें ज्ञान आयुर्वेद म्हणून संबोधिलें जातें. समाजाला दुःखाचा विसर पाडणारें संगीत त्याला गांधर्ववेद म्हणतात; समाजाचें संरक्षण करणाऱ्या विद्येला धनुर्वेद म्हणतात. सारें ज्ञान वेदच आहे. हें ज्ञान अनंत आहे. अनंतकाळांत अनंत ऋषि अनंत ज्ञानें–अनंत वेद–देतच राहतील. सनातनधर्माचें हें विशाल ध्येय पुनरपि जगाला दाखविण्यासाठीं पुन्हां आपणांस परमोत्कट बौद्धिक विकासाची ज्वाला पेटविली पाहिजे. जें मोठें आहे तें कोणालाहि नष्ट करतां येणार नाहीं! तें क्षणभर झांकलें जातें, डोळ्यांआड होतें. मेघ येतात व सूर्याला झांकतात; परंतु सूर्य मरत नाहीं, तो पुन्हां तेजानें झळकणारच. आपलीं महान् ध्येयें तीं का मेलीं? नाहीं; तीं अद्याप आहेत. हीं महान् ध्येयें ज्या कारणांनीं डोळ्यांआड होतात, तीं कारणें आपण दूर करूं या. क्षुद्र

वासना, क्षुद्र सुखें, क्षुद्र आसक्ति यांच्या नादीं लागून ह्या महान् ध्येयांना आपण विसरतों. ज्ञानपूजक, सत्यशोधक, वेदधर्माचे खरे वारसदार व्हावयाचें असेल तर ज्ञानासाठीं वेडे व्हा. अनंत क्षेत्रें पडलीं आहेत, तेथें घुसा. सत्यासाठीं म्हणून जे सत्य शोधूं पाहतात, ज्ञानासाठीं म्हणून जे ज्ञानापाठोपाठ जातात त्यांची तहानभूक कशी हरपते, देहालाहि कसें विसरतात, दिवस रात्र कसे भुलतात हें या भरतभूमींत तरी सांगण्याची जरुरी नाहीं. अध्यात्मिकतेसाठीं धडपडणाऱ्यानें, वेदाची उपासना करणाऱ्यानें 'बस्स झालें बुवा आतां, थकलों आपण' असें म्हणून वाटेंतच कधीं बैठक मारली असें ऐकिवांत नाहीं. जो असा थांबेल तो शोधकच नव्हे; तो उपासक नव्हे; तो भक्त नव्हे. सत्याची खरी तहान त्याला लागलेलीच नाहीं. जें अध्यात्मिकतेच्या बाबतींत तेंच ज्ञानाच्या सर्व बाबतींत. ज्या यात्रेकरूनें शुद्ध भावानें ज्ञानमंदिराकडे जाण्यासाठीं एक पायरी ओलांडली तो सर्व पायऱ्या ओलांडून आंत गाभाऱ्यांत गेल्याशिवाय, यात्रा पुरी केल्याशिवाय थांबणार नाहीं.

मानवजातीनें जे उद्योग चालविले आहेत, जे विचारप्रांत उत्पन्न केले आहेत त्या सर्व ठिकाणीं आपणहि गेलें पाहिजे. ह्या सर्व बौद्धिक व औद्योगिक क्षेत्रांतून मोठमोठीं माणसें आपल्यामधूनच उत्पन्न झालीं पाहिजेत. असें जोंपर्यंत होत नाहीं तोंपर्यंत सुखानें घांस खातां कामा नये. यंत्र-विद्येंत, वास्तुशास्त्रांत, कलेंत, वाङ्मयांत, रसायनांत, वैद्यकींत, तत्त्व-ज्ञानांत, चिंतनांत सर्वत्र अद्वैत प्रकट करतां येतें; परंतु अद्वैत कधीं अर्धवटपणें प्रकट होत नाहीं. जगांत दोन देवतांची कधी पूजा करतां येत नाहीं. जें ध्येय धराल त्याची शेवटपर्यंत कांस सोडूं नका. खरा अद्वैती हा दुनियेचा बादशहा आहे; तो जगाचा स्वामी आहे. तो आपल्या विषयांत थोडेंसें जाणतो किंवा बरेंचसें जाणतो असें नाहीं, तर जेवढें जाणतां येणें शक्य आहे तेवढें जाणतो. तो काम साधारणपणें बरें असें नाहीं करणार, तर उत्कृष्ट करील. १०० पैकीं १०० मार्क मिळविणें हें त्याचें ध्येय. हा त्याचा बाणा. खऱ्या अद्वैती मनुष्याला क्षुद्र वस्तूंतहि उदात्तता दिसते. प्रत्येक गोष्टींत त्याला सत्याचा साक्षात्कार

होतो, नारायण दिसतो. आपल्याकडे संन्यासी तोंडानें नारायण म्हणतो, याचा अर्थ हा कीं, खऱ्या संन्याशाला सर्व वस्तु नारायणाचीं रूपें वाटलीं पाहिजेत. सर्वत्र पावित्र्याचा त्याला अनुभव आला पाहिजे. गायींची अवलाद सुधारणें, दरिद्री मजुरांना हात देणें हें नारायणाचेंच रूप, ही नारायणाचीच पूजा.

ही सर्वत्र मंगल पाहण्याची दृष्टि शिक्षकाला सर्वांच्या आधीं हवी. कारण नवपिढीचा तो निर्माता असतो. जो विद्यार्थी समोर बसलेला असेल त्याच्यामध्यें सारें राष्ट्र, सारी मानवजात खरा शिक्षक पाहील. **समोर बसलेलीं मुलें म्हणजे देवाच्या मूर्ति आहेत असें त्याला वाटेल.** मुलांना तो हिडीसफिडीस करणार नाहीं. तूं दगड आहेस, बैल आहेस, असें म्हणणार नाहीं. "देवो भूत्वा देवं जयेत् ।"—स्वतः मंगल होऊन मंगलाची सेवा करावयाची.

शिक्षकहि पवित्र व मुलांनाहि तो पवित्र मानीत आहे. समोर बसलेलीं मुलें हीं शिबी-श्रियाळाचीं, प्रताप-शिवाजीचीं रूपें आहेत असें तो मानील. समोरचीं मुलें ज्ञानी, प्रतापी, कर्मवीर होतील अशी तो भावना करील. विवेकानंद कलकत्याला एका महाराष्ट्रीय योगिनीकडे गेले होते. ती कांहीं बंगाली मुलींना शिकवीत होती. विवेकानंदांनीं वंदन केलें व विचारलें, "काय चाललें आहे ?" ती थोर बाई म्हणाली, "या माझ्या देवाची सेवा करीत आहें." खरी अद्वैती ती होती, म्हणूनच शिक्षक होण्यास ती योग्य होती. जो सर्वत्र एकत्व अनुभवतो तोच उत्कृष्ट शिक्षक होय. तोच नवीन पिढी ऐक्यासाठीं निर्माण करील. तोच नवीन पिढीला मंगलाची दृष्टि देईल. परंतु असे थोर आचार्य—रॉय, असे थोर शिक्षक आहेत कोठें ?

आपण मनुष्य आहोंत, पशु नाहीं. "मानुष अमरा नय तो मेष"—आम्ही मनुष्य आहोंत, मुकीं विचारीं मेंढरें नाहींत; आपण चैतन्यमय आहोंत, शरीरमय नाहीं; आपण ज्योतिर्मय आहोंत, मृण्मय नाहीं. विचार व साक्षात्कार, चिंतन व दर्शन म्हणजेच आपलें जीवन, खाणेंपिणें, भोगणें, झोंपणें हें मानवाचें खरें जीवन नव्हे. आज ह्या काळांत असा अनुभव घेणें कठीण का आहे ? ह्या कलियुगांत असलें

जीवन कोठलें लाभायला असें कां म्हणतां? कोणीं तुम्हांला सांगितलें हें कलियुग म्हणून? **काळाला स्वरूप देणारे तुम्हीं आहांत**. तुम्ही कराल तर हा क्षण सत्ययुगाचा आहे, कराल तर कलियुगाचा आहे. कलियुग वगैरे भ्रांत कल्पना आहेत. आजचा हा क्षण म्हणजे वाढत आलेला प्राचीन काळच होय. आतांच्या ह्या क्षणांत प्राचीन सर्व युगें एकवटलीं आहेत. ज्या युगांत महाभारतें झालीं, रामायणें झालीं; ज्या युगांत वेद स्फुरले, उपनिषदें गायिलीं गेलीं; ज्या युगांत महर्षि, राजर्षि झाले, योद्धे व वीर चमकले; ज्या युगांत शास्त्रकार, भाष्यकार, व्याकरणकार झाले-तीं सारीं युगें, तो सारा गतकाळ या आतांच्या एका क्षणांत पुंजीभूत होऊन उतरलेला आहे. त्या प्राचीन सर्व युगांचें सार ह्या क्षणांत आहे. माझ्या मागच्या अनंत जन्मांचें सार म्हणजे हा जन्म, त्याप्रमाणें मागच्या सर्व काळांचें सार म्हणजेच आजचा काळ. सारा भूतकाळ ह्या क्षणांत सांठवलेला आहे. समुद्राच्या थेंबांत साऱ्या समुद्राची चव, अत्तराच्या एका थेंबांत हजारों फुलांचा सुगंध, त्याप्रमाणें ह्या आतांच्या क्षणांत सर्व प्राचीन काळाचें, प्राचीन काळांतील सर्व विचारांचें सार आहे. हें सारें गतवैभव या क्षणांत आहे, आणि हा क्षण मला मिळालेला आहे. म्हणजे सारें प्राचीन भांडार माझें आहे. मी त्याचा वारसदार आहे. पूर्वजांची सारी अनुभवसंपत्ति हा क्षण मला देत आहे. ती मी घेतों व पुढें उडी मारतों. या अनंत पूर्वशक्तीच्या साहाय्यानें मी आणखी उंच उडी मारणार व नवविचारनक्षत्रें मिळविणार. ज्ञानासाठीं म्हणून मला ज्ञान पाहिजे आहे व म्हणूनच तें संपूर्ण पाहिजे आहे. मानवजातीची सेवाहि सेवेच्या आनंदासाठींच मला पाहिजे. ह्यासाठीं स्वार्थ मला झडझडून फेंकून देऊं दे. मी भारतांतील ऋषिमुनींचा नाहीं का? मी सर्वत्र अद्वैत पाहण्यासाठीं धडपडणारा नाहीं का?

* * *

सर्व अवतारी पुरुषांनीं एकजात कामावर भर दिला, श्रमावर जोर दिला. सर्व महापुरुष एकच सांगतात कीं, श्रम करा, कष्ट करा. कष्टाविणें कीर्ति नाहीं, श्रमाविणें फळ नाहीं. महापुरुष, अवतारी पुरुष कशासाठीं जन्मले ? परमानंदांत पोहत राहाणें त्यांना सहज शक्य होतें. त्यांच्या दृष्टीला सर्वत्र एक परब्रह्मच होतें. असें असून ते खालीं कां आले? पुन्हां ह्या चिखलांत कां उतरले? जन्ममरणाच्या फेऱ्यांत कां पडले? मोक्ष त्यांनीं कां दूर ठेविला? मानवजातीच्या सेवेसाठीं. श्रमाची महती, कष्टांची महती, कर्माची दिव्यता मानवांना पटवून देण्यासाठीं. आईची मिठी सोडून ह्यासाठीं ते आले. आपलीं दुःखें पाहून कळवळून ते धांवून आले. आतां मधून मधून ते आईची आंतून भेट घेतात. आतां नेहमीं आईची मांडी त्यांना नाहीं. आपल्या दुसऱ्या बंधूंनाहि आईजवळ घेऊन जाण्यासाठीं ते तळमळत असतात, रात्रंदिवस श्रमत असतात. भगवान् बुद्ध म्हणाले, " एकहि जीव दुःखी आहे तोंपर्यंत मी मोक्ष कसा भोगूं? मी त्याच्यासाठीं पुन्हां खालीं येईन. " अशा थोर संतांचीं जीवनें किती सुंदर, किती उदार, किती धन्य, किती थोर ! त्यांच्या दयेला पार नाहीं, क्षमेला सीमा नाहीं, श्रमांना अंत नाहीं.

काय वानुं या मी संताचे उपकार । मज निरंतर जागवीती
काय वर्णू आतां न पुरे ही वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥

कोणत्या शब्दांनीं त्या महात्म्यांचें वर्णन करावें? त्यांना कृपेचे दीप म्हणूं का पावनगंगा म्हणूं? हे थोर संतजनांनो, तुमच्याशीं एकरूप होण्याची पात्रता आम्हांला कशानें बरें मिळेल? तुमच्याशीं मिळून जाण्याची योग्यता कशानें बरें लाभेल?

कशानें? एकाच साधनानें. श्रमानें, अखंड सेवेनें. सुखाला फांटा द्या; सारे क्षुद्र अभिमान गुंडाळून ठेवा; ऐषआरामाला रजा द्या; आळस नको; दंभ नको; ऐट नको; अहंकार सर्व ओतून हृदयाचें व बुद्धीचें भांडें रिकामें करा, पोकळ करा. दुसऱ्यासाठीं श्रमा; ध्येयासाठीं झिजा. मूर्ख स्वार्थासाठीं धडपडतात, तुम्ही निस्वार्थपणें लढा. बुडणारा मनुष्य

काडीचा आधार घेण्यासाठीं ज्याप्रमाणें धडपडतो, त्याचप्रमाणें सेवेची संधि आपण गमावतां कामा नये. कृपण धनाच्या कणासाठीं मरतों, तसें आपण सेवेसाठीं मरूं या. सेवा लहान मोठी असें मनांत नका आणूं.

संन्यासी आपल्या पावित्र्याला किती व कसा जपतो! चुकूनहि पाऊल वेडेंवांकडे पडूं नये म्हणून कसा डोळ्यांत तेल घालून जागत बसतो, अपरंपार त्याग करावयास संन्यासी सदैव सिद्ध असतो. मी माझ्या ध्येयाशीं एकनिष्ठ होतों, असें मरणकाळीं स्वतःला स्वच्छपणें म्हणतां यावें ही त्याची इच्छा असते. मीं माझ्या ध्येयाला कमीपणा आणला असें लोकांनीं म्हणूं नये, लोकांना असें म्हणण्यास जागा देऊं नये म्हणून तो दक्ष असतो. आजन्म तो त्याग ओतीत असतो व शेवटीं आत्माहुति देतो. त्या व्रतस्थ संन्याशाप्रमाणें आपणाहि जें जें मलिन आहे व भ्याड आहे त्यापासून दूर राहिलें पाहिजे. असत्य व अन्याय्य जें जें असेल, त्याच्याशीं तडजोड करावयास कधींहि हात पुढें करतां कामा नये. आपणांवर जें काम सोंपवलें असेल, जी जबाबदारी आपणांवर असेल, त्यासाठीं जरूर पडलें तर आपण मेलें पाहिजे. विश्वासघात करणें, आपणांवर टाकलेल्या विश्वासाला आपण अपात्र ठरणें, याहून नीच दुसरें काय आहे? **जीवनाचा अर्थ ज्यांना समजतो असे महापुरुष विश्वासघात करणें म्हणजे पृथ्वीवरचा नरकच मानतात.**

तुम्हांला स्वतःच्या ध्येयाची प्रतारणा नाहीं ना करावयाची? त्या ध्येयाशीं एकनिष्ठ रहावयाचें आहे ना? तर मग तडजोडीसाठीं अवकाश आहे कोठें? तडजोड म्हणजे काय? दोन परस्परविरुद्ध इच्छांतील सहकार्य. देवाणघेवाण हाच तडजोडींतील स्पष्ट अर्थ नाहीं का? परंतु आपणांस जर एकच ध्यास व एकच वेड आहे तर तडजोड कशीं होणार? आपण आतां अशा शपथा घेतल्या पाहिजेत कीं, कोणतेंहि काम आम्ही अर्धवटपणें करणार नाहीं; धरसोडीनें, तोंडदेखलें करणार नाहीं; दुबळेपणानें करणार नाहीं; इकडेतिकडे रीतीने, हेंहि घेऊं व तेंहि घेऊं, अशा रीतीनें करणार नाहीं. आपण आपलीं जीवनें हंसत हंसत थोर ध्येयांसाठीं देऊन टाकूं या. हाच जन्म काय, पण असे शेंकडों जन्म घेऊं व ध्येयासाठीं पुन्हां सहज लीलेनें देऊन टाकूं.

३०५९३ पा. वा. २५८४ ५-४-५१

आतां आपण व आपलें काम या दोनच गोष्टी. मी व माझें ध्येय, मी व माझें कर्तव्य. हेंच लग्न लागूं दे. ह्या तुमच्या एकान्तांत तिसऱ्या कोणाला येऊं देऊं नका. आपलें काम म्हणजे आपलें सर्व कांहीं. हाच आपला धर्म. मला हें माझें कर्म पार पाडण्यांत जास्त भीति कशाची बरें वाटते? मरणाची का? तें पहा मरण समोर उभें आहे व मला भिववूं पाहात आहे. त्या मरणाच्या पलीकडे काय आहे हें पाहण्याची मला छाती होत नाहीं. परंतु असें करून कसें चालणार? हे मृत्यो, आलों– तुला कवटाळण्यासाठीं. हा पाहा मी येत आहें. तुझ्या पलीकडील अनंत जीवन पाहाण्यासाठीं हा बघ मी निर्भय होऊन आलों!

अमेरिकन कवि लॉवेल विचारतो, "सत्य हें सदैव फांसावरच लटकावलें जाणार का? आणि असत्यच नेहमीं सिंहासनावर बसणार का? धर्माला सूळ व अधर्माला सिंहासन?" असा प्रश्न विचारून कविच एकदम उचंबळून म्हणतो, "नाहीं, फांस हाच भविष्यकाळचा स्वामी आहे. फांस भविष्यकाळाला बनवील, बदलील. आपल्या इच्छेप्रमाणें त्याला आकार देईल. त्या अंधुक अज्ञाताच्या पलीकडे, त्या अंधारांत स्वयं परमात्मा उभा आहे व अंधारांतून आपल्या भक्ताकडे डोळे लावून तो बसला आहे. त्याचें भक्ताकडे पूर्ण लक्ष आहे.

हा वीराचा वेदान्त भव्य आहे, दिव्य आहे. हें निर्भयतेचें तत्त्वज्ञान आहे, विजयाचें तत्त्वज्ञान आहे. ही कर्मयोगाची श्रुति आहे, त्यागाचें गान आहे. आमच्यामध्यें लपून बसलेल्या दिव्य तत्त्वा! ऊठ-जागृत हो. तूं जागृत झाल्यावर सर्व कांहीं आम्हांस शक्य आहे. आतां अशक्य शब्दच नाहीं. जयापजय, लाभालाभ समान लेखून ही पहा मारणमरणांत मीं उडी घेतली.

परंतु कसें लढावयाचें? कर्म करून, सेवा करून. सेवा हेंच आपलें शस्त्र, हेंच आपलें साधन. तो खराटा घ्या व रस्ते साफ करावयास लागा. तो खराटा, तो झाडू–तो का तुच्छ आहे? नाहीं. तो आपल्या लढाईतील भगवा झेंडा होय. लोकांचीं मनें झाडा, गांवांतील रस्ते झाडा. सेवेला वाहून घ्या. सेवा हें महान् साधन आहे. सेवेच्या महनीय साधनेनें आपण शुद्ध होतों, चारित्र्यवान् होतों. सेवा हें लोककल्याणाचें साधन

आहे व आत्मकल्याणाची ती साधना आहे. सेवेनें अहंकार झडून जाईल व जीवन निर्मळ होईल–आणि जीवन निर्मळ झाल्यावर, चित्त शुद्ध झाल्यावर, निर्विकल्प समाधीपर्यंतहि सहज उडी मारूं—परब्रह्मांत बुडून जाऊं. चारित्र्य, शील म्हणजे काय? चारित्र्य म्हणजे संयम. म्हणजे स्वतःला विशिष्ट दिशेनें घेऊन जाणें. एकाच विशिष्ट दिशेनें सतत जाणें, एकच प्रयत्न सतत करणें म्हणजेच एकाग्रता. आणि एकाग्रता म्हणजेच स्वतःला विसरणें, आणि म्हणजेच समाधि! निर्दोष सेवा करीत चला कीं समाधीजवळ जाऊन पोंचाल–त्या अभंग निजधामाकडे जाल–असा ह्या दिव्य पंथ आहे. त्याचा अवलंब करून निर्दोष सेवा करावयास निघूं या.

* * *

## आपल्यासमोर उभें असलेलें काम : १४ :

ज्या वेळेस जुनें जाऊन नवीन यावयाचें असतें, शतकानुशतकें पूज्य भावानें हृदयाशीं धरलेले विचार सोडून देऊन नवीन अननुभवी अशी विचारपद्धति उचलावयाची असते, अशा संक्रमणावस्थेंत, अशा प्रचंड घडामोडीच्या काळांत, सर्वच वस्तु जणुं भट्टींत घातलेल्या असतात अशा या बदलत्या परिस्थितींत एक–दोन पिढ्या बुद्धीचा जर घोटाळा झालेला दिसला, गोंधळ उडालेला दिसला, तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. असें होणारच व कोणाचेंहि होईल; मग हिंदुस्थानचें तसें झालें म्हणून काय मोठेंसें बिघडलें? भारताची बुद्धि जरा स्तिमित झाली, थोडा वेळ घुटमळली, गोंधळली, यांत आश्चर्य नसून उलट इतक्या जल्दीनें नवीन विचारसरणीशीं त्यानें जमवून घेतलें व हें जमवून घेण्यास त्याला फारसे प्रयास पडले नाहींत ही गोष्ट मात्र आश्चर्य करण्यासारखी आहे. पन्नास वर्षांच्या अवधींत अत्यंत परकी अशी भाषा पूर्णपणें आपलीशी करून घेऊन स्वतःच्या ध्येयसोपानांतील प्रत्येक पायरीपायरींत कांहींना कांहीं फरक घडवून आणण्याचें ज्यानें कार्य केलें, त्याची शक्ति

आहे. जग ही वस्तु तुमच्याजवळ मागत आहे. या जबाबदारीस ओळखणें म्हणजेच राष्ट्रीय ध्येयाचा साक्षात्कार; म्हणजेच भारताचीं ध्येयें मूर्तिमंत करणें. आपल्या ध्येयाच्या साक्षात्काराच्या पाठीमागें जगाचा विचार सदैव असूं दे. जगाच्या पार्श्वभूमीवर आपण आपलीं ध्येयचित्रें काढूं. आपल्या ध्येयांचा प्रत्येक गोष्टींत साक्षात्कार घेत चला. प्रत्येक वस्तूंत आपलें स्वतःचें हृदय, आपली स्वतःची कला ओता. जगाला आपणांस जास्त देतां यावें म्हणून ज्या आपल्या जुन्या चालीरीती आड येत असतील, आपणांस अडथळा व विरोध करीत असतील, या देण्याच्या कामांत प्रतिबंध करीत असतील त्यांना मोडून तोडून खुशाल फेंकून देऊं या. **भारताचीं ध्येयें जगाला देण्यासाठीं चला.** जगांत तुमचाहि वास पसरवा, सुगंध दरवळवा. निरनिराळ्या राष्ट्रवृक्षांच्या वासांत तुमच्याहि पुरातन व पूज्य तरुवरांच्या फुलांचा वास मिसळून जाऊं दे. जुन्या रूढी स्वार्थासाठीं, क्षुद्र लोभासाठीं, नोकऱ्याचाकऱ्या मिळाव्या म्हणून नाहीं सोडावयाच्या; तर आपल्या पूर्वजांच्याच थोर ध्येयांना मूर्तिमंत करण्याच्या कामीं त्या आड येतात म्हणून सोडावयाच्या. कारण केवळ स्वच्छंदी व बेलगामी बनण्यासाठीं म्हणून, किंवा परकीयांचीं अनुकरणें करून नोकरी मिळावी म्हणून जर आपण जुनीं बंधनें तोडून फेंकणार असूं तर आपले थोर भाऊ व थोर बहिणी आपणांस जवळ उभे करणार नाहींत—आपला तिरस्कार करून आपलें मुखावलोकनहि करणार नाहींत—हें ध्यानांत धरिलें पाहिजे.

आपण विचारानें व आचारानें जगद्राष्ट्राचें होणें ही वस्तु मनुष्यांना साधणें अशक्य आहे. आपल्या राष्ट्राला सत्य राहूनच, आपल्या राष्ट्राचीच खरी सेवा व खरी पूजा केल्यानें आपणांस जगताची सेवा करतां येईल. या जगन्मंदिराची आपलें राष्ट्र ही एक लहानशी खोली आहे. या खोलींतील भिंतीवर आपण सुंदर चित्रें काढून ठेवूं या व अप्रत्यक्षपणें जगन्मंदिर शोभवूं या. जगाच्या विशाल बागेंतील आपलें राष्ट्र हा एक लहानसा तुकडा आहे. या तुकड्यांत आपण सुंदर फुलझाडें व रसाळ फळझाडें लावूं या व असें केल्यानेंच जगदुद्यान सजविण्यांत भाग घेऊं या. संस्कृति म्हणजे भाराभर माहिती असणें नव्हे. संस्कृति म्हणजे सर्वांमध्यें लुडबुड करणें नव्हे.

संस्कृति म्हणजे सहानुभूति. आपण स्वतः वाढत राहून दुसऱ्यांबद्दल सहानुभूति ठेवणें, त्यांचा हेवादावा, द्वेषमत्सर न करणें, त्यांचें अशुभ व अकल्याण न चिंतणें, त्यांच्याबद्दल शुभेच्छा बाळगणें व त्यांना जर आपलें सांभाळून मदत देतां आली तर देणें ह्याला संस्कृति म्हणतात. मलाहि जिवंत राहिलें पाहिजे व दुसऱ्यानेंहि जिवंत राहिलें पाहिजे. जगाच्या बागेंत माझेंच एकट्याचें झाड असेल तर काय मौज? आपण वैचित्र्यानें शोभतों, परस्परांस शोभा देतों. बगीच्यांत गुलाब, शेवंती, मोगरा, चमेली, जाईजुई, झेंडू – साऱ्यांमुळें शोभा आहे. या जगांत मी एकटाच आहें असें जर मला दिसेल तर मलाहि मरून जावें असेंच शेवटीं वाटेल. कारण माझी वाट कोण पाहील? माझ्या फुलांचे रंग कोण बघेल? आपण सारीं राष्ट्रें वाढूं या. एकमेकांच्या विकासांचा–विशिष्ट रंगरूपांचा–गौरव करूं या.

आपल्या अनुभवांचें क्षेत्र वाढून नुसतें भागत नाहीं. ते अनुभव पचवून, त्यांची व्यवस्था लावून, त्यांतून जेव्हां सुंदर संगीत आपण निर्माण करितों तेव्हांच त्या अनुभवांना व्यक्तीचें शील व चारित्र्य हें नांव मिळतें. **पचविलेल्या अनुभवाचें फळ म्हणजे आपलें चारित्र्य होय**. त्या त्या व्यक्तींचें हें चारित्र्य त्याच्या चालचलणुकींत, त्याच्या सर्व व्यवहारांत प्रकट होत असतें, प्रतिबिंबित झालेलें असतें. हें जसें व्यक्तीचें तसेंच राष्ट्राचेंहि असतें. राष्ट्र जगाच्या बाजारांत नानाविध अनुभव मिळवून तें पचवून आपलेंसें करून घेतें व त्यांतून सुंदर संस्कृति जन्माला येते. आजूबाजूच्या सृष्टींतून मिळालेल्या अनुभवांतूनच विचार, संस्कृति, ध्येयें हीं जन्माला येत असतात. माणसाच्या आशा व स्वप्नें यांची निर्मात्री खरी म्हणजे त्याच्या सभोंवतालची त्याच्या सान्निध्यांत आलेली सृष्टीच होय. जेथें दरिद्री लोक सभोंवतीं आहेत तेथें दरिद्रसेवा हेंच ध्येय ठरतें. तेथें दरिद्री मनुष्य हाच आपला सेव्य नारायण होतो. जेथें रोग आहे तेथें रोग दूर करणें, अज्ञान आहे तेथें अज्ञान दूर करणें हे स्वधर्म सहजच प्राप्त होतात. मनुष्याचीं ध्येयें त्याची परिस्थिति देत असते, ठरवीत असते. केवळ सभोंवतालची मानवी सृष्टिच नव्हे तर अमानवी सृष्टीहि आपलीं ध्येयें निर्माण करण्यांत भाग घेत असते. डोंगरपर्वत, सागरसरिता,

दरींखोरीं, अफाट मैदानें, सुपीक भूमि, निरभ्र आकाश, प्रसन्न तारे, प्रसन्न वारे या सर्वांची आपलीं ध्येयें, आपले विचार निर्माण होण्यास मदत होत असते. या सर्व वस्तूंचे परिणाम अहर्निश आपणांवर कळत न कळत होत असतात. म्हणून त्या त्या राष्ट्रांचीं ध्येयें भिन्न होतात. भिन्न भिन्न हवामानांत तीं निर्माण होत असतात. भारताचीं ध्येयें काय होतीं हें पाहिलें पाहिजे व तीं आपण वाढविलीं पाहिजेत. आपल्या पूर्वजांच्या आशा-आकांक्षा काय होत्या, स्वप्नें, मनोरथ, ध्येयें काय होतीं हें पाहणें म्हणजेच त्यांनीं काय ठेवा ठेविला आहे, काय वारसा ठेविला आहे, हें समजून घेणें होय. म्हणून भूगोलाइतकाच इतिहासहि महत्त्वाचा आहे. अर्वाचीन जगाची नीट जाणीव होण्यासाठीं, त्याचें स्वरूप समजण्यासाठीं, तें कशावर उभें आहे, कोठें उभें आहे, हें समजून घेणें आवश्यक आहे. जगाचा भूगोल आपण अभ्यासितों, जगाच्या धडपडीहि अभ्यासिल्या पाहिजेत; कारण या धडपडींतूनच जगांतील निरनिराळ्या काळांतील ध्येयें समजून येतील व त्या ज्ञानाचा स्वतःच्या विशिष्ट ध्येयाच्या विकासासाठींहि अपार उपयोग आहे. जें सत्य – उघडें सामर्थ्यवान् सत्य— आपण शोधीत आहोंत त्याच्यासाठीं स्वतःचें ज्ञान व दुसऱ्याचेंहि ज्ञान— दोन्ही बाजू पाहिल्या पाहिजेत. आणि तें ज्ञान भौगोलिक व ऐतिहासिक दोन्ही दृष्टींनीं मिळविलें पाहिजे.

आपला दृष्टिकोन बदला कीं सारी सृष्टिच बदलते. जसें पाहूं तसें दिसतें व जें दिसतें त्यावरून विचार करितों. आपण नवीन दृष्टि घेऊन ज्ञानप्रांतांत शिरत आहोंत. कुत्रा म्हणजे कुत्रा व गाय म्हणजे गाय, एवढें समजूनच आतां समाधान नाहीं. त्यांच्यामधील दुवे, साम्य आणि भेद, त्यांच्या वाढी कशा झाल्या, त्यांचे विशेष काय व ते कां निर्माण झाले, हें सर्व समजून घेतल्याशिवाय अतःपर चालणार नाहीं. कुत्रा व गाय यांच्यांत जे फरक आज दिसतात, जे भेद दिसतात, त्यांवरून ते मुळांत एक होते हें सिद्ध होतें. आपण पृथ्वी खणतों; खडक खणतों; निरनिराळे अवशेष सांपडतात. त्यांवरून गायीचे खूर व घोड्याचे खूर, साप व मासा, या दोघांपासून पक्षी – याप्रमाणें निरनिराळे फरक मुळांत

होते, वैचित्र्य कसें निर्माण झालें, भिन्न भिन्न प्रकारचा विचार कसा व कां होत गेला हें समजून येतें.

प्राण्यांच्या ज्ञानाबद्दलच नव्हे तर कला, लिपी, वाङ्मय, इतिहास सर्वच शाखांच्या अभ्यासाकडे ही नूतन विकासवादाची दृष्टि घेऊन आपण गेलें पाहिजे. सर्व ठिकाणीं तुलनात्मक भूमिकेवर उभें राहून आतां पाहावयास शिकावयाचें आहे. ज्ञान हें तुलनेनेंच होत असतें व जितकें क्षेत्र व्यापक तितकी तुलनाहि व्यापक असते. कोणतीही चळवळ, कोणतेंहि चित्र, कोणतीहि धडपड, कोणताहि झगडा, यांच्याकडे आतां जागतिक दृष्टीनें पाहण्याची नितान्त आवश्यकता आहे. पंधराव्या शतकांत सर्व जगभरच धार्मिक सुधारणांची लाट उसळली व ती लाट शें-दोनशें वर्षें टिकली. इसवी सनापूर्वींच्या पांचव्या सहाव्या शतकांत सर्वत्रच तात्त्विक विचारांची लाट उसळली व सॉक्रेटिस, प्लेटो, बुद्ध, कन्फ्यूशस जन्माला आले. ते त्या लाटांवरचे शुभ्र फेंस होत—महापुरुष होत. अशा नाना विचारांच्या जगद्व्यापी लाटा डोळ्यांसमोर उभ्या करून त्या लाटांच्या मस्तकावर शुभ्र फेंसाच्या रूपानें झळकणारे त्या त्या चळवळींतील महापुरुष तेहि पाहावे. एक लाट निघून ती शांत व्हावयास कधीं कधीं शतकांनुशतकें लागतात. एकेक लाट दोनदोनशें तीनतीनशें वर्षें घोंघावत असते. मग ती लाट पडते व तिच्यांतून दुसरी उठते. अशा सामुदायिक, जागतिक लाटा निरनिराळ्या रंगांच्या व निरनिराळ्या आकारांच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक, साम्राज्यविषयक, स्वातंत्र्यविषयक, कला-विषयक, वाङ्मयविषयक, शास्त्रविषयक, व्यापारविषयक उत्पन्न होत असतात. या सर्व लाटांचें अशा जागतिक पद्धतीनें तुलनात्मक ज्ञान घेणें—**तुलनात्मक रीतीनें या लाटा समजून घेणें—म्हणजे आजचें शिक्षण होय.**

ज्ञानाची कल्पना इतकी विशाल व व्यापक आज झाली असली तरीहि अत्यंत विद्वान् माणसें संकुचित ज्ञानांतच समाधान मानतात असें कधीं कधीं दिसतें. कांहीं बाबतींत हे विद्वान् लोक अज्ञानी असतात. त्यांच्या कानांवर कांहीं गोष्टी जात नाहींत, किंवा मुद्दाम अहंकारानें तें येऊं देत नाहींत. उदाहरणार्थ, संस्कृतीच्या इतिहासांत चीनबद्दल कितीशी

माहिती असते? चीन हें नांव उच्चारतांच आपल्या मनांत कोणतें चित्र येतें? कोणत्या भावना येतात? चीन हें कोरें नांव वाटतें. मोठमोठ्यांचींहि मनें चीनच्या बाबतींत कोरीं आहेत. चीन म्हटलें तर डोळ्यांसमोर कांहीं येत नाहीं. हृदयांत व बुद्धींत हालचाल होत नाहीं. अर्वाचीन जागातिक संस्कृतींत भारताचीहि अशीच उपेक्षा केलेली असते. सांस्कृतिक इतिहासांत भारताचें ओझरतेंच दर्शन करविण्यांत येतें. तसेंच इस्लामी संस्कृतीबद्दल किती चुकीच्या व भ्रामक कल्पना पसरलेल्या आहेत! 'युरोपमधील ग्रीक व रोमन लोकांच्या वंशजांची संस्कृति म्हणजेच जागातिक संस्कृति' असें आज पाश्चिमात्यांकडून सांगितलें जातें, लिहिलें जातें. **या जागतिक संस्कृतीच्या इतिहासलेखकांना भारतीय, चिनी व इस्लामी या संस्कृतींचा विसर पडतो.** यांचा स्पर्शहि त्यांच्या अहंकारी मनाला होत नाहीं. ह्या संस्कृतींचा उल्लेख केला गेलाच तर रानटी व टाकाऊ म्हणून उल्लेख केला जाईल किंवा उपहासदर्शक मौन ह्यांच्या बाबतींत धरिलें जाईल. परंतु आम्हांस असें वाटतें कीं, सांस्कृतिक क्षेत्रांत तरी राजकीय वर्चस्वाची धुंदी डोळ्यांसमोर असूं नये. ही सत्तेची दुर्गंधि मनांत असूं नये. विद्या व कला यांच्या पवित्र व दिव्य मंदिरांत तरी सर्वांनीं जमून परस्परांची ओळख करून घेऊं या. परस्परांचीं हृदयें समजून घेऊं या. परस्परांच्या गुणांचा गौरव करूं या. ज्ञानासाठीं, कलाविकासासाठीं चाललेली व पूर्वीं झालेली जी धडपड, त्यांच्यासाठीं सर्वांच्या मनांत असलेली जी उदात्त तहानभूक तेथें तरी गोरे-काळे-पिवळे हे भेद उत्पन्न होऊं नयेत. त्या भूमिकेवर आपण सारे जमूं या, हातांत हात घेऊं या. परंतु ही थोर दृष्टि आज पाश्चिमात्यांजवळ नाहीं हें खरें. संस्कृतींच्या व विचारांच्या इतिहासांत पौर्वात्य विचारांना स्थान नाहीं, त्यांच्या ध्येयांचा, त्यांच्या विकासाचा इतिहास नाहीं. याचें कारण काय? **पौर्वात्य राष्ट्रें आज पाश्चिमात्यांच्या जुंवाखालीं, राजकीय व आर्थिक गुलामगिरीखालीं सांपडलीं आहेत हें त्याचें कारण आहे काय?** पौर्वात्यांच्या बाबतींत, जणुं त्यांनीं कांहींच भर जागतिक संस्कृतींत घातली नाहीं, अशाचें द्योतक

जें मौन धरिलें जातें त्या मौनाच्या मुळाशीं राजकीय परिस्थिति व आजचा त्या राष्ट्रांचा दुबळेपणा हें आहे काय?

भारताला सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रांत कां स्थान दिलें जात नाहीं याचें कारण शोधून काढावयाचें म्हटलें तर तें सहज सांपडण्यासारखें आहे. **या जगांत दुसऱ्यांना जिंकण्याच्या इच्छेनें भारत कधीं गेला नाहीं.** आणि आजच्या काळांतहि नम्रपणें व विनयानें जें नवीन मिळत आहे तें तो सुखासमाधानानें घेत आहे. या नवीन गोष्टी अपरिचित असल्यामुळें प्रथम जरा तो भांबावला, दिपावला. गेल्या दोन पिढ्या हिंदुस्थानांतील लोक जणूं स्वप्नांत असल्याप्रमाणें चालत होते, वागत होते. ते भ्रमिष्टासारखे भटकत होते, बावरत होते. येणाऱ्या नवीन प्रचंड लाटांचा प्रतिकार त्यांना करितां येत नव्हता. ते वाहावत जात होते. त्यांच्यांत मर्दपणा, पौरुष जणूं राहिलेंच नव्हतें.

परंतु आज? आज डोळे झाडझाडून, दृष्टि साफ करून, कम्बर कसून, मनगट सरसावून भारत–नवभारत–हा तरुण भारत–उभा राहिला आहे. सिंह जागा झाला आहे. पूर्वींचा मेंगरूळपणा व बेंगरूळपणा त्यानें पार झुगारून दिला आहे. जीवन म्हणजे संग्राम आहे, स्पर्धा आहे हें त्यानें पुरें ओळखलें आहे. आम्ही आतां विरुद्ध मातबराशीं, विरुद्ध प्रबळ शक्तीशीं झुंज घेऊं, झगडूं. या झगड्यांत आमचें तेज प्रकट होईल व जगाच्या तेजांत आम्ही भर घालूं. जगाचें तुटपुंजें भिकाऱ्याप्रमाणें आम्ही घेत नाहीं बसणार. जगानें दिलेले दोन तुकडे दीनवाणेपणानें चघळीत नाहीं राहणार. जगाचें अनुकरण करीत, जगाच्या पाठोपाठ खालीं मान घालून गुलामाप्रमाणें, गोंडा घोळणाऱ्या कुत्र्याप्रमाणें, अतःपर भारतवासी जाणार नाहींत. आतां आम्ही अक्रिय न राहतां सक्रीय होणार; दुसऱ्यांचे हल्ले सहन करीत किंवा परतवीतच न बसतां फेरहल्ले चढविणार व शत्रूच्या गोटांत शिरणार. अतःपर दुसऱ्यांनीं आम्हांला हुकूम फर्माविण्याची जरुरी नाहीं, तें आम्ही चालूं देणार नाहीं. आमच्या दैवाचे आम्ही नियंते, आमच्या भाग्याचे आम्ही विधाते. **सबंध भारत आतां एक राष्ट्र होऊं दे** नसानसांतून एकराष्ट्रीयत्वाचें रक्त उसळूं दे; नाचूं दे. सर्व राष्ट्राचें हृदय एक होवो, नाडी एक होवो, बुद्धि एक होवो, एकाच

विशाल व थोर हृदयाशीं जोडलेले आपण सारे अवयव बनूं या. अविरोधी, सहकारी अवयव बनूं या. आपण आपले कार्यक्रम ठरवूं; कूच कसें कोठून करावयाचें, मंजल दरमजल कसें जावयाचें, कोठें मुक्काम करावयाचे तें सर्व आपलें आपणच ठरवूं या. आमचे कार्यक्रम आंखून द्यावयास आतां परकी नकोत, आम्ही कसें वागावयाचें तें ते सांगावयास नकोत. आमचें आम्हांला आतां सारें कळतें, समजतें. आमचे नकाशे आम्ही तयार करूं, आमचे आराखडे आम्हीच रेखाटूं. दुसऱ्यांनीं घालून दिलेलीं धोरणें व दुसऱ्यांचे हुकूम मानणारे जी हुजूर अतःपर आम्ही होणार नाहीं. आम्ही आमचीं धोरणें निर्माण करूं, आमचीं ध्येयें निश्चित करूं. आमची कार्यपद्धति आम्ही मुक्रर करूं.

प्राचीन ज्ञान नवीन स्वरूपांत, नवीन भाषेंत मांडावयाचें, त्या ज्ञानाला नवीन रंगांनीं रंगवावयाचें, नवीन वस्त्रांनीं नटवावयाचें, नव्या दृष्टीनें जुन्या विचारांची व ध्येयांची मांडणी करावयाची. रत्न जुनेंच, त्याला कोंदण नवीन करूं या. रस तोच, पात्र नवीन बनवूं या. जुनी शक्ति नवीन अंगांत ओतावयाची. केवळ नवीन भांड्यांना किंमत नाहीं. तो पूर्वींचा सुधारस त्यांत पाहिजे. आत्मा तोच. राष्ट्राचा आत्मा का कधीं बदलतो? आत्मा बदलूं पाहाल तर फजीत व्हाल. आत्म्याला वस्त्रें द्या, नूतन देह द्या. या रीतीनें सर्व संसार पाहूं या. कोणतेंहि कार्य असो–आध्यात्मिक असो वा आधिभौतिक असो–आम्ही सर्व कर्मांत हात घालणार व विजयी होणार.

अफाट कार्यक्षेत्र पडलें आहे. ध्येयाचा तुटवडा नाहीं, कामाची वाण नाहीं. वाण काम करणाऱ्यांची आहे; तूट सेवा करणाऱ्यांची, जीवनें एकेका गोष्टींत अर्पण करणाऱ्यांची आहे. सोन्याचांदीच्या खाणी, हिऱ्या-माणकांच्या खाणी तुमची वाट पहात आहेत. जीवनाची नवीन कल्पना; धर्माची, कर्तव्याची, मोक्षाची नवीन कल्पना; संघटनेची, सहकार्याची नवीन कल्पना; बंधुप्रेम, राष्ट्रप्रेम–तें कृतींत आणण्याची नवीन कल्पना सर्व नवरंग घेऊन जावयाचें आहे. या सर्व गोष्टींत तेज निर्माण करावयाचें आहे, चैतन्य खेळवावयाचें आहे. ह्या सर्व क्षेत्रांत पेटलेले नुसते आगीचे लोळ होऊन घुसा. '**ज्वलन्निव ब्रह्ममयेन तेजसा**' **असे धगधगीत**

**आगीचे व स्फूर्तीचे पुतळे बनून प्रत्येक कार्यक्षेत्रांत क्रांति घडवून आणा.**

भारताचा इतिहास! कोणीं लिहिला आहे भारताचा इतिहास? भारताचा इतिहास अजून लिहिला गेला नाहीं. तो लिहिला गेला पाहिजे. हल्लीं विशेषतः जे इंग्रजींत हिंदुस्थानचे म्हणून इतिहास लिहिले जातात त्या इतिहासांना प्लासीची लढाई व वॉरन हेस्टिंग्ज यांच्यापासून सुरवात केलेली असते! त्यापूर्वींचा दोन चार हजार वर्षांचा इतिहास दहावीस पानांत देऊन हे पट्ठे मोकळे होतात. त्यांना हा पूर्वेतिहास म्हणजे अडगळच जणूं वाटते, सारा केरकचरा वाटतो. अगदींच सोडतां येत नाहीं म्हणून आरंभीं देतात थोडी हकीगत. या विशाल राष्ट्राचा असा इतिहास लिहिणें म्हणजे निव्वळ थट्टा आहे. हे सारे इतिहास गचाळ व रद्दी समजून, फाडून, तोडून, फेंकून दिले पाहिजेत. जाळून धुळींत मिळविले पाहिजेत. असले इतिहास भारतीय मुलांच्या हातांत पडणें म्हणजे पाप आहे. भारताच्या इतिहासांत भावना ओताव्या लागतील; मानवजातीचें हृदय शोधावें लागेल. आजच्या भारतीय संतजनांना तो इतिहास स्फूर्तिप्रद, पेटविणारा व चेतविणारा, नव महाकार्यास उठविणारा असा वाटला पाहिजे. भारताचा इतिहास म्हणजे फुंकलेलें रणशिंग असा वाटला पाहिजे, असा वठला पाहिजे. असा हा इतिहास लिहिण्यासाठीं प्राचीन काळचीं स्थळें शोधून काढिलीं पाहिजेत. त्या स्थळांवर दृष्टि खिळविली पाहिजे, एकाग्र केली पाहिजे; तेथें हृदय जोडविलें पाहिजे, बुद्धि जोडिली पाहिजे, आत्मा रमविला पाहिजे. कलकत्ता, मुंबई, मद्रास हीं हिंदुस्थानच्या इतिहासांतील मुख्य केंद्रें म्हणून आज मुलांना दाखविण्यांत येतात! आपले ते थोर पूर्वज हें दृश्य पाहून वरतीं रडत नसले तर निदान हंसत तरी असतील. असें कसें हें आपलें पोर नादान, शेळपट व नेभळट असें त्यांना वाटत असेल. **भारताचा इतिहास म्हणजे का या मासेमाऱ्या बकाली शहरांचा इतिहास**? ठाणेश्वर व कुंभेरी, हळदीघाट व पानिपत, सिंहगड व पावनखिंड कोठें गेलीं? ज्या पूर्वजांनीं ह्या रणक्षेत्रांवर धारातीर्थीं देह ठेविले, त्याचप्रमाणें ज्या पूर्वजांनीं नवीन विशाल नगरें वसविलीं, प्रचंड भिंती व प्राकार बांधिले,

खंदक खणले, तसेंच ज्या ऋषींनीं व शास्त्रज्ञांनीं विचार, शास्त्रें, सुंदर लिपी भावी पिढीसाठीं ठेवून दिलीं, ज्यांनीं कलांचा परमपूज्यतेनें विकास केला, ज्यांनीं प्रचंड गोपुरें व भव्य मंदिरें उभारिलीं, ज्यांनीं अपूर्व लेणीं व गुंफा खोदविलीं, ज्यांनीं अतुलनीय व धीरोदात्त अशीं महाकाव्यें जगाला दिलीं व थोर जीवनाचे आदर्श दिले, असे ते सारे थोर पूर्वज त्यांचें नांवहि ह्या इतिहासांतून आढळत नाहीं. असले भिकार व आत्म-घातकी इतिहास हे आपल्या मुलांबाळांच्या हातांत देतात तरी कसे, असें ते पूर्वज वरतीं म्हणत असतील. त्या पूर्वजांच्या मनाची काय स्थिति असेल, त्यांचें अंतःकरण कसें जळत असेल, हृदय कसें रडत असेल, याची कल्पना तरी तुम्हांला येते का?

**कमींत कमी तीन हजार वर्षांचे थर उकरून भारताचा इतिहास लिहिला गेला पाहिजे.** हीं कालचीं परवांचीं मुंबई, मद्रास शहरें बघून भागणार नाहीं. कधीं नद्यांच्या तीरावर तर कधीं समुद्रकांठीं, कधीं नैमिषारण्यांत तर कधीं दंडकारण्यांत, कधीं हिमालयाच्या पायथ्याशीं तर कधीं विंध्याद्रीच्या कुशींत, कधीं दऱ्याखोऱ्यांत तर कधीं पर्वतांच्या माथ्या-वर, कधीं अजिंठ्याजवळ तर कधीं सांचीच्या शेजारीं याप्रमाणें भारताचा इतिहास घडलेला आहे. प्रत्येक ठिकाणीं थर पडलेले आहेत, खाणाखुणा आहेत. निरनिराळ्या काळांत निरनिराळ्या ठिकाणीं कर्मक्षेत्रें होतीं, शक्ति-केंद्रें होतीं. अयोध्या आणि हस्तिनापूर, द्वारका आणि मथुरा, गया आणि काशी, इंद्रप्रस्थ आणि पाटलिपुत्र, उज्जयिनी आणि दिल्ली, कांचीवरम् आणि अमरावती, भागानगर आणि प्रतिष्ठान—त्या त्या काळांत तीं तीं पुरेंपट्टणें चमकलीं, शोभलीं. तो काळ, ती सृष्टि कोठें आहे? तीं अदृश्य जगें कोण शोधणार? कोण उकरणार? कालोदरांतून कोण वर काढणार?

पूजेशिवाय देव नाहीं. भारतमातेच्या पुत्रांनो! आपल्या उज्ज्वल व दिव्य भूतकाळाची पूजा करावयास चला. अयोध्या व मथुरा, नालंदा व तक्षशिला, अजिंठा व वेरूळ पूजावयास चला. पेटलेल्या व भावनोत्कट मनानें उठा. भूतकाळाचें संपूर्ण, सांगोपांग व सविस्तर ज्ञान मिळविण्या-साठीं वेडे व्हा. ज्ञानासाठीं बाळ नचिकेता मृत्युदेवाजवळ गेला. सत्या-साठीं सावित्री यमापाठोपाठ गेली. ज्ञानासाठीं अगणित श्रम करावयास

आनंदानें उठा. ज्ञानासाठीं जीवनें द्या. हा जुना इतिहास तुमचा तुम्हींच संशोधिला पाहिजे, गोळा केला पाहिजे. टिकम्, पिकम्, कुदळी, खणती हातांत घ्या; पावडीं, पहारी हातांत घ्या. सारीं जुनीं नगरें पुन्हां वर आणा. खोल संशोधन करा; खऱ्या गोष्टी शोधून काढा; कंटाळा करूं नका. कारण यांतच भारताची आशा आहे. ज्याला उज्ज्वल भूत आहे त्याचा भविष्य उज्ज्वलतर असणार! म्हणून सत्य काय तें शोधून काढा. सत्यासाठीं भारतवर्षाला कधीं औदासीन्य व कंटाळा वाटला नाहीं. सत्य-पूजेसाठीं भारत प्रसिद्ध आहे. सत्यासाठीं त्याला जितका आदर, उल्हास व उत्साह आहे, तसा अन्य कशाबद्दलहि नाहीं. सत्याकडे भारताचें हृदय ओढलें जात असे. त्यासाठीं त्याचे प्राण तडफडत, त्याची कालवा-कालव होई. सत्यशोधन हेंच भारताचें ध्येय होतें.

इतिहाससंशोधनाप्रमाणेंच इतरहि भरपूर कामें आहेत. **प्रत्येक प्रांतिक भाषेंत थोर व महनीय साहित्य निर्माण झालें पाहिजे.** या साहित्यांत भूतकाळाचा सिंहनाद पाहिजे, वर्तमानकाळाचा अर्थ प्रकट केलेला असला पाहिजे व भविष्यकाळासंबंधींची दिशा दाखविण्यांत आली पाहिजे. देशी भाषांतून युरोपियन शास्त्रें, युरोपियन कल्पना व विचार विशद्-पणें व सुबोधपणें प्रकट करण्यांत आलीं पाहिजेत. हे विचार घरोघर गेले पाहिजेत. परकीयांच्या संस्थांचें अनुकरण करून चालणार नाहीं. परंतु त्यांच्या विचारांच्या बाबतींत उदासीन व बेफिकीरहि राहून चालणार नाहीं. त्यांच्या ध्येयांचा व गुणांचा विचार आपण केलाच पाहिजे. भारतीय भूतकाळाचा इतिहासहि लोकांना समजेल अशा रीतीनें लिहिला गेला पाहिजे. त्यांच्या हृदयांत हा इतिहास वाचून आशा व तेज उत्पन्न झालीं पाहिजेत. जशी राष्ट्राची सामुदायिक प्रार्थना, जसें वंदे मातरम् गीत सर्वांच्या ओठांवर, त्याचप्रमाणें राष्ट्राबद्दलची आशा सर्व जनांच्या हृदयांत उत्पन्न केली पाहिजे व हें वाङ्मयाचें काम आहे. तसेंच मुलेंबाळें, स्त्रिया या सर्वांना समजेल अशा रीतीनें आपला इतिहास, पाश्चिमात्य शास्त्रें हीं लिहिण्यासाठीं—वाङ्मयसेवकांची जरूर आहे. देशी भाषेंत जेव्हां अशा प्रकारचीं साहित्यें तयार होतील तेव्हांच स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटेल, तेव्हांच खरें परिणामकारक शिक्षण देतां येईल.

कलेचेंहि पुनरुज्जीवन करावयाचें आहे. आज भारतीय कलावान् युरोपांतील कलांचें जें अर्धवट, लज्जास्पद अनुकरण करीत आहेत, तें सारें सोडून दिलें पाहिजे. कलेची हांक लोकांच्या हृदयाला लौकर जाऊन पोंचते. **कला ही पटकन् समजणारी भाषा आहे.** कलेचें बोलणें हृदयाला जाऊन भिडतें, हृदयाचा ठाव घेतें. एखादें दिव्य गान, एखादें उज्ज्वल चित्र सबंध राष्ट्राला चैतन्य देतें, नवजीवन व नवविचार देतें. एखादें गीत व एखादें चित्र अनेक भिन्न जातींना एकत्र जोडील, संघटित करील. **एका वंदे मातरम् या गीतानें जेवढी राष्ट्रीयता निर्माण केली आहे, तेवढी शेंकडों निबंध व ग्रंथ यांनीं झाली नसेल.** हिंदुस्थानांतील कलेचें पुनरुज्जीवन होणार, हें देवच बोलून चुकला आहे. आतां कलेला नवीन व अनंत विषय सांपडला आहे. भारतमाता ही आतां साऱ्या कलांचा विषय. कवीला, चित्रकाराला, शिल्पकाराला–भारतमाता हा कधीं न संपणारा, अगाध व अपार विषय मिळाला आहे. हा विषय कधीं जुना होणार नाहीं. येथें विविधरूपदर्शन आहे. हजारों गोष्टी येथें कलावंताला दिसतील. ना धड अंगावर कपडे असा झोक्यावर झोके घेणारा भिल्लाचा मुलगा, प्रातःकाळीं समुद्रतीरीं जाऊन स्नान करणारी पवित्र नारी, सायंकाळीं तुळशीला दिवा दाखविणारी स्त्री, देवळांत पुराण सांगणारा पुराणिक, संतांचे अभंग म्हणणारा भिकारी, नागाला पुंगी वाजवून डोलवणारा गारुडी, रानांत गायी चारणारा, पांवा वाजविणारा, गायीच्या पाठीवर बसणारा गोपाळवाळ, वासरांना चाटणाऱ्या गायी, गायीला कुरवाळणारा शेतकरी, नांगराचे उमदे व गंभीर बैल, सुंदर सूर्यास्त, घनदाट वनें, पवित्र सरित्तीरें, नद्यांचे घांट, घाटांवरची गर्दी, मंदिरें, मुलांचे खेळ, हमामा व हुतुतु, प्रचंड पर्वत, इतिहासप्रसिद्ध किल्ले, थोर थोर ऐतिहासिक प्रसंग–एक का दोन, शेंकडों विषय भारतीय कलेला आहेत. कलावानाचे डोळे उघडे पाहिजेत व त्या डोळ्यांत हृदय येऊन बसलें पाहिजे, म्हणजे त्याला विषयांची वाण कधींच पडणार नाहीं.

ज्यांच्यामध्यें हृदय व बुद्धि, भावना व विचार, गद्य व पद्य यांचें लग्न लागलेलें आहे असे थोर कलावान् आज भारताला आधीं पाहिजे आहेत.

सर्व गोष्टींच्या आधीं यांची फार जरूर आहे. ज्यांच्या हृदयांत भारतीय भक्ति आहे व भारतीय ध्येयें आहेत, ज्यांच्या नसानसांत, ज्यांच्या तनुमनोमतींत भारतीय रक्त सळसळत आहे, असे कलावान् आज पाहिजे आहेत. राम व कृष्ण, भीष्म व युधिष्ठिर, सीता व सावित्री, अशोक व हर्ष, बुद्ध व महावीर, अकबर व शीरशहा, प्रताप व शिवाजी, चांद्बिबी व रेझिया, जिजाई व अहिल्या, भवानी व लक्ष्मी यांचीं चित्रें शब्दांत, रंगांत व पाषाणांत अशीं उतरलीं पाहिजेत कीं, लोकांच्या अंगावर रोमांच उभारतील व अंतःकरणांत स्फूर्तीचे पाझर फुटतील. तशींच संतांचीं चित्रें व चरित्रें, शंकराचार्य, तुलशीदास, चैतन्य, नानक, कबीर, तुकाराम, रामदास—सर्वांचीं अशीं शब्दचित्रें व रंगचित्रें वठवलीं पाहिजेत कीं हृदय उचंबळून येईल व म्हणावेंसें वाटेल कीं, 'धन्य मी, जो या अशा संतांच्या व वीरांच्या भूमींत जन्माला आलों!' ह्या थोर विभूतींच्या जीवनांतील प्रकाशानेंच भविष्यकाळांतील आपलीं कर्तव्यें आपणांस ठरवावयाचीं आहेत. त्यांच्या जीवनांतून मिळालेल्या उजेडांतूनच भविष्यकाळाकडे नाचत जावयाचें आहे. भूतकाळांतील प्रकाशाच्या साहाय्यानें हें सर्व राष्ट्र पुढें जावें असें आज करावयाचें आहे. 'हिंदुस्थान, हिंदुस्थान' अशी जगालाच घोषणा करून दाखवावयाची. एवढेंच नाहीं तर आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यांतहि भारत, प्रियकर भारत हाच शब्द घुमत राहिला पाहिजे. **मारुतीच्या हृदयांत श्रीराम होता त्याप्रमाणें आपल्या हृदयांत रामकृष्णाची जननी जी भारतमाता ती असूं दे.** सर्व भारतीय जनतेच्या हृदयांत—लहानमोठ्यांच्या, स्त्रीपुरुषांच्या—सर्वांच्या हृदयांत, ही भारतमाता उभी करणें हें आज सर्व कलावंतांचें काम आहे. हें आज भारतीय कलेचें ध्येय; हें गन्तव्य व मन्तव्य; हें प्राप्तव्य व हेंच निदिध्यासितव्य. कला ही ध्येयाची दिव्य जननी असते, कलेच्या द्वारां ध्येय प्रकट होत असतें. कला लोकांना त्या ध्येयाकडे घेऊन जात असते. ज्या वेळेस कला साकार होत असते, कलावंताच्या स्वप्नांतून संसारांत अवतरते, त्या वेळेस ती ध्येयबाळाला मांडीवर घेऊनच येत असते. सूर्याजवळ प्रकाश, फुलाजवळ वास, गायीजवळ वत्स, त्याप्रमाणें कलेजवळ कलेचें दिव्य ध्येय असलेंच पाहिजे—तरच ती शोभेल.

म्हणून आज प्रत्येक पावलापावलाला आपणांस दोन गोष्टी करावयाच्या आहेत. **तिकडे जगाच्या ज्ञानांत भर घालावयाची व इकडे भारतवर्षांतहि भारताचें ध्येय प्रकट करावयाचें.** आजच्या पिढींतील लोकांसमोर हें दिव्य भव्य कर्म आहे. हें आजचें रणक्षेत्र, कर्मक्षेत्र. आपण ज्या मानानें आजची लढाई रंगवूं त्यावर पुढील पिढीचें सारें जीवन, तिचें अस्तित्व अवलंबून आहेत. आजचें राष्ट्रीय जीवन म्हणजे सर्व राष्ट्राची झगडा करण्यासाठीं उठावणी. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत, पुरीपासून द्वारकेपर्यंत—सर्वांनीं उठलें पाहिजे व सर्वांनीं हल्ले चढविले पाहिजेत. आतांशा कोठें आपल्या बाहेरच्या भिंतीला धक्का लागत आहे तोंच आपण उठूं या, शत्रूवर तुटून पडूं या. 'हर हर महादेव' व 'अल्लाह अकबर' अशा गर्जना करून विशाल कर्मक्षेत्रांत विजयी होण्यासाठीं घुसा. उज्ज्वल भारताच्या पुत्रांनो! अंगावर चिलखत, बरची, भाला तसेंच ठेवून रणांगणावर रात्रीं झोंपण्यांत तुम्हांला भीति वाटते का? शरपंजरीं पडलेल्या भीष्माचे ना तुम्ही वंशज! कर्तव्याच्या रणांगणावर आतां दिवस असो, रात्र असो—सदैव तेथेंच झळकलें पाहिजे. नवीन अध्यात्मिकतेच्या, नवधर्माच्या, नवदिव्यतेच्या नांवानें पुढें चला, कूच करा. कूचाचे नगारे वाजूं देत. रणशिंगें फुंकलीं जाऊं देत, रणभेरी दुमदुमूं दे. अर्वाचीन जगाचीं सारीं भांडारें, सारे खजिने आपलेसे करून घेण्यासाठीं सीमोल्लंघन करा. पुढें चला, पुढें चला. भारतमातेच्या शूर सैनिकांनो! आतां मागें बघूं नका, माघार घेऊं नका. शत्रूचे किल्लेकोट काबीज करा; काबीज केलेले शिबंदी राखून सांभाळा. मोठ्या हिंमतीनें, मोठ्या किंमतीनें व मोठ्या श्रमानें जिंकलेले भाग पुन्हां गमावूं नका. प्रयत्न करतां करतां तुम्ही थकलां असाल तर मरा; तुमच्या मुडद्यांवरून तुमच्या पाठीमागून येणाऱ्या नव्या ताज्या दमाच्या तुकडीला वर चढूं दे व निशाण फडकवूं दे.

* * *

मनुष्य हा समाजाचा एक घटक आहे. मनुष्य व समाज यांच्यामध्यें अवयव आणि अवयवी असा संबंध आहे. मनुष्याला जणुं स्वतंत्र अस्तित्वच नाहीं. हातपाय, नाकडोळे, बुद्धि, हृदय, मन इत्यादि साधनांनीं युक्त असा मनुष्य समाजपुरुषाचें एक साधन आहे. आपण समाजासाठीं आहोंत, दुसऱ्यासाठीं आहोंत, हा विचार आपल्या मनांत जवळ जवळ येतच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. परंतु अतःपर ह्या विचाराची उपेक्षा करून चालणार नाहीं. राष्ट्राच्या दृष्टीनें या विचाराला आज जितकें महत्त्व आहे तितकें दुसऱ्या कोणत्याच विचारला नाहीं. एका सुप्रसिद्ध युरोपियन समाजशास्त्रज्ञानें असें म्हटलें आहे कीं, " मनुष्याची संस्कृति व सुधारणा जितकी कमी तितका तो ' आम्ही ' चा विचार अधिक करितो. त्याची सुधारणा जितकी अधिक तितका तो ' मी ' चा विचार अधिक करतो. " असंस्कृत, रानटी मनुष्य समुदायाचा विचार प्रथम करितो व नंतर स्वतःचा करितो. हें वाक्य जरी वदतोव्याघातासारखें वाटलें तरी तसें तें नाहीं.

शिकणाऱ्या पुष्कळ लोकांना हें माहीत असेल कीं, बेडकाचा मेंदू जरी काढून ठेविला व त्याच्या मागच्या पायावर ॲसिडचा थेंब टाकला तर तो पाय पटकन् आंत ओढला जातो, शरीराच्या जवळ घेतला जातो. हें ज्ञान त्या पायाला मज्जातंतूंच्या द्वारां झालें नाहीं. मधल्या ज्ञानतंतूंच्या उठाठेवीची जरूर न लागतांच होणारें जें बाह्य परिस्थितीचें ज्ञान त्याला प्रतिक्रियात्मक ज्ञान असें म्हणतात. तें संवेदनात्मक ज्ञान नव्हे. आपल्या स्वभावांतील बरेचसे गुणदोष हे अशा रीतीनेंच आपणांत आलेले असतात. समाजांतून आपणांस न कळत ते आपणांत येतात. समाजाच्या कृतीची ती प्रतिक्रिया असते. हें सारें सहज जणुं होतें. तेथें मेंदूची जरुरी नसते.

समजा, तुमच्या कुलाभिमानाला कोणीं डंवचलें तर लगेच मनांत सूडबुद्धि येत नाहीं का ? तुमच्या पत्नीच्या अंगाला कुणीं स्पर्श केला तर तुम्ही व तुमच्या कुटुंबांतील सारी मंडळी चवताळून नाहीं का जाणार ?

अशी जी तात्बडतोब उत्पन्न होणारी सूडबुद्धि ती का विचारात्मक क्रिया असते? नाहीं. ती तत्क्षणींच एक प्रातिक्रिया असते. यावरून समाजशास्त्रज्ञाचें जें म्हणणें वर दिलें आहे तेंच नाहीं का सिद्ध होत? आज सुद्धां कौटुंबिक बाबतींत आपण सर्व कुटुंबाचा जितका विचार करितों तितका स्वतःचा एकट्याचा करीत नाहीं. मानवजातीच्या उत्क्रांतीकडे जर लक्ष दिलें तर जसजसे आपण मागें मागें जाऊं तसतशी ही वृत्ति अधिकच प्रबळ असलेली आपणांस आढळून येईल. ज्या काळांत व्यक्तीचें कार्यक्षेत्र फार मर्यादित असे त्या काळांत प्रत्येक व्यक्ति आपल्या कुटुंबाला, आपल्या जातीला, आपल्या वंशाला अधिक चिकटून बसत असे. जसजसा काळ वाढत जातो, कार्यक्षेत्राचा विस्तार वाढतो, तसतसा व्यक्तीव्यक्तींमधील बाह्य संबंध कमी कमी होत जातो. मतें बदलतात, विचार निराळे होतात, आचार भिन्न होतात. भावांभावांमध्यें, पितापुत्रांमध्यें, पतिपत्नींमध्यें, ध्येयाचे बाबतींत, आचारविचारांचे बाबतींत भेद दिसून येतात. समाजांतील नीति व कायदे म्हणजे समाजाचें प्रतिबिंब होय. समाजाच्या विचाराचें प्रतिबिंब म्हणजेच श्रुतिस्मृतिपुराणें. समाजांतील संस्थाहि समाजांतील विचाराच्याच निदर्शक असतात. समाजांतील झाडून सारें सामाजिक बुद्धीचें प्रतिबिंब असतें. एकपत्नीव्रत म्हणजे नीतिच व बहुपत्नीकत्व म्हणजे नीतिच. युरोपांतील सतींचाहि प्रभाव तिकडील कवींनीं वर्णिला आहे, जसा भारतीय सतींचा भारतीय कवींनीं वर्णिला आहे. युरोपची जोन ऑफ आर्क आहे, भारताची सीतादेवी आहे. दोन्ही देवताच, थोर विभूतीच—परंतु स्वरूप मात्र निराळें.

समाजाचें प्रतिबिंब सामाजिक ध्येयांत, नीतिनियमांत, नाना प्रकारच्या आचारविचारांत पडलेलें असतें. ह्या सर्वांचें मिळून व्यवस्थित केलेलें जें शास्त्र, त्याला नीतिशास्त्र म्हणतात. व्यक्तीच्या द्वारां प्रकट होणारें मानवजातीचें ध्येय म्हणजेच नीति. ह्यावरून सहजच लक्षांत येईल कीं, नीति ही गतिमान् असते. नीति कधीं स्थिर नसते. सर्व काळांत आचारविचार सारखेच नसतात. **नीति सार्वकालीन नसते; ती तत्कालीन असते.** सामाजिक जीवनाचे अनुभव वाढतात, गुंतागुंतीचे होत जातात; बुद्धिवैभव वाढतें; कर्माचें क्षेत्र वाढून विचारांचें क्षेत्र वृद्धिंगत व विशाल होतें.

हें सारें होत जातें तसतसें नीतीचेंहि स्वरूप अधिक सूक्ष्म व सुंदर होतें. तिच्यांतील ओबडधोबडपणा जातो. तिच्यांतील ठराविकपणा जाऊन तिच्यांत विविधता येते. रमणीय असें वैचित्र्य येतें. एक काळ असा होता कीं, ज्या वेळेस कौटुंबिक व जातीपुरती नीति पुरेशी असे. अशा या नीतीच्या नांवाखालीं इतर जातीच्या लोकांना बिनदिक्कत ठार मारण्यांत येई. त्या भिन्न जातीच्या देवांच्या डोक्यावरहि घाव मारले जात. ह्या विसाव्या शतकांतहि असे प्रकार कमी झाले आहेत असें म्हणतां येणार नाहीं. आपल्या समाजाहून भिन्न समाजांतील लोकांची छळणूक व लूट नीतीच्या नांवाखालीं आजहि करण्यांत येत आहे व दुसऱ्यांच्या ध्येयांची टर उडविण्यांत येत आहे, त्या ध्येयदेवांना जमिनदोस्त करण्यांत येत आहे. आपली संस्कृति दुसऱ्यावर बळजबरीनें लादूं पाहणारी नीति ह्या सुधारलेल्या विसाव्या शतकांत सुधारलेलीं राष्ट्रें मानीत आहेत व पाळीत आहेत, हें दुर्दैव होय.

ज्या काळापासून भारताचा इतिहास सांपडतो, त्या काळापासून आपण पाहिलें तर आपणांस असें आढळून येईल कीं, भारतानें संकुचित नीतीला कधींहि प्राधान्य दिलें नाहीं. ज्या नीतींत मीं मात्र जगावें व दुसऱ्यानें मरावें एवढेंच येतें, ज्या नीतींत मी मात्र श्रेष्ठ व बाकी सारें कनिष्ठ एवढेंच येतें, अशी नीति भारताचें कधींहि ध्येय नव्हतें. भारतवर्षाचा हा उज्ज्वल व थोर असा विशेष आहे. भारतीय ध्येय हें विशिष्ट जातीपुरतें, भारतीय नीति ही विशिष्ट जातीपुरती असें कधींच झालें नाहीं ही अभिमान धरण्यासारखी गोष्ट आहे. ह्याच तत्त्वावर भारताचा वैभवकाळ पुन्हां येईल; याच प्राचीन विधानाच्या जोरावर, याच पुण्याईवर भारत पुन्हां जगद्गुरु होईल, अशी आमची आशा आहे. वेदान्तासारखें तत्त्वज्ञान, अद्वैतासारखा विचार, यांचा सामाजिक जीवनाशीं व सामाजिक अनुभवाशीं निकट संबंध आहे. तसा संबंध नसता तर या तत्त्वज्ञानाचा जन्मच होता ना. भौतिक शोध जसे सामाजिक गरजेनें लागले त्याप्रमाणें अध्यात्मिक शोधहि सामाजिक गरजेंतूनच उत्पन्न होतात. आशा करूं या कीं, या भारतवर्षांत असा एक दिवस पुन्हां

उजाडेल कीं, ज्या वेळेस सारे तरुण निरनिराळ्या कठीण कठीण शास्त्रांचें गाढें अध्ययन करून त्यांत पारंगत होतील व समाजाच्या अस्तोदयांचे कार्यकारणभाव हुडकून काढतील. जाती व वर्णव्यवस्था, राष्ट्रीय जीवन व सामाजिक जीवन यांचे परस्परांशीं कसे संबंध असत हें शोधून काढतील. आमच्या देशांतील वैभवाचा सामाजिक व जातिविषयक व्यवस्थेशीं कसा संबंध होता व कितपत होता हें समजून आलें पाहिजे. व्यवस्था नीट असल्याशिवाय वैभव मिळत नसतें. व्यवस्थेच्या पायाजवळ वैभव चालत येतें. नाना जाति व वंश, नाना विभिन्न ध्येयें व विचार, नानाविध आचार व रूढी, या सर्वांचा समन्वय करणारें चातुर्वर्ण्य, समन्वय करणारी जातिव्यवस्था, आणि या सर्वांना धर्मांशीं व परमात्म्याशीं जोडणारी ती थोर अद्वैत विचारपद्धति, यांत आमच्या भाग्याचें बीज आहे काय? या रचनेंत जी बुद्धीची व्यापकता व विशालता दिसून येते, जें घटनापटुत्व दिसून येतें, त्यांत आमच्या भाग्याचें मूळ आहे काय? **बुद्धीची व्यापकता व विशालता हीच भारताची जगाला आजहि देणगी आहे. कारण अजूनहि जगांत या गोष्टीचा दुष्काळ आहे.** का भारताच्या वैभवाचें गुपित अन्य कोठें आहे? येईल, तो दिवस येईल, ज्या दिवशीं भारतीय तरुण हें सर्व शोधून काढतील, अभ्यास करून याचा उलगडा करतील व छडा लावितील. आपण त्याच थोर विशालदृष्टि पूर्वजांचे जर सुपुत्र असूं तर आजहि आपण संकुचित नीति पत्करणार नाहीं. आज जो मानवी विकास होत आहे त्यांत हिंदुस्थान भाग घेत नसला, तो मागें असला, तरी तो सदैव मागेंच राहील असें नाहीं. आज हिंदुस्थानची उपेक्षा होत आहे. परंतु उपेक्षिलेल्या शक्तीची लौकरच जरूर लागेल. भारत मोठा असो वा क्षुद्र असो. विचाराची शक्ति मोजतां येत नसते. सत्य विचारांत, अभिजात व थोर अशा विचारांत अनंत सामर्थ्य असतें. तो विचार सर्व शस्त्रास्त्रांपेक्षां बलवान् असतो. शेवटीं जगावर जगाची सत्ता चालत नसून विचाराची व चैतन्याचीच सत्ता चालत असते.

आपले ऋषि व योगी असें सांगतात कीं, ध्यान करतां करतां अशी एक मानसिक स्थिति प्राप्त होते कीं, ज्या स्थितींत असतांना आपण

विश्वाच्या भाषेंतच व्यवहार करितों. क्षुद्र मी व मम त्या हवेंत जगत नाहींत, त्या स्थितींत टिकत नाहींत. आपण विश्वाकार झालेले असतों, 'भूर्भुवः स्वः–सारे लोक मी. रविचंद्र–तारे–गिरिवृक्षवारे–सारें चराचर मी' रुद्र–सूक्तांतील तो ऋषि असाच विश्वाकार होऊन बोलत आहे व विश्व-जनांच्या गरजा बोलून दाखवीत आहे. "मला तूप पाहिजे, मला मध पाहिजेत, मला गहूं पाहिजेत, मला सत्य पाहिजे, मला बुद्धि पाहिजे—" असा तो संस्फूर्त ऋषि गर्जून राहिला आहे. त्याप्रमाणेंच तो सर्व वस्तु-मात्राला वंदन करीत आहे. "कुंभाराला नमस्कार, सुताराला नमस्कार, चांडाळाला नमस्कार, चोरांच्या नायकाला नमस्कार–" अशी ही जी भव्य अवस्था, ही जी विश्वव्यापी दृष्टि, तिला आपण दुरूनच वंदन करूं या.

परंतु या भूमिकेखालची पायरी म्हणजे जागतिक भूमिका. या जागतिक भूमिकेवर उभें राहून विचार करण्यास शिकूं या व आपल्या मुलां-बाळांसहि शिकवूं या. हा धडा जर नीट पाठ केला तर वैश्विक भूमिकेवर जावयास लायक होऊं. जगन्नर झाल्यावर विश्वानर होतां येईल. आधीं जगाचे होऊं या, मग विश्वाचें होतां येईल. ही जागतिक जाणीव, सर्व मानवजातीची जाणीव, ज्या वेळेस आपणांस होईल, त्या वेळेस साऱ्या मानवजातीच्या दुःखानें आपण दुःखी होऊं व सुखानें सुखी होऊं. सर्व मानवजातीच्या वेदना, यातना, मानखंडना माझ्याच आहेत ही भावना आपण हृदयास शिकवूं या म्हणजे खूप सामर्थ्य येईल व त्या सामर्थ्यां-तून सर्व जगाला व्यापणारी नीति आपण निर्माण करूं शकूं.

नीतींमध्यें अशाच रीतीनें विकास होत गेलेला आहे. प्रथम सहानुभूति शिकावयाची, प्रथम हृदय दुसऱ्याच्या सुखदुःखाशीं न्यावयाचें आणि मग बुद्धिहि तेथें न्यावयाची. हृदय व बुद्धि दुसऱ्याच्या सुखदुःखाशीं पूर्णपणें एक झाल्यावर एकदम एक दिव्य स्फूर्ति येते व त्या स्फूर्तींतून नवीन नीति निर्माण होते, नवीन संस्था प्रकट होते. या नवीन नीतीच्या योगें एक नवीन पायरी चढविली जाते. परमेश्वराकडे, पूर्णतेकडे जाण्यासाठीं जो जिना तयार केला जात आहे त्याच्या पायऱ्या अशा रीतीनेंच घडविल्या जात आहेत व जिना वर वर नेला जात आहे. महापुरुष येतात व नवीन नवीन पायऱ्या बसवितात. गगनासारखी बुद्धि व सागरासारखें

हृदय हे महापुरुष घेऊन येत असतात व मानवजात थोडी वर चढवितात. याचा भावार्थ असा कीं, नवीन सामाजिक घटना, प्रगतीची नवीन दिशा, समाजाची नवीन वाढ ह्यांचा जन्म नवीन सहानुभूतींत होत असतो, नवीन उत्कट भावनांच्या अनुभूतींतून होत असतो. ही विशाल सहानुभूति, हें अपार प्रेम, ही जळती पेटती भावना नवीन ध्येयबाळाला जन्म देतात; आणि या नवीन ध्येयाला व्यवहारांत आणण्यासाठीं नवीन संस्था उत्पन्न होतात व सुधारणा पुढें जाते, पाऊल पुढें पडतें. केवळ एका चालीऐवजीं दुसरी चाल सुरू केल्यानें समाजाचें दुःख दूर होत नाहीं. वडाची साल पिंपळाला बांधून कार्य होत नसतें, प्रश्न सुटत नसतात. विशाल हृदयाची व थोर बुद्धीची तेथें जरूर असते. नवीन ध्येयें व नवीन संस्था निर्माण व्हाव्या लागतात.

स्त्रियांच्या शिक्षणाची अनेक वेळां आपल्याकडे भवति न भवति होत असते. या बाबतींतहि वर प्रकट केलेले विचारच मनांत येतात. भारतीय नारीवर्गानें जेवढें करतां येण्यासारखें होतें तेवढें या बाबतींत केलें आहे. चाळीस वर्षांपूर्वीं भारतांतील स्त्रियांना देशी भाषेंत लिहितांवाचतांहि येत नसे. परंतु सर्व भारतवर्षांत जणुं अंतःस्फूर्तीनें या प्रश्नाला चालना मिळाली. स्त्रियांचें शिक्षण सुरू झालें. या शिक्षणप्रसाराचे कामीं साधीं व सुंदर पुस्तकें आणि मासिकें निघूं लागलीं. स्त्रिया स्वतःच स्त्रियांच्या शिक्षणासाठीं पुढें येऊं लागल्या व संस्था चालवूं लागल्या. बाहेरच्या हितचिंतकांनींहि मदत दिली.

**आज स्त्रियांनीं हें प्राथमिक शिक्षण आपलेंसें करून टाकिलें आहे असें म्हटलें तरी चालेल.** बंगाल, महाराष्ट्र, मद्रास, पंजाब— सगळ्या प्रांतांत मुलींना आतां आपण होऊनच वाटतें. नुसतें वाचावयासच नाहीं तर स्वतःच्या भाषेंत लिहितांहि नीट आलें पाहिजे. घरांतल्या घरांतहि लिहिणें वाचणें आतां होऊन जातें. घरेंच जणुं पाठशाळा होत आहेत, बहिणी भावांजवळ शिकत आहेत. बंगालमध्यें जुन्या पद्धतीच्या बायकाहि रमेशचंद्र, बंकिमचंद्र यांच्या कादंबऱ्या वाचूं लागल्या आहेत. बंगालमध्यें स्त्रियांसाठीं सचित्र मासिकेंहि भरपूर निघालीं आहेत व इतर प्रांतांतूनहि निघत आहेत.

प्राथमिक शिक्षण सुरू झालें. आतां आज पुढचें पाऊल टाकावयाचें आहे. स्त्रियांच्या शिक्षणोन्नतीच्या बाबतींत आतां आणखी पुढें जावयाचें आहे. गंभीर प्रश्न आज उभा राहिला आहे. येथें हृदयसंशोधन केलें पाहिजे, विचारमंथन झालें पाहिजे. सामाजिक जीवनांतील शिक्षण हें अत्यंत पवित्र, अत्यंत नीतिमय व धर्ममय, परम थोर असें अंग आहे. या शिक्षणाची कशी तरी वासलात लावून चालणार नाहीं. या प्रश्नाची हयगय व उपेक्षा होतां कामा नये. शिक्षणाला जर योग्य दिशा व योग्य वळण न लाभेल तर अपाय व हानि होण्याचा संभव आहे. शिक्षणाच्या हेतूवरूनच, प्रयोजनावरूनच शिक्षण कसें असावें याची दिशा कळेल. कशासाठीं शिक्षण द्यावयाचें हें ठरलें म्हणजे कसें द्यावयाचें हें पाहतां येईल.

आपल्या मुलींना, आपल्या बहिणींना शिक्षण मिळावें असें जेव्हां आपण म्हणतों, तेव्हां त्याच्या पाठीमागें हेतु कोणता असतो ? किं प्रयोजनम्, किमुद्दिष्टम् ? अस्तास जाऊं पाहणाऱ्या, मागील शतकांतील युरोपांतील स्त्रीशिक्षणांत असणाऱ्या ज्या गोष्टी, जे हेतु, तेच आज आपले आहेत का ? या शिक्षणाच्या अलंकारानें लग्नासाठीं का त्यांना नटवून ठेवावयाचें आहे ? विवाहाचा जो बाजार भरतो त्या बाजारांत अधिक किंमत यावी म्हणून का त्यांना शिकवावयाचें ? त्यांना चांगला नवरा मिळावा म्हणून का त्यांना शिकवावयाचें ? असले तात्पुरते लग्नहेतु शिक्षण देऊन, भाव पडण्यापुरतें शिक्षण देऊन, त्याचा जीवनावर काय परिणाम होणार ? " अग, शीक थोडें लिहावाचायला. नवरा हवा ना चांगला मिळायला ? " हेच शब्द जेथें मुलींच्या कानांवर पडतात, त्या शिक्षणाची गंभीरता त्यांना काय वाटणार ? जीवनांतील कठीण प्रसंगीं, आणीबाणीच्या वेळेस हें बाजारभावाचें शिक्षण काय धीर देणार ? काय स्फूर्ति देणार ? असलें शिक्षण देणें म्हणजे मुलींवर मेहेरबानगी करणें आहे, ही कृपा आहे, ही कींव आहे, हें भीक घासणें आहे. या देण्यांत मोकळेपणा नाहीं, स्वातंत्र्य नाहीं. असलें हें मिंधें मेहरबानीचें शिक्षण न मिळालें तरी बरें.

कांहीं तरुण म्हणतील, " ज्यांच्याजवळ पुढें आम्हांला लग्नें लावावयाचीं आहेत. त्यांना जर नीट शिक्षण असेल तर आमचें बरेंच काम

त्या करतील. त्या हिशोब ठेवतील, धोब्याला किती कपडे दिले तें मांडून ठेवतील, मूल आजारी पडलें तर टेंपरेचर घेतील. अशी सुशिक्षित पत्नी मिळणें हें सोईचें आहे, आणि म्हणून त्यांना शिक्षण दिलें पाहिजे."

परंतु याच्याहि पुढें विचारानें नाहीं का जातां येणार? शिक्षण देण्यांत याहून थोर उद्देश नाहीं का ठेवतां येणार? कोणी वरच्या उद्देशाच्याहि पुढें जाऊन म्हणतील, "घरांतील घाण्याला जुंपलेली, उष्टीं-खरकटीं करणारी, धुणीं धुणारी, भातभाजी करणारी–जिला विचार समजत नाहीं, विचार करण्याची शक्ति जिला नाहीं, मनाच्या व बुद्धीच्या तुरुंगांत पडणारी एक कैदीण—केवळ एक श्रमवाही जीव—अशी आमची पत्नी असण्याऐवजीं जिच्याजवळ आम्हांला काव्यशास्त्रविनोद करितां येईल, आमच्याच तोलाची जिची विचारसंपत्ति व बौद्धिक क्षमता आहे, जी चर्चा करील, वादविवाद करील अशी पत्नी असणें आम्हांस आवडेल; आणि यासाठीं म्हणून मुलींना शिक्षण दिलें पाहिजे."

तरी सुद्धां स्वतःची अभिरुचि, आम्हां पुरुषांची आवड हाच शिक्षण देण्यांतील प्रमुख हेतु दिसतो. वरील सर्व विचारसरणींतून पुरुषांच्या आवडीनिवडीची पूजा आहे; तेथें स्त्रीच्या आत्म्याची पूजा नाहीं. अगदींच सामान्य हेतूपेक्षां–नवरा मिळावा या हेतूपेक्षां–नवऱ्याला मदत करतां यावी, त्याच्याजवळ काव्यविनोद करतां यावा हे हेतु जरा वरचे आहेत हें खरें, पण एवढ्यानें स्त्रियांच्या शिक्षणाचे आपण खरे कैवारी, खरे पुरस्कर्ते झालों आहोंत असा दावा आपणांस करतां येणार नाहीं, अशी प्रौढी मिरवतां येणार नाहीं.

पुरुष हा मनुष्यप्राणी आहे व स्त्रीहि मनुष्यप्राणी आहे. ह्यासाठीं स्त्रीला शिक्षण हवें. पुरुषाप्रमाणेंच तीं. भाऊ व बहीण नांवें निराळीं, परंतु आंतील दिव्य मनुजता, आंतील थोर मनुष्यत्व तें एकच. नारीनर दोन नांवें, दोन शब्द निराळे, परंतु आंतील क्षुधाभुका त्याच. या एकाच समानतेच्या भूमिकेवर उभें राहून स्त्रीनें शिक्षण मागितलें पाहिजे व पुरुषानें तें देण्याला पुढें आलें पाहिजे. "मी मनुष्य आहें म्हणून मला शिक्षण हवें. माझ्यांत खरी माणुसकी यावी, माझ्यांतील मनुष्यत्वाचा विकास व्हावा म्हणून शिक्षण हवें–" असें स्त्रीनें सांगितलें

पाहिजे व पुरुषानें तें मान्य केलें पाहिजे. शिक्षणाचें हें ध्येय जेव्हां असेल तेव्हांच स्त्री व पुरुष परस्परांस पूज्य मानतील, परस्परांस मान देतील; त्या वेळेसच परस्परांची परस्परांवर श्रद्धा बसेल व विश्वास बसेल. ह्या हेतूनें जेव्हां स्त्रीला शिक्षण देण्यांत येईल तेव्हांच स्त्री ज्याप्रमाणें पुरुषाला पूज्य मानिते त्याप्रमाणेंच पुरुषहि स्त्रीला पूज्य मानील. स्त्रीशिक्षणांत जोंपर्यंत वरील हेतु नाहीं तोंपर्यंत पुरुषाला स्त्री ही पूज्य वाटणार नाहीं, सहधर्मिणी व समानशील वाटणार नाहीं, समान योग्यतेची वाटणार नाहीं; तोंपर्यंत त्याच्या करुणेची व कींवेची एक वस्तु हेंच तिचें स्वरूप राहणार. परंतु वरील उदात्त हेतु त्या शिक्षणांत आणा कीं पुरुषपणाच्या दृष्टींत बदल होईल, स्त्रियांकडे पाहण्याच्या वृत्तींत क्रांति होईल. लिंग-भेदाचा अशा रीतीनें जणूं विसरच पडून दोन जरा निराळे आकार परंतु आंतील दिव्य मनुजता एकच ही भावना मनांत अवतीर्ण होईल. "जें जें न्याय्य आहे, पवित्र आहे, सुंदर आहे त्याचाच नेहमीं विचार करा" असें एक वाक्य आहे. "या वाक्याची पूर्तता करा" असा आर्तरव पुरुषांपेक्षां स्त्रियांनींच सदैव केला आहे. परंतु ज्ञानाशिवाय ही पूर्तता कशी बरें करतां येईल?

**पुरुषाइतकी स्त्रीहि जर मनुष्य असेल तर पुरुषाप्रमाणें आपला पूर्ण विकास करून घेण्याचा तिलाहि हक्क आहे–तें तिचें कर्तव्यच आहे.** तिच्या विकासाला विरोध करणारा जो असेल तो स्वातंत्र्य हिरावून घेणारा, दुसऱ्याला गुलाम करूं पाहणारा, अप्पलपोट्या व स्वार्थी चोर आहे यांत शंका नाहीं. तुम्ही पुरुषांच्या विकासावर भर देतां, मग स्त्रीच्या विकासावर कां देत नाहीं? तिच्या हृदयाची, बुद्धीची व मनाची भूक नको का तृप्त व्हावयाला? पुरुषांना शिक्षण देतांना जर त्यांच्या देहाचा विचार करीत नसाल, तर स्त्रियांच्याहि बाह्य देहादिकांचा विचार नका करूं. जर एकाला उन्नत करूं इच्छीत असाल तर दुसऱ्यालाहि करा. दोन्ही चाकें सारख्याच उंचीचीं होऊं देत, म्हणजे रथ नीट चालेल. आदळआपट होणार नाहीं. दोघांना उंच होऊं दे, मोठें होऊं दे, दोघांचा विकास होऊं दे. स्त्रीचा विकास—मनोबुद्धिहृदयाचा विकास—हें स्त्रीशिक्षणाचें पवित्र ध्येय झालें पाहिजे. स्त्रीच्या स्वतःच्या चारित्र्यासाठीं

तिच्या आत्म्याच्या आनंदासाठीं शिक्षण असलें पाहिजे. पुरुषाच्या हिशोबासाठीं, त्याच्या नफातोट्यासाठीं म्हणून तें कधींहि दिलें जाऊं नये.

परंतु विशाल हृदय व विशाल बुद्धि असल्याशिवाय हें कसें स्फुरणार ? दुसऱ्याच्या जीवनांत शिरतां आल्यावर त्याचा प्रश्न सोडवतां येतो. स्त्रियांच्या जीवनांत थोर सहानुभूतीनें जेव्हां पुरुष शिरतील तेव्हांच शिक्षणांतील ही नवीन दृष्टि, ही नवीन नीति त्यांना स्फुरेल. जगांतील आपल्या सर्व व्यवहारांत हेंच आहे. दुसऱ्यांच्या सुखदुःखांत निरपेक्षपणें एकरूप होऊं या म्हणजे खरी जागतिक नीति निर्माण होईल, दुसऱ्यांना जवळ घेणारी, त्यांचाहि विकास व आनंद पाहणारी नीति निर्माण होईल, तोंपर्यंत नाहीं.

* * *

# चारित्र्य म्हणजेच आध्यात्मिकता : १६ :

खाण तशी माती, बीज तसा अंकुर, कूळ तसें मूल हा जो मंत्र फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळेस उच्चारिला गेला तोच अर्वाचीन काळांतील अति महत्त्वाचा असा सर्वमान्य सिद्धान्त होऊन बसला आहे. व्यक्ति आपल्या वंशाप्रमाणें वाढते. व्यक्तीचा विकास कुळधर्माप्रमाणें, वंशधर्माप्रमाणें, जातिधर्माप्रमाणें होतो. ज्या वेळेस व्यक्तीचें शिक्षण पुरें होतें–मग ती व्यक्ति स्त्री असो कीं, पुरुष असो–त्या वेळेस त्या व्यक्तीमध्यें सारा गत इतिहास जणूं अवतीर्ण होतो. मानवजातीचीं सारीं गतध्येयें, मानवजातीच्या साऱ्या गत आकांक्षा त्या व्यक्तींत उभ्या राहतात. विसाव्या शतकांतील युरोपियन गुरूंचा गुरु साधुसमान पेस्टालाझी यानें जी नवीन शिक्षण-पद्धति शोधून काढिली ती याच महान् तत्त्वानें प्रेरित होऊन. याच तत्त्वाचा विकास त्याच्या पद्धतींत केलेला आहे. चांगलें शिक्षण मिळाल्या-शिवाय मुलींच आशा नाहीं हें त्या थोर आचार्यानें पाहिलें. **नवीन विचारांचेंच अर्वाचीन शिक्षण परंतु मानसशास्त्राच्या सिद्धान्तावर उभारलेलें मानवजातीच्या विकासेतिहासावर रचलेलें असें द्यावयास हवें** ही गोष्ट पेस्टालाझीनें जाहीर केली.

स्विट्झर्लंडमधील स्वजनांवर प्रेम करणारा पेस्टालाझी याला जो प्रश्न सोडवावयाचा होता त्यापेक्षां भारतीय लोकांना जो प्रश्न सोडवावयाचा आहे तो शतपटीनें गंभीर व अधिक महत्त्वाचा आहे. ह्या प्रश्नापुढें पेस्टालाझीचा प्रश्न म्हणजे कांहींच नाहीं. तरीहि दोन्ही प्रश्न मुळांत एक-रूपच आहेत. हिंदुस्थानांतील लोकांच्याहि मनांत आज नवीन विचारांचें बीजारोपण करावयाचें आहे. जी नवसंस्कृति त्यांना द्यावयाची आहे ती वर वर उथळपणें दिली जाऊं नये, जीवनावर खोल व गंभीर ठसा उमट-विणारी ती व्हावी ही गोष्ट पाहाणें फार जरूर आहे. भारतीय जनतेला हें नवशिक्षण देतांना प्राचीन भारतीय विकास, प्राचीन ध्येयें हें सारें लक्षांत ठेवावें लागेल. भारतीय जनतेनें नवसंस्कृति घेऊन शेवाळाशीं खेळत न बसतां कमळांवर दृष्टि ठेवावी, तीरावरच्या शिंपल्यांशीं खेळत न बसतां सागरांत मोत्यांसाठीं बुड्या माराव्या या गोष्टीकडे फार लक्ष दिलें पाहिजे. ज्या भूमीनें तालतमाल व बकुल-आम्र अशा वृक्षांना वाढविलें त्या भूमीनें क्षुद्र सरपटणारे व लगेच मारणारे दोडकी व कारलीं यांचेच वेल लावीत बसूं नये, त्यांतच धन्यता मानूं नये—हें पाहिलें पाहिजे. वेदांची जी जननी, ज्ञानयोगाला प्रसवणारी जी माता, अद्वैताला जन्म देणारी अंबा—तिनें पाश्चिमात्य कला व विद्या यांचें अनुकरण करीत किंवा त्यांचे गुणदोष बघत बसूं नये, तर स्वतः नवीन दृष्टि घेऊन कांहींतरी भव्य व व दिव्य असें निर्माण करावें.

**जोंपर्यंत भारतीय मन ऐतिहासिक दृष्टीचा अंगीकार करीत नाहीं तोंपर्यंत भारतीय संस्कृति केवळ अनुकरणशील व मधून मधून टीका करणारी अशीच राहील;** तोंपर्यंत हें क्षुद्र कामच तिला करावें लागणार. नवीन ऐतिहासिक दृष्टि येण्यासाठीं नवीन मोजमाप पाहिजे, नवीन आंखणी केली पाहिजे, नवीन आकार घेतला पाहिजे. तेव्हांच एकमेकांत मिसळून गेलेल्या गोष्टी निरनिराळ्या व स्पष्ट दिसूं लागतील. मग साऱ्या गोष्टींची खिचडी आपण करणार नाहीं, मग जें आजपर्यंत कसेंतरी होत होतें तें ध्येय म्हणून बुद्धिपूर्वक व विचारपूर्वक अनुसरलें जाईल, आंधळेपणानें होणाऱ्या त्याच क्रिया परंतु डोळसपणानें

होऊं लागतील; प्रत्येक गोष्टींतील रहस्य, हेतु, प्रयोजन वगैरे पाहिलें जाईल, दृष्टि रसग्राही व सारग्राही होईल; ध्येयाची निश्चितता ठरेल.

हिंदूंच्या किंवा मुसलमानांच्या राजवटींत प्रत्येक गोष्टींतील सामाजिक व धार्मिक हेतु विभिन्न दिसत नसत. सामाजिक व धार्मिक एकांत एक मिसळून गेले होते. जें सामाजिक तें धार्मिक वाटे व जें धार्मिक तें सामाजिक वाटे. विचारांच्या दृष्टीनें त्यांना पृथक् करतां येत असे, परंतु आचारांत सामाजिक व धार्मिक यांत भेदच उरला नव्हता. अमुक कां खावें, अमुक कां निषिद्ध, असाच पोषाख कां करावा, असा कां करूं नये या गोष्टींतहि धार्मिक हेतु दाखविले जात. ह्या साध्या तात्कालिक गोष्टी धर्म वाटत, आणि म्हणूनच अनुल्लंघनीय वाटत. त्यांत फेरबदल करणें म्हणजे अब्रह्मण्य वाटे. परंतु आतां एकदम सारा रंग पालटला आहे. मनु बदलला आहे. नवी विटी नवें राज्य. पाश्चिमात्य संस्कृति येथें आली. नवीन आचारविचारांशीं आपल्या आचारविचारांची तुलना होऊं लागली. विरोध दिसूं लागले. त्यामुळें विरोध कां हें शोधून काढण्याची इच्छा होऊं लागली. प्रत्येक गोष्टींत उपयुक्तता पाहाण्याची, हेतु व कारण शोधण्याची बौद्धिक डोळस दृष्टि बळावत चालली. आपणांस दिसून येऊं लागलें कीं, अमुक खाल्ल्यानें किंवा अमुक पेहेरल्यानें स्वर्ग किंवा परमेश्वर मिळतो असें नाहीं. स्वर्ग व परमेश्वर इतके स्वस्त नाहींत. खाण्याच्या मुळाशीं, पेहेरण्याच्या मुळाशीं आरोग्य, स्वच्छता इत्यादि गोष्टी आहेत. ह्या गोष्टी दुसऱ्याहि मार्गानें होतील. जुन्याच गोष्टींनीं होतील असें नाहीं. कदाचित् आरोग्याची नवीन आहारपद्धतीहि शोधून काढतां येईल. आरोग्य जर चांगलें राहणार असेल तर मी टमाटो खाईन. त्यानें माझा धर्म बिघडणार नाहीं. देव दूर पळणार नाहीं. कोठेंहि जगांत जा, सुसंस्कृत मानवी जीवनाला स्वच्छता व आरोग्य हीं आवश्यकच आहेत; परंतु तीं एकाच मार्गानें मिळतील असें नाहीं. दुसरेहि अधिक उपयुक्त व अधिक परिणामकारण मार्ग त्या वस्तु मिळवून घेण्याचे असतील, असूं शकतील. निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या आहारपद्धति, पोषाखपद्धति असतील. ह्यांच्यावर धर्माची मुख्य गोष्ट अवलंबून ठेवूं नये. चहाच्या पेल्यांत धर्म बुडत नाहीं, बिस्किट खाल्ल्यानें मरत

नाहीं. उपरणें घेतल्यानें जगतो असें नाहीं, शर्ट घातल्यानें मरतो असें नाहीं. हॅट व पागोटें–दोघांचा धर्माच्या प्राणाशीं संबंध नाहीं.

**पाश्चिमात्य संस्कृतीच्या सन्निकर्षानें, आगमनानें बाह्य महत्त्वाच्या गोष्टी कोणत्या व आंतरिक महत्त्वाच्या कोणत्या हें आपण पाहूं लागलों.** मोतीं व शिंपले, साली व रस निरनिराळे करून पाहूं लागलों. सामाजिक आचार व रूढी आणि थोर तात्त्विक विचार यांच्यांत फरक करूं लागलों. ‘ शिवूं नको ’ धर्माला रजा देऊं लागलों. हिंदु धर्म म्हणजे गंध–टिळे–माळा, भस्में–जानवीं, मुकटे–पीतांबर, शेंडी–दाढी यांत नाहीं हें दिसून येऊं लागलें. स्वच्छता व पवित्रता हें ध्येय—मग तें कशानेंहि गांठा. याप्रमाणें ध्येय व हेतु सांपडल्यावर निरनिराळ्या पद्धती व मार्ग यांची आपण तुलना करूं लागतों व जी अधिक परिणामकारक दिसेल ती उचलतों. दुसऱ्यांच्या संस्कृतीमधीलहि संदेश आपण घेतों व स्वसंस्कृतींतील जें चांगलें आहे तें घेतों. असा “ सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति । ” त्यांच्यांतील चांगलें व आपल्यांतील चांगलें यांचें लग्न लावून देतों व शुभमंगल होईल अशी सदिच्छा धरितों. उभय संस्कृतींतील जें असत् आहे त्याचा त्याग करतों. याप्रमाणें धर्म व सामाजिक गोष्टी यांच्यांत फरक करावयास आपण शिकलों. बदलणारा धर्म व शाश्वत धर्म यांतील फरक पाहावयास शिकलों. सामाजिक रूढी—आहार पेहेराव वगैरे बदलणारा धर्म आहे. त्याचें स्तोम माजवणें बरें नव्हे ही गोष्ट लक्षांत आली. आतां भिन्न पोषाखाच्या माणसापासून आपण पळून जाणार नाहीं, भिन्न आहाराच्या माणसास पाहून अब्रह्मण्यं म्हणणार नाहीं. आपण आतां कोंपऱ्यांत राहण्यांत धर्म आहे असें म्हणणार नाहीं. यामुळें आतां हिंदुधर्म बाहेर रंगणांत येणार व जगत्स्पर्धेत भाग घेणार. तो सातां समुद्रांपलीकडे जाईल, परकी भाषेंतहि बोलेल, परकी आचारविचारांच्या लोकांशीं हस्तांदोलन करील, विचारविनिमय करील. हिंदु धर्म आतां झुंजार होणार, नवतेजानें नटणार, साऱ्या जगाला भेटणार.

आज शाळांमधून बसलेला, निरनिराळ्या वर्गांतून बसलेला, जो नवभारत आहे त्याला झुंजार व्हावयाचें आहे. झुंजाचे विचार व झुंजाचें ध्येय ह्या कल्पनेनें त्यांचीं हृदयें भरून गेलीं पाहिजेत. हाच विचार

त्यांच्या डोक्यांत घोळत राहिला पाहिजे. निष्क्रियत्वाऐवजीं क्रिया, हल्ले सहन करीत कोपऱ्यांत कोपऱ्यांत जाण्यापेक्षां हल्ले करीत व हल्ले चढवीत उठावणी करणें, दुबळेपणाच्या ध्येयाऐवजीं बळाचें ध्येय चित्तीं धरणें, उत्साहाची गर्जना करीत शत्रूवर तुटून पडणें, ह्या गोष्टी तरुणांच्या मनांत भरून राहिल्या पाहिजेत. नुसती मनाची वृत्ति बदलली कीं क्रांति झाली. सारें मनावर आहे. मनांत नवविचारांची, नवीन ध्येयांची दारू भरा कीं ठो ठो बार उडूं लागतील, धुडुम् धुडुम् आवाज होऊं लागतील. मुलांना हें शिक्षण मिळूं दे म्हणजे दहा–बारा वर्षांतच स्पष्ट फरक दिसून येईल. **जागतिक स्पर्धेत, जागतिक संस्कृतीच्या झगड्यांत आपणांस विजयी व्हावयाचें आहे,** या विचाराचें बीजारोपण बालमनांत, तरुण-मनांत झालें पाहिजे.

परंतु हें पाहिलें पाऊल टाकण्यापूर्वींहि महत्त्वाचें काय व बिनमहत्त्वाचें काय, मुख्य काय व अमुख्य काय याची शहानिशा झाली पाहिजे. **परकी संस्कृतींतील चांगलें घ्यावयाचें; जें साररूप व प्राणमय आहे तें घ्यावयाचें, व जें निस्सार आहे तें टाकावयाचें.** परंतु या गोष्टी-विषयीं नीट स्वच्छ विचार झाला पाहिजे. अनावश्यक व आवश्यक उभय संस्कृतींत काय तें ठरलें पाहिजे. नाहीं तर सुक्याबरोबर ओलेंहि जळावयाचें, वाइटाबरोबर चांगलेंहि मारलें जावयाचें. आपण नीट विचार न केला तर भलत्याच गोष्टींना महत्त्व दिलें जाईल व महत्त्वाच्या गोष्टी कोपऱ्यांतच राहतील. धोतर महत्त्वाचें न वाटतां विजारच महत्त्वाची वाटावयाची. एकदां बाह्य गोष्टी महत्त्वाच्या नाहींत असें ठरलें म्हणजे मग विजारहि महत्त्वाची वाटावयास नको. परंतु जसें पूर्वीं खाणेंपिणें व पेहराव याला महत्त्व होतें तेंच पुन्हां आपण पाश्चिमात्य खाणेंपिणें व पेहराव यांना दिलें येवढेंच होईल. म्हणजे पुन्हां आत्मा या बाह्य गोष्टींतच रंगविला. जुन्या माणसास धोतर–पागोटें जेवढें प्रिय वाटे तेवढेंच आपणांस हॅट–बूट–कोट हें जर प्रिय वाटत असले तर विकास कोठें झाला? पुन्हां बाह्य गोष्टींतच जीव रंगविला. विवेकानंद कॉलेज-मध्यें असतांना एक दिवस बाराबंदी घालून जात, तर एके दिवशीं सूटबूट करून जात. एके दिवशीं गुळगुळीत हजामत करीत, तर एके

दिवशीं भांग पाडून जात. त्यांना हेंच दाखवावयाचें असे कीं, ह्या गोष्टींचा मी गुलाम नाहीं. डोक्यावरचे केस–त्यांचा मी गुलाम नाहीं. त्यांना छाटीन वा वाढवीन. मी धोतराचा गुलाम नाहीं वा विजारीचा नाहीं. म्हणून महत्त्वाचें काय तें आपण पाहिलें पाहिजे. पाश्चिमात्यांचे कंगवे व सिगारेट यांना सिंहासन मिळावयाचें असेल तर साराच ग्रंथ आटोपला.

**सर्व आचार व विचार यांच्या ज्या पद्धती असतात त्यांच्या मुळाशीं शीलसंवर्धन हा हेतु असतो.** चारित्र्यग्रंथन, शीलसंवर्धन हें ध्येय आहे. मनुष्याला सुंदर संवयी लावून त्यांचें चारित्र्य बनवावयाचें. सुंदर संवयी हें साधन व शीलसंवर्धन हें ध्येय. चारित्र्य हा हेतु मुख्य आहे, संवय ही दुय्यम गोष्ट आहे. हिंदुधर्मांतील बाह्य आचारापेक्षां हिंदु धर्माचीं ध्येयें फार थोर व उदात्त आहेत, हें कोणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं. हिंदुस्थान हा एकच असा देश पृथ्वीच्या पाठीवर आहे कीं, जेथें अकिंचन निष्कांचन भिकाऱ्याला सम्राटापेक्षां, राजेमहाराजे यांच्यापेक्षां अधिक मान दिला जातो. परंतु राजाहि असावा जनका-सारखा व भिकारी शुकदेवासारखा हें ध्येय त्याहूनहि थोर आहे. भिकाऱ्यालाहि थोर होऊं दे व राजालाहि थोर होऊं दे. दोघांचे पोषाख निराळे परंतु दोघांचें ध्येय एकच–कीं नराचें नारायण होणें. देवो भूत्वा देवं यजेत्–पवित्र राजा पवित्र भिकाऱ्याची पूजा करतो. तुम्ही कोणीहि असा, कोणत्याहि स्थानीं असा, शीलाचा शीतल व शांत चंद्र तुमच्या शिरावर शोभणारे तुम्ही शिवचंद्रमौळी व्हा.

शीलाचा जो विकास होत असतो त्यांत संवयीला किती महत्त्व आहे, आचारांना किती महत्त्व आहे, तें तौलनिक पद्धतीनें पाहूं या. आपल्याहि संवयी पाहूं, पाश्चिमात्यांच्याहि पाहूं. हिंदुस्थानांत मनुष्य खातो काय, पितो काय, स्नानसंध्या करतो कीं नाहीं, देवपूजा करून नमस्कार घालतो कीं नाहीं, तो केंस कसे राखतो, पोषाख कसा करतो, तो प्रवास पायीं करतो कीं कसा, प्रवासांत कसा वागतो ह्या व अशाच प्रकारच्या गोष्टींकडे समाजाचे डोळे असतात व ह्यांच्यावर समाजाची टीका सारखी चाललेली असते. तसेंच विवाहाच्या किंवा शिक्षणाच्या इत्यादि महत्त्वाच्या बाबतींत जरा फेरफार करावयाचें म्हटलें, नवीन प्रथा पाडावयाचें कोणीं

सुचविलें, तर ते एकच कल्ला करून उठतील. ते संतापतील, घाबरतील. 'हें सारें अधार्मिक आहे, अपवित्र आहे, तुमचा कांहीं तरी त्यांत स्वार्थी हेतु आहे, कावा आहे' असें ते म्हणतील. खेड्यांतील लोक शहरांत जाऊं लागल्यापासून तर व्यक्तीवर या असल्या बाबतींत टीकेचा फारच ताशेरा उडतो व मोठा गहजब होतो. शहरांत गेलेल्या मनुष्याला याची फार भीति वाटते. लहानशा समाजांत वावरत असतांना मनुष्याला धैर्यानें बदल करतां येतो; परंतु मोठ्या समाजांत तो मिसळला म्हणजे 'आपणच कशाला नवीन प्रथा पाडा? आपण कोण?' असें प्रत्येकाला वाटत असतें. अशा वृत्तीच्या माणसांचे जमाव एकत्र वाढतात, परंतु त्यांचा दुबळेपणा तोहि वाढीस लागतो. कोणालाच धैर्य नसल्यामुळें जें अर्धवट व दुबळें असेल त्यालाच सारे मान देतात. नवीन दृष्टि व नवीन विचार येण्यासाठीं धैर्यानें कोण उठणार? कोण बोलणार? "आपण कशाला उठा? सारे काव काव करतील; जाऊं द्या, जें व्हावयाचें तें होईल" अशी वृत्ति उराशीं बाळगून सारे मत्र्यांना कवटाळून बसतात.

आतां युरोपमध्यें कसें आहे तें पाहूं चला. ज्या युरोपमध्यें ध्येयें व विचार प्रत्यक्ष कृतींत आणण्यासाठीं निर्भयपणें सदैव धडपड चाललेली असते तेथें जाऊं या. व्यक्तीनें सभ्य, स्वच्छ व सुसंस्कृत असण्यासाठीं अमुक अमुक तऱ्हेनें वागलेंच पाहिजे अशीं हिंदुस्थानांतल्याप्रमाणें युरोपांतहि बंधनें आहेत. तेथें सामाजिक मताला फार महत्त्व आहे. असल्या गोष्टींची तिकडे चर्चा होत नाहीं. समाज त्या त्या गोष्टीची उचलबांगडी करून फेंकून देतो. युरोपांत आचारपद्धति लहानपणीं घरांत स्त्रियांकडून शिकविली जाते. लहानपणीं हें मुलाला शिकविल्यावर मोठेपणीं तो आपल्या या वर्तनापासून, या आचारपद्धतीपासून च्युत होणार नाहीं अशी अपेक्षा केली जाते. परंतु मोठेपणीं त्यानें मर्यादाभंग जर केलाच तर त्या बंडखोराला कसें शासन करावें हें तेथील बलवान् व प्राणवान् समाजाला माहीत असतें. समाज त्या व्यक्तीला स्थानच देत नाहीं, त्याची कोणी विचारपूस करीत नाहीं, त्यानें केलेल्या बदलाला महत्त्व देऊन त्याची कोणी चर्चा करीत बसत नाहीं. चर्चा केल्यानें वस्तु मरत नाहीं तर तिचीं बीजें फोफावतात; मरण्याऐवजीं ती वस्तु फोफावते. वस्तूची

उपेक्षा केल्यानें ती मरून जाते. तिचा गाजावाजा करण्याइतकें महत्त्वच तिला देऊं नये म्हणजे ती वस्तु मागें पडते, तिची वाढ होणें बंद होतें. या बारीकशा गोष्टींत सारें बळ एकवटावयास समाजाला सवडहि नसते, ज्याला ज्यांत स्वाभिमान वाटेल तें त्याला करूं दे. परंतु समाज योग्य वस्तूचीच वाढ करील.

आणखी नीट बघूं या. हिंदुस्थानांतील गोष्टींपेक्षां आतां निराळ्याच गोष्टी आपणांस दिसतील. संगोपनगृहांतून बाळ एकदां बाहेर पडला, आईच्या किंवा दायीच्या खोलींतून बाहेर पडला, म्हणजे 'देवासारखा बैस, मुकाट्यानें बैस, गडबड करूं नको, बाहेर जाऊं नको, तेथें चढूं नको, पडशील, ऐकतोस कीं नाहीं' असलें आत्मनाशाचें विकासघातक शिक्षण त्यांना देण्यांत येत नाहीं. पंगूपणाचें व परावलंबनाचें, निष्क्रियत्वाचें व पराक्रमशून्यतेचें शिक्षण त्याला देण्यांत येत नाहीं. मुलानें धीट व्हावें, त्यानें आपण होऊन निरनिराळे आरंभ करावे, त्यानें पुढाकार घ्यावा, त्यानें आपलें मत सांगावें, अंगावर जबाबदारी घ्यावी, त्यानें बंड करावें, त्यानें पडावें व पुन्हां उठावें अशाच गोष्टी त्याच्या मनावर गुरु व त्याचे मार्गदर्शक ठसवीत असतात. गुळाचा गणपति, ऐदीनारायण, अडणीवरचा शंखोबा, दगडोबा, नंदीबैल असा मुलगा न होतां 'उड्या मारणारा, समुद्र ओलांडणारा, सूर्याला भेटावयास जाणारा बलवंत हनुमंत तूं हो' असें त्याला शिकविण्यांत येतें. 'शेळीमेंढीसारखा न होतां, अजागळा-प्रमाणें न होतां, सक्रिय व सामर्थ्यवान् निर्भय सिंह हो' असें त्याला सांगण्यांत येतें. **इच्छाशक्ति व नैसर्गिक स्वभाव या गोष्टी युरोपीय शिक्षणांत फार महत्वाच्या मानल्या जातात.** या वृत्तींचा तेथें खून करण्यांत येत नाहीं; शिक्षणाच्या साळसूद नांवाखालीं या वृत्ति दडपल्या जात नाहींत. या वृत्तींचें तेथें संवर्धन केलें जातें, त्यांना नीट वळण लावण्यांत येतें. युरोपांत जेव्हां एखादी गोष्ट सामुदायिक हिताची असते, सर्व राष्ट्राच्या हिताचा प्रश्न असतो, तेव्हांच फक्त वैयक्तिक इच्छा मनुष्य बाजूला ठेवील; एरव्हीं त्या तो बाजूला ठेवणार नाहीं, दाबून टाकणार नाहीं, व दाबून टाकूं देणार नाहीं. मनुष्याच्या वृत्ति व स्वभाव यांना शिस्त व वळण लावून थोर ध्येयें, महनीय कल्पना, यांचीं साधनें त्यांना

बनविण्यांत येतें. याच कारणास्तव क्रीडांगणावर मारामारी करूं देतील, झोंबाझोंबी होऊं देतील. त्यांत हेतु एवढाच असतो कीं, कोणालाहि आपणांस दाबून टाकलें असें वाटावयास नको; दोघे लढा व प्रत्येकाला न्याय मिळूं दे. असें केल्यानें न्यायासाठीं, हक्कासाठीं सर्वांना झगडण्याचा हक्क आहे हें तत्त्व अंगीं बाणतें. मुलाला आपली शक्ति अजमावूं देणें हें योग्य आहे. तसें त्याला करूं न देणें म्हणजे त्याचें धैर्य खच्ची करणें होय. त्याला न्यायासाठीं झगडूं न देणें म्हणजे त्याच्या मनांतील तळमळ व सत्यता यांना पुरून टाकणें होय. झगडा होऊं दे. झगड्यामध्यें स्वतःपेक्षां जो अशक्त आहे, त्याला जर तो मारील तर त्याच्याबरोबरीचे त्याची टर उडवितील व म्हणतील, " तूं केवढा व तो केवढा ! त्याला मारावयास लाज नाहीं रे वाटली तुला ? आमच्याजवळ करावयाचे होते बच्चंजी दोन हात—मग दाखविलें असतें पाणी ! परंतु आम्हांला सोडून त्याच्यावर धांवलास ! दिसला आपला अशक्त, दिलीस ठेवून तोंडांत ! हाच का पराक्रम ? " अशी टीका आपल्यावर होईल ही भीति असतेच.

ज्या गोष्टीची उत्क्रांति व्हावयास आशियांत अनेक शतकें लागतात, त्या गोष्टी युरोपमध्यें दहा वर्षांतच—बाळपणांतच शिकविण्यांत येतात व तो मुलगा जगांत वीर होण्यासाठीं बाहेर पडतो. विष्णूच्या दशावतारांत जर अनेक जन्मांची उत्क्रांति दाखविली असेल तर शौर्य, धैर्य, धीरोदात्तता येण्यास हजारों वर्षें लागणार हें नाहीं का दाखविलें ? परंतु या दशावतारांच्या कल्पनेंत एकाच जन्माचा विकास जर दाखविला असेल तर हें युरोपचेंच ध्येय हिंदुस्थानांत शिकविलें गेलें असें म्हणतां येईल. मत्स्य, कूर्म, वराहादि याच जन्मांतील आपल्या भूमिका होत. त्यांतून गेलें कीं मूल बटू वामन होतें—लहानसा मनुष्य होतें. परंतु बुद्ध होण्यापूर्वीं त्याला दोनदां क्षत्रिय व्हावें लागेल. स्वाभिमान व सत्य यांच्यासाठीं प्रथम शारीरिक शक्तीनेंच तो झगडावयास शिकतो. त्यानंतर प्रेमाची शक्ति उत्पन्न होते. निर्भयतेचे राम व कृष्ण अवतार समाप्त केल्यावर प्रेमसिंधु बुद्धाचा अवतार मिळेल. व्यक्ति आपल्या विकासांत वंशानुसारी असते या अर्वाचीन सिद्धान्ताचेंच हें स्पष्टीकरण नाहीं का ? पुढें जो कल्की अवतार अजून व्हावयाचा आहे त्यांत आणखी उत्क्रांति व्हावयाची

असेल. दया व प्रेम यांच्या सागरांत बुडी मारून दया व प्रेम हीं ध्येयें सर्व व्यक्तींच्या जीवनांत यावींत म्हणून हीं ध्येयें वैयक्तिक न राहतां सर्व समाजाचीं व्हावींत म्हणून भगवान् बुद्ध कल्कीच्या रूपानें येऊन धडपडणार नसतील कशावरून? ध्यान सोडून पुन्हां कर्मक्षेत्रांत ठाण घेणार नाहींत कशावरून?

सारांश, हिंदु धर्म हाहि विकासवादी व उत्क्रांतिवादी आहे. तो केवळ रूढींचीं गांठोडीं सांभाळणारा हमाल नसून शील व चारित्र्य यांना बनविणारा वीर विश्वकर्मा आहे. ही दृष्टि एकदां स्वीकारा. आपण निर्माण करणारे आहोंत, नवीन नवीन प्रयोग करणारे आहोंत, पुढें पुढें जाणारे आहोंत, हा विचार मनांत खेळवा व मग वृत्तींत काय फरक पडतो तें पहा. हा विचार अंतःकरणांत असला म्हणजे जुन्या चालीरीती, जुने आचारविचार ह्यांच्यावर हल्ले चढवतांना शरमायला नको, नरमायला नको. निर्भीड व निर्भय होऊन आपण जें योग्य नसेल तें बेलाशक पाडूं व नवीन जोडूं. आपण बळानें फरक घडवून आणूं. आतां स्वतःला सांभाळीत बसणें, स्वतःला केवळ कोपऱ्यांत कुरवाळीत बसणें, हें आमचें काम नसून दुसऱ्यांना आमच्या बाजूस जिंकून ओढून आणणें हें आमचें काम आहे. आम्ही जें जुनें भलें आहे तेंहि राखूं व जें नवीन चांगलें आहे तेंहि चाखूं. जग आमच्याबद्दल काय म्हणतें हें नाहीं अतःपर आम्ही पाहणार, तर जगाबद्दलचें आमचें मत जाहीर करणार. आम्हीं किती राखून ठेविलें हा आतां महत्त्वाचा प्रश्न नसून आम्ही नवीन किती जोडलें हा प्रश्न महत्त्वाचा आहे. आमची दृष्टि नवदिग्विजयाची आहे. आम्ही मुमूर्षु किंवा केवळ जिजीविषु नसून आम्ही विजिगीषु आहोंत. आतां गमावण्याचें नांवच सोडा; आतां अटकेपार झेंडे नेऊन दूरवरच्या प्रांतांत स्वाऱ्या-शिकाऱ्या करून लढाया देण्याचें आम्हीं निश्चित केलें आहे. आतां शरणागतीचा विचार स्वप्नांतहि मनाला शिवतां कामा नये—कारण झगडा सुरू झाला आहे, ठाण मांडलें गेलें आहे, धनुष्याची प्रत्यंचा चढविली गेली आहे. आतां माघार कोठली? तो पहा हल्ला चढविला गेला—आतां तो दूर दिसणारा जो विजय त्याला गांठल्याशिवाय विश्रांति नाहीं.

**हिंदु धर्मांत प्रचंड बदल करून घेण्याची शक्ति आहे. हिंदु धर्म स्थाणु नाहीं. तो अत्यंत विकासक्षम आहे.** नागार्जुन व बुद्धघोष यांना नानात्मता सत्य वाटे, एकात्मता असत्य वाटे; शंकराचार्यांना एकात्मता सत्य वाटे व नानात्मता भासमान वाटे. श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांना नाना व एक दोन्ही सत्यरूपच वाटतात. समाज व व्यक्ति दोघांना सत्यत्व आहे. समाजाची काळजी न करतां मीं एकट्याचा मोक्ष पाहाणें हेंहि चूक; परंतु स्वतःला शुद्ध न करतां समाजाची सेवा करूं पाहाणें म्हणजेहि चूकच. मीं स्वतः शुद्ध झालें पाहिजे व समाजाची सेवा केली पाहिजे. नागार्जुन व शंकराचार्य यांचा समन्वय श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांनीं केला, हिंदु धर्मांतील तत्त्वांचा आणखी विकास केला, जें सत्य कधीं एक म्हणून भासलें, कधीं अनेक म्हणून भासलें, तेंच आज एक व अनेक दोन्ही रूपांनीं प्रतीत होत आहे. श्रीरामकृष्ण-परमहंसांना एक व अनेक दोन्ही सत्य आहेत याचा अर्थ काय? यांतील अर्थ एवढाच कीं, स्वतःचें चारित्र्य व पावित्र्य म्हणजेच आध्यात्मिकता. याचा अर्थ हा कीं, आलस्य व पराजय, कर्मशून्यता व दैन्य म्हणजे संन्यास नव्हे. याचा अर्थ हा कीं, स्वतः एकटें मुक्त होण्यापेक्षां दुसऱ्याचा सांभाळ करणें व दुसऱ्याची सेवा करणें हें अनंतपटीनें थोर आहे. याचा अर्थ हा कीं, मुक्तीचा ध्यास सोडणें म्हणजेच मुक्त होणें. याचा अर्थ हा कीं, विजयशाली होणें, म्हणजेच उच्च संन्यास होय. याचा अर्थ हा कीं, हिंदु धर्म विजयासाठीं, सेवेसाठीं, कर्मासाठीं आज उठून उभा राहिला आहे. कलंकी अवतारांचीं चिन्हें दिसत आहेत. नौबती झडत आहेत, ताशेमर्फे वाजत आहेत. कर्मवीरांनो! अरे, कर्म म्हणजेच धर्म, सेवा म्हणजेच संन्यास! अरे, कर्म म्हणजेच यज्ञ, विजय म्हणजेच संन्यास! तुम्हामध्यें जें जें सुंदर आहे व उदार आहे, जें जें उदात्त व परमोच्च आहे, जें जें प्रेमाचें व पावित्र्याचें आहे, शौर्याचें व धैर्याचें आहे, त्यागाचें व सत्याचें आहे, तें सारें बाहेर येऊं दे; तें कर्मद्वारां, सेवाद्वारां प्रकट होऊं दे. तुमच्या हृदयांतील त्या दिव्यतेला आज आव्हान आहे, आज आमंत्रण आहे. अशा युद्धाला चला कीं जेथें माघार हा शब्दच माहीत नाहीं.

* *

# संभवनीय प्रश्न

( १ ) सामुदायिक प्रार्थना हा युरोपनें लावलेला फारच मोठा शोध आहे. तुम्हांला असें वाटतें काय ? कारणें द्या.

( २ ) हिंदु धर्मांत सामुदायिक प्रार्थना कां आली नाहीं ?

( ३ ) हिंदु धर्माला जर तेजस्वी व्हावयाचें असेल तर त्यानें काय केलें पाहिजे ?

( ४ ) ' हिंदु धर्म हा संग्राहक आहे, विकासक्षम आहे. ' या विधानांचें स्पष्टीकरण करा.

( ५ ) पाश्चिमात्यांचें अनुकरण कोणत्या पद्धतीनें केलें पाहिजे ?

( ६ ) एकाच नगरांतील भिन्न भिन्न जातीय संघ म्हणजे दीपस्तंभ असत. — स्पष्टीकरण करा.

( ७ ) प्राचीन शहरें आणि आजचीं शहरें यांच्या चित्रांत कोणता फरक दिसतो ?

( ८ ) विद्यार्थ्यांनीं सभोंवतालच्या सामाजिक प्रश्नांचा कोणत्या दृष्टीनें विचार करावा ?

( ९ ) पंथ असणें योग्य कीं अयोग्य ? पंथांचें ध्येय कोणतें ?

( १० ) धर्म म्हणजे काय ? इतर धर्मांपेक्षां हिंदु धर्मांत अधिक काय आहे ?

( ११ ) फुरसतीचा वेळ आपण कोणत्या पद्धतीनें खर्च केला पाहिजे ?

( १२ ) आपण पाश्चिमात्यांच्या कोणत्या कल्पनांचें अनुकरण केलें ? कोणतें अनुकरण योग्य ठरेल ?

( १३ ) मानवानें कशाकरतां धडपड करावी ?

( १४ ) स्वातंत्र्य म्हणजे काय ?

( १५ ) गुरूशिवाय आपलें चालेल का ? गुरु कोणास म्हणावें ?

( १६ ) शिष्याच्या अंगीं कोणते गुण असावेत ?
( १७ ) मध्ययुगाचे विशेष कोणते ?
( १८ ) खरा कलावंत कोणत्या वृत्तीनें वागतो ?
( १९ ) साधी राहणी व उच्च विचारसरणी यांचें महत्त्व सांगा.
( २० ) भगवान् बुद्धामध्यें दयाशीलता कशी निर्माण झाली ?
( २१ ) आपत्तीमुळें चारित्र्यविकासाला कोणती मदत होते ?
( २२ ) संयमाचें महत्त्व सांगा.
( २३ ) प्रेम हें साधन, संघटना हा पाया व प्रगति हें ध्येय होय. या वाक्याचें स्पष्टीकरण करा.
( २४ ) यश कीं अपयश ही हिंदु धर्माची दृष्टि नाहीं.— स्पष्टीकरण करा.
( २५ ) शिक्षकानें मुलांच्याकडे कोणत्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे ?
( २६ ) वैदिक धर्माचे जे खरे वारसदार असतील त्यांनीं काय केलें पाहिजे ?
( २७ ) श्रमाचें महत्त्व सांगा.
( २८ ) यंत्रसंस्कृतीचे परिणाम सांगा.
( २९ ) आपल्यासमोर कोणतें काम उभें आहे ?
( ३० ) पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनाही शिक्षणाची जरूर आहे काय ! कोणत्या शिक्षणाची ?
( ३१ ) विवेकानंद कॉलेजमध्यें असतांना कोणता पोशाक करीत ? असा पोशाक करण्याचें कारण काय ?
( ३२ ) चारित्र्य आणि आध्यात्मिकता यांच्यांत कोणता संबंध आहे ?
( ३३ ) युरोपमधें बालकांचें शिक्षण कोणत्या पद्धतीनें चालू आहे ?

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय
दा. क्र. ६३०२
दि. ...७ . ९१
IRBK-0106302
IRBK-0106302